THE BOOK WAS DRENCHED

श्री

भाऊंच्या वीरकथा

व

पानिपत कुरुक्षेत्र वर्णन

लेखक

शंकर पुरुषोत्तम जोशी

शके १८५६

किंमत १० आणे.

॥ श्री ॥

विश्वनाथो विजयते

कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या

मराठी धातुकोश

(व्युत्पत्तीसह)

ग्रंथाच्या प्रकाशनाची योजना

श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर झालेली.

राजवाड्यांच्या धातुकोशाच्या प्रकाशनार्थ लागणारा निधी खालील प्रमाणें उभारण्याचे ठरलें आहे.

सहाय्यक वर्ग पहिला:—रकम रुपये शंभर अगर त्याहून अधिक रकम या ग्रंथाचे प्रकाशनास देणारे सद्गृहस्थांस पहिल्या वर्गाचे सहाय्यक समजलें जाईल. महाराष्ट्रांतील कित्येक विद्वान् लोकांनीं राजवाडे संशोधन मंदिरास ज्या प्रमाणें उदार अंतःकरणानें चांगल्या देणग्या देऊन राजवाड्यांचें स्मारक सिद्ध करण्यास मंडळास मदत केली, त्याचप्रमाणें राजवाड्यांचे वाङ्मयात्मक स्मारकास चांगल्या प्रकारचें सहाय्य देऊन हें स्मारक सिद्ध करण्यास मदत करावी अशी आमची नम्र विनंति आहे. देणगी देणारे सद्गृहस्थ या कार्याची महती लक्ष्यांत घेऊन ही विनंति मान्य करितील अशी मंडळास आशा आहे. अशा रीतीनें मंडळास देणगी देणारांस या ग्रंथाचे तीन हि खंड मंडळाकडून भेट म्हणून देण्यांत येतील.

सहाय्यक वर्ग दुसरा:—राजवाडे यांच्या या ग्रंथाचें महत्व लक्षांत घेऊन मध्यम स्थितीतील कित्येक सद्गृहस्थांस या कार्यास मदत करावी अशी इच्छा होणें स्वाभाविक आहे; अशा गृहस्थांनीं या ग्रंथाचे तीन हि भाग घेण्याचें आश्वासन देऊन तिन्ही भागाबद्दल रकम रुपये पंचवीस आगाऊ राजवाडे संशोधन मंडळास या ग्रंथाचे प्रकाशनासाठीं देऊन ग्रंथाचे प्रकाशनास मदत करावी.

बृहन्महाराष्ट्रांत जीं ठिकठिकाणीं अनेक ग्रंथालयें व वाचनालयें आहेत, त्यांच्या चालकांनीं रकम रुपये दहा राजवाडे मंडळाकडे पाठवून आपलीं नांवें नोंदविल्यास त्यांचीं नावे सहाय्यक वर्ग दोनमध्यें नोंदविण्यांत येऊन त्यांना या ग्रंथाचे तीन हि खंड रकम रुपये पंचवीसला देण्यांत येतील. दुसरा खंड रकम रुपये आठ व तिसरा खंड रुपये सात व व्ही. पी. खर्च मिळून ग्राहकांकडे रवाना करण्यांत येईल.

॥ श्री ॥

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे संशोधन मंडळ–धुळें.

कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या आकस्मिक निधनाबद्दल दुःख प्रदर्शनार्थ धुळें येथें पौष शु॥ ६ शके १८४८ रविवार ता. ९।१।१९२७ रोजीं भरलेल्या जाहीर सभेंत वरील संस्थेची स्थापना करण्यांत आली.

संस्थेचे हेतु व नियम

(१) हेतु:—(१) ऐतिहासिक आणि वाङ्मयात्मक संशोधन करणें. (२) कै. राजवाडे यांचा व यापुढें नवीन उपलब्ध होणारा संग्रह सुरक्षित राखणें. (३) त्याचें यथावकाश प्रकाशन करणें, (४) कै. राजवाडे यांनीं लिहून ठेवलेला प्रचंड मराठी धातुकोश व त्यांचीं इतर पुर्णापूर्ण टांचणें प्रसिद्ध करणें, (५) एकवार प्रकाशित पण हल्लीं दुर्मिळ झालेल्या त्यांच्या लेखांचे विषयवारीनें खंडशः पुनर्मुद्रण करणें, (६) कै. राजवाडे यांचें स्मारक म्हणून धुळें येथें राजवाडे संशोधन मंदिर उभारणें, (७) वरील कार्यार्थ द्रव्यनिधि जमविणें, (८) वरील सर्व कार्य व तत्सदृश इतर कार्य सिद्ध होण्यासाठीं जरूर ती उपाययोजना करणें.

(२) सभासदांचे वर्ग:—(१) रुपये एक हजार किंवा त्याहून जास्त रकम एकदम देणारे हे संस्थेचे **आधारस्तंभ** सभासद होत. (२) रुपये पांचशें किंवा जास्त देणारे संस्थेचे **आश्रयदाते** सभासद होत. (३) रुपये शंभर किंवा जास्त देणारे संस्थेचे **तहहयात** सभासद होत. (४) दरसाल रुपये १२, ६ अगर ४ देणारे साधारण सभासद होत.

लेखकाचें दोन शब्द.

दिल्लीपासून कुरुक्षेत्रापर्यंतचा शंभर मैलांचा प्रदेश हा हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक दृष्टीनें महत्वाचा आहे यांत शंका नाहीं. हा प्रांत निरनिराळ्या युद्धांचें रणक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. कुरुक्षेत्र येथील कौरव पांडवांचें युद्ध व पानिपतच्या एकामागून एक झालेल्या तीन लढाया इत्यादि गोष्टी मनांत आणल्या म्हणजे हा प्रदेश निरनिराळ्या राजांची शक्ति कसाला लावण्याची किंवा आपला पराक्रम दाखविण्याचीच एक भूमी आहे असें म्हटले असतां चालेल. या भूमीच्या उदरांत लाखो वीर गडप झाले असून त्यांच्या रक्ताचा सडा तिच्यावर शिंपडला गेला आहे असें इतिहासावरून दिसून येतें.

पानिपतची तिसरी लढाई होऊन आज एकशें त्र्याहात्तर वर्षे झालीं तथापि या तिसऱ्या लढाईची आठवण कोणत्याहि महाराष्ट्रीयांचे मनांतून जाणें शक्य नाहीं. या लढाईंत सदाशिवरावभाऊ व विश्वासराव या दोन व्यक्तींनीं जे पराक्रम केले त्यांचें स्मरण पानिपत प्रांतांतील लोकांस अद्यापीही राहिलें आहे. पानिपत व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत पायीं हिंडून तद्देशीय लोकांत या लढाईसंबंधीं ज्या दंतकथा प्रचलित आहेत त्या सर्व एकत्र करून मी महाराष्ट्रीय वाचकांसमोर ठेवीत आहे. वाचकांनीं किंवा इतिहासज्ञांनीं या दंतकथांतील गोष्टींची सत्यासत्यता किंवा शक्याशक्यता स्वतःचें मनाशीं ठरवावी. परंतु अशा प्रकारची माहिती अद्याप प्रसिद्ध झालेली नसल्यानें व माझ्यामतें ती महत्त्वाची असल्यानें ती पुस्तक रूपानें प्रसिद्ध करीत आहे.

शंकर पुरुषोत्तम जोशी

प्रकाशकाचें निवेदन

हा ग्रंथ रा. शंकर पुरुषोत्तम जोशी यांनीं लिहिला आहे. हे गृहस्थ मूळचे कुलाबा जिल्ह्यांतील पाली येथील राहाणारे, परंतु यांचें उत्तर हिंदुस्थानांत बरेच दिवस वास्तव्य आहे. अलिकडे पानिपत युद्धासंबंधीं नवीन माहिती मिळवून तिचे आधारें या युद्धां-संबंधाचे लेख प्रसिद्ध होत आहेत. ग्वाल्हेर येथील रा. शिरढोणकर यांनीं हितचिंतकाचा खास पानिपत अंक छापून प्रसिद्ध केला आहे. पुण्याचे श्री. दि. वि. काळे हे पानिपत युद्ध भूमीचें निरीक्षण करण्याकरतां मुद्दाम त्या प्रांतांत गेले होते व त्यांनीं या युद्ध भूमीचें निरीक्षण करून त्यांच्या निदर्शनास आलेल्या कित्येक बाबींसंबंधीं विस्तृत लेख कांहीं दिवसांपूर्वी केसरींत प्रसिद्ध केले. ते लेख श्री. जोशी यांचे वाचनांत येऊन पानिपत युद्ध भूमीच्या आसपासच्या खेड्यांतून हिंडून या युद्धाविषयीं त्या प्रांतांतील लोकांकडून कांहीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावा, अशी कल्पना त्यांचे मनांत उद्भूत झाली,व या कल्पनेस अनुसरून असल्या प्रकारची माहिती मिळविण्याचा प्रयत्न त्यांनीं तात्काळ सुरूं केला. श्री. जोशी यांचा उत्तर हिंदुस्तानांत बराच काळ वास झाला असल्यानें त्यांना हिंदी भाषा चांगली अवगत असून, ती भाषा बोलण्याचें प्राविण्य त्यांनीं तद्देशीयाप्रमाणें संपादन केलें असल्या कारणानें त्यांच्या मनांत आलेली कल्पना त्यांना सहज रीतीनें साध्य करतां आली. श्री. जोशी यानीं या प्रदेशांतील खेड्यापाड्यांतून पायीं प्रवास करून ठिकठिकाणच्या लोकांत मिसळून पानिपत युद्धासंबंधीं त्या लोकांत प्रचलित असलेली हरएक प्रकारची माहिती मिळवून ती सर्व या ग्रंथांत दिली आहे. पानिपत युद्ध होऊन एकशें त्र्यहात्तर वर्षें झाली असून ही रा. जोशी यांस इतकी माहिती मिळूं शकली ही थोडी आश्चर्य करण्या सारखी गोष्ट आहे. श्री. जोशी यांनीं ज्या प्रकारचा प्रयत्न केला तशा प्रकारचा

प्रयत्न केला नसतां तर कालांतरानें आज मिळालेली माहितीही नष्ट झाली असती. या दृष्टीनें विचार केला असतां श्री. जोशी यांनीं केलेल्या प्रयत्नाबद्दल ते निःसंशय स्तुतीसपात्र आहेत.

आतां ऐतिहासिक दृष्ट्या श्री. जोशी यांनीं मिळविलेल्या माहितीची किंमत कोणत्या प्रतीची आहे याचेंही दिग्दर्शन प्रस्तुत स्थलीं करणें जरूर आहे. श्री. जोशी यांनीं मिळविलेली माहिती अव्वल दर्जाच्या ऐतिहासिक साधनांच्या स्वरूपाची नाहीं हे उघड आहे. ही माहिती दंतकथा या सदरांत पडणारी असून कनिष्ट प्रतीच्या ऐतिहासिक साधनांत तिचा समावेश होत असल्यानें तिची थोडी बहूत किंमत आहे. कांहीं वर्षांपूर्वीं शालिग्राम आणि ॲक्वर्थ यांनीं महाराष्ट्रांतील गोंधळी जे ऐतिहासिक पोवाडे म्हणत ते एकत्र करून ग्रंथ रूपानें प्रसिद्ध केले आहेत. हा प्रयत्न त्यांनीं ज्या धोरणानें केला व त्यांचा प्रयत्न मराठी इतिहासाभिमान्यांनीं ज्या दृष्टीनें गौरविला त्याच स्वरूपाचा प्रयत्न श्री. जोशी यांनीं या ग्रंथरचनेनें केला असल्यानें तो गौरवास पात्र होईल अशी आशा आहे.

शालिग्रामांच्या ऐतिहासिक पोवाड्यांच्या ग्रंथास जे स्थान मराठी ऐतिहासिक वाङमयांत प्राप्त झालें आहे तेंच स्थान श्री जोशांचे ग्रंथास प्राप्त व्हावयास प्रत्यावाय नसावा. श्री. जोशी हे कसलेले मराठी लेखक नाहींत व त्यांचे उत्तर हिंदुस्थानांत बरीच वर्षे वास्तव्य झालें असल्यानें त्यांच्या या ग्रंथांतील भाषेकडे विशेष चिकित्सक बुद्धिनें न पाहाणें हेंच इष्ट असें आम्हास वाटतें. ग्रंथ निर्मिती व त्याची प्रसिद्धी या संबंधी थोडक्यांत इष्ट तो खुलासा करून हा ग्रंथ महाराष्ट्रीय वाचकांस आम्ही सादर करितों.

चैत्र शु॥ १
शके १८५६

भास्कर वामन भट
चिटणीस राजवाडे सं. मं. धुळें.

ॐ

(भाग पहिला)

दिल्ली–कुरुक्षेत्र–भूमि.

दिल्ली पासून कुरुक्षेत्रापर्यंतचा ९५ मैलांचा प्रदेश हा ऐतिहासिक, भौगोलिक व पौराणिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे यांत शंका नाहीं. या भूमींत सुप्रसिद्ध अशीं घनघोर युद्धें घडून आल्यामुळें हिला युद्धभूमीचा बहुमान मिळाला आहे. महाभारतांतील प्रसिद्ध युद्ध हें कुरुक्षेत्रीं घडलें, त्याशिवाय तरावडी, कर्नाल, कुंजपुरा, पानिपत इत्यादि ठिकाणींही मोठमोठीं युद्धें झालीं. प्रथमतः या भूमींत घडलेल्या निरनिराळ्या युद्धांची छाननी करून नंतर या भूमीची भौगोलिक परिस्थिति मी वाचकांपुढें ठेवणार आहे.

कुरुक्षेत्रांतील घनघोर युद्धः–भारतीय सभ्यता नष्ट करून टाकणारें हें युद्ध प्रत्येक हिंदवासियास माहितच आहे. दिल्लीपासून कुरुक्षेत्रापर्यंतच्या प्रदेशांत फौजेच्या छावण्या होत्या. महाभारतांतील कौरव पांडवांचें युद्ध कोणत्या काळीं झालें याबद्दल अजूनही विद्वानांत मतभेद आहे. कांहीं जण या युद्धाला ख्रिस्ती शकापूर्वी पांच सातशें वर्षे इतक्या काळांत आणून सोडितात, तर कांहींजण हा काल तीन हजार वर्षें मागें ढकलतात. पण अगदीं अलिकडे पुराणांतील निरनिराळ्या राजांच्या वंशावळीच्या सहाय्यानें व पुराणांत आलेल्या परिक्षिताच्या जन्माच्या काळापासून नंदाच्या कारकीर्दीपर्यंतच्या उल्लेखावरून, भारतीय युद्ध, ख्रिस्ती शकापूर्वीं पंधराशेंच्या सुमारास झालें असावें, असा जो अंदाज करण्यांत आला आहे, तोच खरा असावा असें मला वाटतें. भारतीय युद्धामुळें या भूमीचें महत्त्व व पावित्र्य प्रत्येक हिंदु म्हणविणाऱ्या मनुष्याच्या मनांत अखंडित वास करून राहिलें आहे.

तरावडी येथील युद्धें:—तरावडी येथें इ. स. ११९२ मध्यें पृथ्वीराज व महंमद घोरी यांचें मध्यें युद्ध झालें होतें. यांत पृथ्वीराजाचा जय झाला व महंमद घोरीचा पराभव झाला. येथेंच वरील दोन्ही राजांच्या दर्म्यान दुसरें एक युद्ध झालें. त्यांत पृथ्वीराजाचा पराभव झाला व महंमद घोरीचा जय झाला. ही दुसरी लढाई स्थानेश्वर येथें झाली होती असेंही वाचण्यांत येतें.

कर्नाल येथील युद्धः—येथें दिल्लीचा बादशहा मुहम्मदशहा व इराणचा बादशहा नादिरशहा या दोहोंच्या मध्यें एक युद्ध इ. स. १७३९ मध्यें झालें होतें. त्यांत नादिरशहाचा जय होऊन महंमद शहाचा पराभव झाला व पुढें नादिरशहानें दिल्ली शहर लुटले इत्यादि गोष्टी वाचकांस माहितच आहेत.

कुंजपुरा येथील युद्धः—कर्नालपासून थोड्याच अंतरावर असलेल्या कुंजपुरा गांवीं इ. स. १७६० सालीं तेथील नबाबाचें व मराठ्यांचें युद्ध झालें, त्यांत मराठे यशस्वी झाले. नबाबाचा पूर्ण पराभव झाला. या लढाईस निराळी लढाई न समजतां पानिपतच्या तिसऱ्या लढाईंतच हिचा अंतर्भाव होतो. या संबंधीं हकीगत या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत वाचकांस पहावयास मिळेल.

पानिपत येथील तीन युद्धें:—दिल्ली कुरुक्षेत्र भूमीच्या मध्यावर असलेलें जें पानिपत ठिकाण तेथील मैदानावर तीन निरनिराळीं युद्धें झालीं. इ. स. १५२६ मध्यें जें पहिलें युद्ध झालें त्यांत बाबरानें इब्राहिम लोदीचा पराभव केला. इ. स. १५५६ मध्यें जें दुसरें युद्ध झाले त्यांत अकबरानें, सिकंदरसूरचा हिंदू प्रधान हिमू याचा पराभव केला. इ. स. १७६१ मध्यें जें तिसरें युद्ध झाले त्यांत अहमदशहा अबदालीनें मराठ्यांचा पराभव केला. या प्रमाणें ऐतिहासिक दृष्ट्या, या भूमींत घडलेल्या युद्धांचें वर्णन थोडक्यांत झालें. आतां या भूमीचा भौगोलिक दृष्ट्या विचार करूं.

भौगोलिक विवेचनः—दिल्लीपासून कुरुक्षेत्रापर्यंतची भूमि म्हणजे एक प्रचंड मैदानच आहे असें म्हटल्यास चालेल. डोंगर, पर्वत यांचें नांवसुद्धां नाहीं, फार काय पण मोठमोठीं झाडेंसुद्धां सांपडणार नाहींत. शिवाय पूर्वेच्या बाजूनें यमुनेचें सान्निध्य आहे. या भूमींतील विहिरी फार खोल नसून त्यांत विपुल पाणी असतें. मनुष्याच्या शरीर प्रकृतीला सुदृढ करणारें असें हवापाणी या भूमींत आहे. अशी परिस्थिति असल्यामुळेंच निरनिराळया बलाढ्य राजांनीं आपली ताकद अजमाविण्यासाठीं ही भूमि निवडून काढिली. फौजेच्या हालचालींना अनुकूल अशी या भूमीची भौगोलिक परिस्थिति आहे.

चतुःसीमाः—उत्तरेस अंबाला जिल्हा व पतियाळा संस्थानांतील कांहींभाग, पश्चिमेस झिंदसंस्थान व रोहोतक जिल्हा, दक्षिणेस गुडगांव व मथुरा हे दोन जिल्हे आणि पश्चिमेस यमुना नदी. यमुनेच्या पलिकडे या भूमीशीं समांतर असे मीरत, मुजफरनगर, सहारणपूर असे तीन जिल्हे अनुक्रमें येतात.

भूमीची वांटणीः—दिल्ली—कुरुक्षेत्र भूमीची राजकीय दृष्ट्या खालील प्रमाणें विभागणी होते. बारा मैल दिल्ली प्रांतांत, तीस मैल रोहोतक जिल्ह्यांत व त्रेपन्न मैल कर्नाल जिल्ह्यांत, म्हणजे सर्वांत ज्यास्तीभाग कर्नाल, जिल्ह्यांतच समाविष्ट झाला, असें दिसून येईल.

लहान मोठ्या नद्याः—यमुना, सरस्वती, मार्कंडा, घग्गर, चौतङ्ग, उमला इ० पैकीं यमुना व सरस्वती या दोन नद्या मोठ्या आहेत. या दोन्ही नद्या पवित्र मानिल्या आहेत. दिल्ली कुरुक्षेत्र भूमीशीं समांतर असे यमुना पार करण्याचे जे मुख्य मुख्य घाट आहेत त्यांचीं नांवें:——१ घाट खोजकीपूर, २ घाट मुर्धान (मीरत जिल्ह्यांत) ३ घाट बेगी, ४ घाट डबकोली ५ घाट कलसौरा (मुजफरनगर जिल्ह्यांत) ६ घाट योगान्वा, ७ घाट गुमथलाराव ८ घाट दीगा पुब्बारी (सहारणपूर जिल्ह्यांत) इत्यादि.

दळणवळणाचे मुख्य मार्गः—अत्यंत प्राचीन असा दळणवळणाचा मार्ग म्हटला म्हणजे "**ग्रँडट्रंकरोड**" ही सडक होय. ही सडक मोंगल बादशहांच्या वेळेस बांधलेली आहे असें म्हणतात. ही सडक अशफॉल्ट नांवाच्या काळ्या मसाल्याची बनलेली आहे. सडकेचा मध्य बारा फूट असून दोन्ही बाजू दहा दहा फुटांच्या आहेत. एकंदर ह्या सडकेची लांबी म्हणजे कलकत्ता ते दिल्ली व दिल्ली ते पेशावर—इतकी आहे. रुंदी बत्तीस फूट आहे. या सडकेस "**सडकआजम**" असें म्हणतात. कित्येक लोक "**थण्डीसडक**" असेंही म्हणतात. सडकेच्या दोन्ही बाजूंना एकेक मैलाच्या अंतरानें एक उंच मिनार, प्रत्येक दोन मैलांवर एक विहीर, व प्रत्येक सहा मैलांवर यात्रेकरूंना राहाण्यासाठीं एक **सराय** अशी व्यवस्था अजूनही दिसते. दुसरा महत्वाचा मार्ग म्हटला म्हणजे दिल्लीहून अंबाल्यास जाणारी नार्थवेस्टर्न रेल्वेची शाखा हा होय. हिलाच दिल्ली अम्बाला काल्का रेलवे असें म्हणतात. या रेल्वेवरील स्टेशनें खालील प्रमाणेंः—दिल्ली, सब्जीमंडी, नरेला, सोनिपत, गणौर, सम्हालखा, पानिपत, कर्नाल, अमीन, कुरुक्षेत्र इ० आहेत. रेलवे लाईन व ग्रँडट्रंक सडक हे दोन्ही मार्ग अगदीं समांतर चालले आहेत.

शेतीः—या प्रांतांत जमीन फार सुपीक आहे. यमुना नदीपासून कित्येक लहान मोठे कालवे दूरवर नेण्यांत आले आहेत. वर्षांतून दोनच पिकें येतात. गहूं, चणा, मटर, राई यांना रब्बीचें पीक म्हणतात. ज्वारी, बाजरी, मका, ऊस, नीळ, मूग, मोट, उडीद, यांना खरीप असें म्हणतात. दिल्लीपासून कुरुक्षेत्रापर्यंतच्या भूमींत दिल्ली, सोनिपत, पानिपत, कर्नाल, कुंजपुरा, तरावडी आणि कुरुक्षेत्र (ठाणेश्वर) अशीं मोठमोठीं शहरें आहेत. या सर्व स्थलांचें साद्यंत वर्णन देऊन हा पहिला भाग मी संपविणार आहे. दिल्ली शहराचें साद्यंत वर्णन देऊं म्हटलें तर तो एक स्वतंत्र ग्रंथच तयार होईल, यासाठीं कांहीं महत्वाच्या गोष्टींचेंच वर्णन येथें देणार आहे. या शिवाय कुरुक्षेत्रासंबंधीं

स्वतंत्र माहिती असलेला असा निराळाच भाग या पुस्तकांत देण्याचें ठरविल्यामुळें राहिलेल्या स्थलांचें विस्तृत वर्णन या भागांत वाचकांस वाचावयास मिळेल.

दिल्ली—दिल्लीच्या इतिहासावर दृष्टीः—जर कोणत्याही शहराशीं हिंदुस्थानच्या बऱ्याच काळाचा इतिहास निगडित झाला असेल तर तो दिल्ली शहराशींच होय. महाभारतांतील पांडवांपासून तो थेट हल्लींच्या इंग्रज सरकारपर्यंत दिल्लीशीं महत्त्वाच्या गोष्टींत हिंदुस्थानच्या इतिहासाचा संबंध पोंचतो. ज्याप्रमाणें रोम शहराशीं यूरोपच्या बऱ्याच काळच्या इतिहासाचा संबंध पोंचतो तीच स्थिति दिल्ली शहराची आहे. प्राचीनकाळीं पांडवांनीं या शहराची रचना केली, त्यावेळेस **इंद्रप्रस्थ** या नांवानें हें शहर प्रसिद्ध होतें. दिल्ली हें नांव प्रथमतः इ. स. पूर्वी पाऊणशेंच्या सुमारास पडलें असावें. " मेवर " वंशांत एक दिल्लो नांवाचा राजा होऊन गेला त्यानें आपल्या नांवानें या शहराची रचना केली, त्यावरून दिल्ली हें नांव पडलें असेंही कित्येक ग्रंथांतून लिहिण्यांत आलें आहे. तुवर घराण्याचा प्रस्थापक अनंगपाल यानें दिल्लीशहर वसविलें, व तेव्हांपासून हिंदू दिल्लीच्या वैभवास सुरवात झाली. पुढें चव्हाण घराण्यांतील राजा विशालदेव यानें तुवर घराण्यांतील राजांचा पराभव केला. या विशालेदवाचा नातू पृथ्वीराज हा फार पराक्रमी राजा होता. त्यानें सर्व उत्तर हिंदुस्थानभर आपलें साम्राज्य केलें. या पृथ्वीराजाचा महंमदघोरीनें पराभव केल्यानंतर दिल्ली ही मुसलमान बादशहांची राजधानी झाली. पुढें प्रत्येक मुसलमानी राजानें नवें शहर बसविलें, शेवटचें म्हणजे हल्लींचें दिल्ली शहर शहाजहान बादशहानें बांधिलें. पुढें औरंगजेबापासून दिल्लीच्या बादशहांचें महत्त्व कमी झालें. या नंतर कित्येक कालपर्यंत दिल्लीचा बादशहा मराठ्यांच्या ओंजळीनेंच पाणी पीत असे. शेवटीं इंग्रजांचें साम्राज्य स्थापित होऊन या दर्यावर्दी लोकांनीं कलकत्ता ही हिंदुस्थानची राजधानी केली, पण काय नेमानेम असेल तो असो, कांहीं

अकल्पित कारणांनीं इ. स. १९११ या वर्षीं दिल्ली हीच हिंदुस्थानची राजधानी झाली व इंग्रजांच्या वैभवाला साजेल अशी नवी दिल्ली जुन्या इंद्रप्रस्थासमोर तयार झाली. दिल्ली शहराची ही विलक्षण स्थित्यंतरें मनांत आणिलीं म्हणजे विस्मय वाटतो. दिल्लीच्या या स्थित्यंतरा संबंधाची एक म्हण अजूनही या प्रांतांत अस्तित्वांत आहे. ती अशीः—

पांडु यहां दंदनाये । धाया कभी यहाँ घोरी ॥
गर्जा कभी पिथौरा । आया कभी यहाँ सूरी ॥

भावार्थः—कधीं येथें पांडवांनीं दणदणाट केला, कधीं महंमद घोरी धावून आला, कधीं पृथ्वीराज गर्जत होता, तर कधीं शिकंदर सूर धावून आला. प्राचीनकाळीं दिल्ली शहराची हवा चांगली नव्हती या विषयीं खालील वाक्प्रचार अजूनही अस्तित्वांत आहे.

चारु वस्तुओंमें विख्यात दिल्ली ॥
खेर खाँसी ताप और तिल्ली ॥

अर्थः—खोकला, ताप, पडसें, कौल्ह इ. विकारांचें दिल्ली शहर म्हणजे वसतिस्थानच होतें. दिल्लीच्या आसपासचे जिल्हे म्हणजे, गुरगांव, कर्नाल, रोहोतक इ. जिल्ह्यांत मक्याचें पीक फारच होतें. मक्याच्या कणसांनीं फुललेल्या एका शेताकडे पाहून एक प्राचीन कवि म्हणतोः—

हरीथी मनभरीथी नौलाख मोती जडीथी ॥
राजाजीके बागमें दोशाला ओढे खडीथी ॥

दिल्ली अर्वाचीनः—**"राहिसाना"** या नावानें नव्या दिल्लीचा उल्लेख करितात कोट्यावधि रुपये खर्च करून ही नवी दिल्ली बांधण्यांत आली आहे. राज्यव्यवस्थेच्या सोईकरितां दिल्ली शहराच्या आसपासचा सुमारें तीस मैल लांबी रुंदीचा असा एक स्वतंत्र प्रांत करण्यांत आला आहे. या प्रांतांत एकंदर तीनशें एकूण साठ गांवें असून त्यांत नऊ मोठीं

गांवें आहेत त्यांची नांवें:—नवी छावणी, चिरागदेहेली, नजफगड, शहादरा, नरेला, मेहेरोली, खेडागडी, भुवाना, तघलखाबाद, नांगलोई, इ. दिल्ली शहराची लोकसंख्या सुमारें तीन लक्षांच्यावर असावी.

प्रेक्षणीय स्थळें:—लालकिल्ला, कुतुबमिनार, घण्टाघर, हुमायूंकामकबरा, फिरोजशहाकाकोटला, रायपिठौराकाकिल्ला, व्हाइसरायसाहेबांचा महाल, सेक्रेटरीएट, कॉउन्सील चेंबर, जुम्मा मसजिद, जंतरमंतर (वेधशाळा) यमुनेचा पूल, हार्डीजपुस्तकालय, कंपनीबाग, टाऊनहाल, एरोक्लब. इत्यादि. हिंदुस्थान देशाच्या राजधानीचें शहर असल्यामुळें व निरनिराळया लोहमार्गांच्या केंद्रावर असल्यामुळें या शहराची वाढ झपाट्यानें होत चालली आहे. चांदणीचौक नांवाचा प्राचीन व सुंदर असा रहदारीचा भाग आहे. हिंदू लोकांची कित्येक अर्वाचीन मंदिरें पहाण्यासारखीं आहेत. शहराजवळच यमुना नदीस सुंदर घाट बांधिले आहेत. दिल्ली शहराचें मध्यभागीं बर्नबॅस्टियन रोड ११५ या ठिकाणीं **महाराष्ट्र समाज** स्थापित झालेला असून महाराष्ट्रीय प्रवाशांची या ठिकाणीं उतरण्याची सोय झाली आहे.

सोनिपत शहराचें वर्णन:—पंजाबांत रोहोतक जिल्ह्यांत सोनिपत हें एक तालुक्याचें ठिकाण आहे. हें नॉर्थ वेस्टर्न रेलवेचें स्टेशन आहे. दिल्लीहून सोनिपत अठ्ठावीस मैल आहे. सोनिपत शहर एका टेकडीवर वसलेलें असून या टेकडीच्या चारी बाजूंनीं झाडी आहे. कोणी म्हणतात कीं, अर्जुनाच्या तेराव्या पिढींत महाराज सोनी या नांवाचा एक पराक्रमी पुरुष होऊन गेला, त्यानें हें शहर स्थापित केलें त्यावरून सोनिपत असें नांव पडलें इ. स. १८६६ या वर्षीं सोनिपतच्या किल्ल्याच्या आजूबाजूस खणतांना एक सूर्याची मूर्ती आढळली असें म्हणतात. इ. स. १८७५ सालीं किल्ल्याच्या दुसऱ्या बाजूस खणल्यावर बाराशें चांदीचे शिक्के सांपडले. वरील शिक्के व सूर्याची मूर्ती लाहोर येथें म्यूझिअम मध्यें

नेण्यांत आला असें इकडील लोक सांगतात. सोनिपत शहराची लोकसंख्या सुमारें तेरा हजार असून त्यांत अर्धे मुसलमान व अर्धे हिंदू आहेत. मुसलमानांत सय्यद लोकांचा भरणा विशेष आहे. व हिंदूत जाट व महाजन यांचा भरणा विशेष दिसतो. तालुक्याचे सर्व अधिकारी येथें रहात असून त्यांच्या कचेऱ्याहि येथेंच आहेत. शहरांत पोष्ट व तार ऑफीस, म्युनिसिपालिटी, हॉस्पिटल इ० संस्था असून—इंग्रजी शिक्षणाचीं दोन हायस्कुलें आहेत. एक एम्. बी. हायस्कूल व दुसरें हिंदू हायस्कूल. शहराच्या बाहेर रेल्वे लाईनीस लागून "**शंभूदयाल**" या नांवाचा एक पाण्याचा तलाव आहे. हा तलाव फार प्राचीन आहे असें इकडील लोक म्हणतात. कांहीं बांधकाम तुटलेलें असून, तळयाच्या एका बाजूस सुंदर घाट बांधिलेले दिसतात. हा तलाव **मराठ्यांनीं** बांधिला असेंही कित्येक लोक सांगतात. तळयाच्या कांठीं एक प्राचीन मंदिरही दिसून येतें. सोनिपत गांवांतील पाण्याच्या विहिरी अगदीं निरुपयोगी आहेत. त्यांचें पाणी मचूळ (खारें) असतें. यासाठीं पिण्याचें पाणी गांवाबाहेरील विहिरींतून आणावें लागतें. येथील हवापाणी फार उत्तम असून लोक धष्टपुष्ट दिसून येतात. सोनिपत तालुक्यांत एकंदर दोनशें एकेचाळीस गांवें असून जमीन फारच सुपीक आहे. कापसाची लागवड थोड्या प्रमाणांत होते. येथें कापसांतील सरकी काढून गठ्ठे दाबण्याचा एक कारखानाही आहे. सोनिपत स्टेशनजवळच एक मंडी (बाजार) आहे. येथें तुपाचा व्यापार मोठ्या प्रमाणांत चालतो. सोनिपत शहरांत हिंदूंचीं कित्येक देवळें असून मुसलमान लोकांच्या मशिदीही पुष्कळ दिसतात. येथें खजुराचे पंखे चांगले बनतात. सोनिपत स्टेशनजवळ "**धी पंजाब शुगर कॉरपोरेशन लिमिटेड**" या नांवाचा साखर तयार करण्याचा एक कारखाना आहे. तेथें सुमारें ६०० मनुष्यें काम करीत असलेलीं दिसतात. या कारखान्यांत गुळापासून साखर तयार करण्यांत येते, अशा साखरेस "**खांड**" असें म्हणतात. शिवाय उंसाच्या हंगामांत

उसापासूनही साखर तयार होते. कारखान्यांतील यंत्रें चालू असत ना आंत जाऊन निरनिराळया यंत्रांचे निरीक्षण करूं लागलें म्हणजे क्षणभर विस्मय वाटतो. " **धी गणेश फ्लोअर मिल्स अँण्ड को, लायलपूर** " हे या कंपनीचे मॅनेजिंग एर्जटस् आहेत. एकंदरीत हा कारखाना पहाण्यासारखा आहे यांत शंका नाहीं. सोनिपत—पानिपत असे एकत्रित म्हणण्याची रूढी आहे पण या दोन ठिकाणामध्यें सुमारें सत्तीस मैलांचें अंतर आहे.

पानिपत शहराचें वर्णन व इतिहासः—पानिपतचें नांव माहीत नाहीं असा सुशिक्षित मनुष्य कचितच सांपडेल. इतकेंच नव्हे तर पानिपतचें नांव उच्चारल्या बरोबर युद्ध विषयक कल्पनांचें डोक्यांत काहूर उठतें, यामुळें हिंदुस्थानांतील निरनिराळया प्रांतांतील प्रवासी पानिपत येथें निरनिराळया उद्देशानें नेहमीं येत असतात. पानिपतचें नांव काढल्याबरोबर, महाराष्ट्रीय मनुष्य मोठ्या उत्कंठेनें दुसऱ्यास विचारतो, पानिपतला मराठ्यांचें कांहीं आहे कां ? पानिपतला मराठ्यांचें काय आहे ? अथवा तेथें महाराष्ट्रीय प्रवाशानें कोणत्या गोष्टींचें निरीक्षण करावें ? इ. सर्व गोष्टींचा खुलासा या पानिपतच्या वर्णनांत केला आहे. यासाठीं प्रत्येक महाराष्ट्रीयास खालील वर्णन उपयुक्त होईल. पंजाबांत कर्नाल जिल्ह्यांत पानिपत हें तालुक्याचें ठिकाण आहे. कर्नाल जिल्ह्यांत एकंदर पानिपत, कर्नाल, ठाणेश्वर, कैथल असें चार तालुके आहेत. पानिपत शहर दिल्ली पासून चौपन्न मैलावर आहे. हें नार्थ वेस्टर्न रेलवेचें जंक्शन स्टेशन आहे. येथून एक शाखा रोहोतक येथें जाते व दुसरी झिंदकडे जाते. शहरापासून स्टेशन अगदीं जवळ आहे. ग्रँडट्रंक सडक शहराच्या खालून चाललेली आहे. या शहराची रचना एका टेंकडीवर करण्यांत आलेली आहे. टेकडी मधें घेऊन बाजूला गांव वसविण्यांत आला आहे. गांवांतून खालीं यावयाचें व पुन्हा वर जावयाचें म्हणजे एक मैल चढण-उतरण करावी लागते. तालुक्याचे सर्व अधिकारी येथें रहात

असून त्यांच्या कचेऱ्याही येथेंच आहेत. पानिपत शहराची लोकसंख्या सुमारें पंचवीस हजार आहे. हें शहर सुमारें तीन हजार वर्षांपूर्वी राजा दंडपाणी यानें वसविले व त्यावरून याचें नांव " पानिपत " असें पडलें अशी दंतकथा आहे. कोणी म्हणतात कीं–युधिष्ठिरानें, दुर्योधना जवळून जे पांच गांव मागितले त्या पैकींच हा एक आहे. कांहीं असले तरी हा गांव फार जुना आहे यांत शंका नाहीं. मुसलमानी अमदानींत या शहरास विशेष महत्त्व होतें. इ. स. १३९० मध्यें पानिपतहून हुमायून तघलखनें दिल्ली शहर लुटलें. पुढें त्याचा अबूबकर यानें पराभव केला. त्यानंतर हें शहर तातारखानाच्या ताब्यांत होतें, पण तैमुर-लंगाच्या आगमन समयीं त्यानें तें सोडून दिलें. पुढें बहिलोल लोदीचा पुत्र शिकंदर लोदी याच्या ताब्यांत कित्येक वर्षें पर्यंत हें शहर होतें. उत्तर हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या तीन लढाया येथें झाल्या. शहरांत पोस्ट व तार ऑफीस, म्युनिसिपालिटी, दवाखाना, इ. संस्था असून इंग्रजी शिक्षणाची दोन हायस्कूलें आहेत. एक मुस्लीम हायस्कूल दुसरें जैन हायस्कूल. या शिवाय प्राथमिक शिक्षणाच्या मुलामुलींच्या कित्येक शाळा आहेत. प्राथमिक शिक्षण उर्दू भाषेंत दिलें जातें. पानिपत येथें " गव्हर्नमेंट इंडस्ट्रियल स्कूल " या नांवाची जी संस्था आहे, तेथें कांहीं कलांचें शिक्षण देण्यांत येतें. ही संस्था अगदीं लहान प्रमाणावर चालत असलेली दिसते. टेकडीचा कांहीं भाग राखून ठेवण्यांत आला आहे. तेथें व्हिक्टोरिया मेमोरियल लायब्ररी, ए. व्ही. स्कूल, म्युनसिपल ऑफिस, पोलिसस्टेशन, इ. इमारती आहेत. येथें उभे राहून खालीं नजर टाकली म्हणजे सृष्टिसौंदर्य फार चांगलें दिसतें. संध्याकाळच्या वेळीं कित्येक लोक येथें भ्रमण करण्याकरितां येतात. बडीवाड मोहोल्ला, रांगडी मोहोल्ला, श्रावक वाडा, सराय खिरपी ओंकी, होळी मोहोल्ला, शिलंगियान मोहोल्ला, पचपीरान मोहोल्ला, मणीयार मोहोल्ला इत्यादि शहराचे मुख्य भाग आहेत.

शहरांतील देवळें व धर्मशाळा:—शहरांत सुमारें शंभराच्यावर मुसलमान लोकांच्या मशिदी आहेत, व दहाबारा वैष्णव मंदिरें आहेत. त्यांत श्रीरामचंद्राचे मंदिर, सत्यनारायणाचें मंदिर, देवीचें मंदिर, बैरागी मंदिर, इत्यादि प्रसिद्ध आहेत. याशिवाय जैन लोकांची एक दोन देवळें आहेत. श्रावक वाड्यांत एक जैन लोकांची धर्मशाळा असून, राजपूत मोहल्यांत एक ब्राह्मणांची धर्मशाळा आहे. बडीवाड मोहोल्यांत एक धर्मशाळा असून पानिपत स्टेशनवरही एक प्रशस्त धर्मशाळा आहे. शहराच्या मध्यभागीं "आर्यसमाज मंदिर" असून ग्रँडट्रंक सडकेस लागूनच आर्यसमाजानें एक नवीन इमारत बांधिली आहे. येथें सभोवार सुंदर बाग असून, शहराबाहेर असल्यामुळें स्वच्छ व मोकळी हवा उपभोगण्यास मिळते. येथें कित्येक प्रवाशी राहूं शकतात जवळच एक गोरक्षण संस्थाही दिसून येतें.

प्रेक्षणीय स्थळें:—शहराचे एके बाजूस "**कलंदर चौक**" या नांवाचें एक मुसलमान लोकांचे स्थान आहे. कलंदर या नांवाचे फार प्राचीन काळीं एक साधू होऊन गेले व त्यांच्या स्मरणार्थ हें स्थान बनविण्यांत आलें आहे. या ठिकाणीं दोन मुख्य इमारती आहेत. मुख्य इमारतीस पुढील बाजूस असलेले जे चार खांब आहेत ते काळ्या रंगाचे असून त्यांना "**कसोटीचेखांब**" असें इकडील लोक म्हणतात. या खांबावर सोनें घासले म्हणजे त्याची कसोटी ठरतें असें म्हणतात. मुख्य इमारतींत कलंदर याचें थडगें आहे. बाजूस असलेल्या इमारतींत सहा थडगीं आहेत. दोन्ही इमारतींना संगमरवरी दगड वापरला आहे. येथील नकशी फारच बहारीची आहे. हें ठिकाण पहाण्याकरितां कोणालाही मनाई नाहीं. हें नकशी काम ताजमहालाच्या नकशीपेक्षां कांकणभर सरसच ठरतें, असें मला वाटतें.

पानिपत येथील राममंदिर:—शहराच्या मध्यभागीं श्रीरामचंद्राचें मंदिर आहे. हे मंदिर मराठ्यांनीं बांधिलें. पानिपत येथें सर्व

लोक या देवळास " **मरहट्टोंका मंदिर** " असेंच म्हणतात. या मंदिरांत श्रीराम, लक्ष्मण, सीता अशा तीन मूर्ती स्थापन केलेल्या दिसतात. ह्या मूर्ती इतक्या उत्तम आहेत कीं सबंध पंजाब प्रांतांत अशा प्रकारच्या सुंदर मूर्ती फारच थोड्या ठिकाणीं सांपडतील. मंदिराचा बाहेरील दरवाजा व त्याला लागून असलेला कांहीं भाग पडक्या स्थितींत आहे. पंडीत अनूपराम नांवाचे एक गौड ब्राह्मण या मंदिरात रहातात. मराठ्यांनीं दिलेल्या कित्येक सनदा त्यांच्यापाशीं आहेत. " आमच्यापूर्वजांना पूजेबद्दल कांहीं गांव मराठ्यांनीं इनाम दिले होते " असें सदर्हू अनूपराम सांगतात. सध्या त्यांना लोकांकडून जे कांहीं मिळेल त्यावरच निर्वाह करून रहावें लागत आहे. या मंदिराच्याखालीं एक भुयार असून तेथून कोठें तरी एक गुप्त रस्ता जात असावा असें वाटतें. हल्ली हा मार्ग अजिबात बंद पडलेला आहे. कांहीं वर्षांपूर्वीं प्रो. देवल यांची सर्कस पानिपत येथें गेली असतांना, प्रो. देवल यांनीं मंदिराच्या दुरस्तीकरितां कांहीं रक्कम सदर्हू अनूपराम यांचेपाशीं दिली. परंतु मंदिराची कोणत्याही प्रकारची दुरुस्ती झालेली नाहीं. तसेंच ग्वाल्हेर संस्थानाधिपति कै० माधवराव महाराज शिंदे हे कुरुक्षेत्रास जात असतांना, त्यांनीं वाटेंत पानिपत येथें कांहीं वेळ मुक्काम करून रामचंद्राचे मंदिर पाहून पुजारी श्री. अनूपराम यांचे-पाशीं दुरुस्तीकरितां कांहीं रकम दिली. परंतु सदर्हू पुजारी यांनीं, दरवाज्याची व समोरील भागाची कोणत्याही प्रकारची दुरुस्ती केल्याचे दिसत नाहीं. असो. प्रत्येक महाराष्ट्रीय मनुष्यानें पानि-पतला गेल्यावर सदर्हू मंदिर अवश्य पहावें.

पानिपत येथील देवी तलावः—पानिपत शहराची रचना कशी आहे हें वाचकांना कळावें म्हणून येथें थोडासा आणखी खुलासा करण्याचें मी योजिलें आहे. मध्यें टेकडी व या टेकडीच्या बाजूनें गांव अशी रचना आहे. गांवाच्या एका बाजूच्या मनुष्यास पलीकडे

जावयाचे असले तर पहिल्यानें चढण चढून नंतर गावांतील बाजार संपल्यावर पुन्हा खालीं उतरावें तेव्हां तळजमीन लागते. शहराच्या दुसऱ्या बाजूस कित्येक पायऱ्या उतरून खालीं गेले म्हणजे "देवीतलाव" हें ठिकाण दिसूं लागतें. या ठिकाणीं पाण्याचा मोठा तलाव आहे. तळयाच्या तिन्ही बाजूंनीं सुंदर घाट बांधिलेले आहेत व बाजूस कित्येक अर्वाचीन मंदिरें बांधण्यांत आलीं आहेत. येथेंच एक श्री शंकराचें मंदिर आहे. या मंदिरावर "**मंगळराव रामचंद्र** संवत ११८० हिजरी" असा लेख आहे. या मंदिराजवळच दुसरेही एक मंदिर आहे. पण त्यावरील लेख नष्ट झाला आहे. या देवळास श्रीमनसा देवीचे मंदीर असें म्हणतात. ही दोन मंदिरे मराठ्यांनीं बांधिलीं असें इकडील लोक म्हणतात. देवी तलावही मराठ्यांनींच बांधिला असें म्हणतात. मराठ्यांच्या फौजेंतील घोडे येथेंच पाणी पिण्याकरितां येत असत. घोड्यांना स्वच्छ व चांगलें पाणी मिळावें म्हणून हा तलाव सदाशिवराव भाऊनें खोल खणविला व सभोंवार सुंदर घांट बांधिले असें इकडील लोक सांगतात. पानिपतचे सुखवस्तू लोक सकाळीं व संध्याकाळीं येथें फिरावयास येतात. एकंदरीत देवीतलाव म्हणजे पानिपतच्या लोकांचा एक मोठा अड्डाच आहे असें म्हटलें तरी चालेल. येथून थोड्याच अंतरावर इब्राहिम लोदीची कबर आहे. "इ. स. १५२६ मध्यें पानिपत येथें जी पहिली लढाई झाली तींत इब्राहिम लोदी या ठिकाणीं मारला गेला" अशा अर्थाचा उर्दू भाषेंत एक लेख येथें लिहिलेला आहे. हिंदुस्थान सरकारच्या "पुराणवस्तू संरक्षण" खात्याकडून या कबरेचें रक्षण केलें जातें. पानिपत तालुक्यांत एकंदर एकशें पंचाहत्तर गांवें असून त्यांत पांच मोठी गांवें आहेत. जमीन सर्वत्र चांगल्या मगदुराची आहे. पानिपत शहरांत पाण्याच्या पुष्कळ विहिरी आहेत पण पाणी फार खोल असतें. या प्रांतांत यमुनेचे पाट आणिले आहेत त्यामुळें शेती उत्तम

प्रकारची होते. कापसाची पैदासही थोड्या प्रमाणांत होते. कापसांतील सरकी काढून गठ्ठे दाबण्याचे कित्येक कारखाने गावांत आहेत. हवा पाणी फारच आरोग्यकारक असल्यामुळें इकडील लोक धष्टपुष्ट दिसतात. बाजाराची मांडणी उत्तर हिंदुस्थानांतील पद्धतीप्रमाणें असते. रस्ते अगदीं चिंचोळे, दोन्हीं बाजूस दुकानें, व मधल्या रस्त्यातून सर्व प्रकारची रहदारी सुरूं असते. ज्यांनीं आग्रा शहरांतील "**किनारी बाजार**" पाहिला असेल त्यांना उत्तरहिंदुस्थानांतील बाजारांची मांडणी कशी असते याची यथार्थ कल्पना होईल. पानिपत प्रांतांत हिंदुच्या लोकसंख्येंत जास्त भरणा जाट, आणि अग्रवाल महाजन या दोन जातींच्या लोकांचाच आहे. खेड्यापाड्यांतील बहुतेक लोक शेतकरी आहेत. साक्षरतेचें प्रमाण फारच थोडें पडतें. पानिपत येथें काशाचीं व पितळेचीं भांडी लोंकरीच्या कांबळी, अडकित्ते, चाकू, कात्र्या, इ. पदार्थ चांगले होतात. बैल व उंट या दोन प्राण्यांचा उपयोग शेतीकडे व मालाची ने आण करण्याकडे करितात. पुष्कळसा व्यापार, दिल्ली, अंबाला, पतियाळा, भिवानी, झिंद, रोहोटक या शहरांशीं होतो. पानिपत येथें दसऱ्याचे दिवशीं रामलीला नांवाचा उत्सव मोठ्या थाटानें केला जातो. या प्रांतांत पाऊस अगदीं थोडा पडतो. ग्रँड ट्रंक सडक हें दळणवळणाचें मुख्य साधन आहे. पानिपत येथें दूध व तूप फारच स्वस्त मिळतें.

पानिपत लोकसंख्येची मीमांसाः–पानिपत येथें सुमारें पंचवीस हजार मनुष्यवस्ती आहे असें मी मागें लिहिलें आहे. वरील लोकसंख्येंत एक तृतीयांश हिस्सा हिंदूचा असून दोन तृतीयांश मुसलमानांचा आहे. हिंदु जनतेंत ज्यास्ती भरणा जाट, व अग्रवाल, वैश्य या दोन जातींच्या लोकांचा असून, मुसलमान जनतेंत, रांगडे, पठाण, मुगल, सय्यद, शेख, इ. जातीचे लोक आहेत. पानिपतला मुसलमानांची बहु संख्या कां असा प्रश्न साहाजिकच उत्पन्न होतो. व त्याची कारणें माझ्या मतानें खालीलप्रमाणें आहेत. पहिलें पानिपत येथें व त्याच्या आसपास

कित्येक लढाया झाल्या. या सर्व लढायांचे वेळीं जे राजे आपल्या फौजा घेऊन इकडे आले ते सर्व अफगाणिस्थानांतील होते. लढाई आटोपल्यानंतर फौजेतील सर्वच लोक परत स्वदेशी गेले नाहींत तर त्यांतील कित्येक लोक इकडेच राहून दिल्लीच्या बादशहाची नोकरी करून राहिले. दुसरें दिल्लीच्या बादशहाची ज्यांनीं नोकरी पत्करली अशा लोकांना पानिपतच्या आसपासच्या जमिनी फुकट इनाम म्हणून देण्यांत आल्या. या जमिनी माफी आहेत. हल्लींही पानिपतच्या आसपासच्या सर्व जमिनींचे मालक मुसलमान असून कुळें हिंदू आहेत. अशा माफी जमिनी मिळत गेल्यामुळें मुसलमानांची संख्या दिवसेंदिवस ज्यास्त वाढूं लागली. तिसरें औरंगजेबानें बसवि-लेल्या "जिझिया" करास त्रासून नाइलाजानें कित्येक हिंदू मुसलमान झाले. या नवीन झालेल्या मुसलमानांना कसायाचें काम देण्यांत येई. पानिपत येथें दोनशें घरें कसायांचीं आहेत. इकडे रांगडे किंवा राजपूत म्हणून जी जात आहे. त्या जातींतील लोक आपणास राजपुत म्हणवितात, परंतु हे लोक धर्मानें मुसलमान आहेत.

पानिपत आणि मालेगांवः—लोक संख्येच्या मानानें जी स्थिती पानिपतची आहे तीच स्थिति महाराष्ट्रांत मालेगांव या ठिकाणचीही आहे. मालेगांव येथील लोक संख्येत हिंदू मुसलमानांचें प्रमाण एकास दोन आहे. पण मालेगांव आणि पानिपत या दोन्ही ठिकाणच्या हिंदूंकडे पाहिले म्हणजे जमीन अस्मानाचे अंतर दिसून येतें. पानिपतचे हिंदू किती सुसंघटीत, कट्टर व बलवान आहेत त्याची यथायोग्य कल्पना प्रत्यक्ष पानिपत येथें जाऊन राहिल्याशिवाय नीटपणें होणें शक्य नाहीं. पानिपतपासून तीन मैलांवर असलेले "**काळाआंब**" नांवाचें जे ठिकाण आहे त्याची समग्र माहिती दुसऱ्या भागांत देणें इष्ट वाटल्यामुळें ती येथें दिली नाहीं. या भूमीतील तिसरें मोठें शहर जे **कर्नाल** त्याची सविस्तर माहिती देऊन हा भाग समाप्त करितों.

कर्नाल शहराचें वर्णन व इतिहासः—पंजाब इलाख्यांत कर्नाल हें एक जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून नॉर्थ वेस्टर्न रेलवेचें स्टेशन आहे. ग्रँडट्रंक सडक शहराच्या मध्यभागांतून जात आहे. शहरापासून स्टेशन एक मैल दूर आहे. जिल्ह्यांतील निरनिराळ्या खात्यांचे वरिष्ठ अधिकारी येथें रहात असून त्यांच्या कचेऱ्याही तेथेंच आहेत. गुडगांव, रोहोतक, कर्नाल, हिसार ह्या चार जिल्ह्याचा एक विभाग करण्यांत आला आहे. मुख्य अधिकारी कमिशनर अम्बाला येथें रहातो. या शहराचें प्राचीन नांव "**कर्णालय**" असें होतें. राजा कर्ण याठिकाणीं रहात असे, व त्यानेंच हें शहर बांधिलें असें म्हणतात. शहराच्या मध्यभागीं एक मोठें तळें आहे त्यास "**कर्णतलाव**" असें म्हणतात. तळ्याच्या चारी बाजूंनीं सुंदर घाट बांधले असून देवळांची व धर्मशाळांची पुष्कळ संख्या दिसून येते. येथें सृष्टिसौंदर्य चांगलें दिसतें. सकाळीं व संध्याकाळीं हौशी लोक येथें जलक्रीडे साठीं येतात. कर्नाल शहराची लोकसंख्या सुमारें वीस हजार असावी. लोकसंख्येच्या मानानें हें शहर पानिपत पेक्षां लहानच आहे, पण जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असल्यामुळें येथें कांहीं जास्त शोभा दिसून येते. शहरांत, पोस्ट व तार ऑफिस, सिव्हिल हॉस्पिटल, म्युनसिपालिटी, वगैरे संस्था असून एक इंग्रजी शिक्षणाचें हायस्कूल आहे. प्राथमिक शिक्षकांना उच्च शिक्षण देणारें एक "नॉर्मलस्कूल" ही येथें आहे. याशिवाय श्रद्धानंद अनाथालय, कुरुक्षेत्र ब्रह्मपाठशाळा इ. खाजगी शिक्षण संस्थाही आहेत. ज्या भागांत सरकारी कचेऱ्या आहेत त्या भागास "**छावणी**" असें म्हणतात. शहरांत कित्येक हिंदू लोकांची मंदिरें असून शिवाय दोन मोठमोठ्या धर्मशाळा आहेत. येथील आर्य समाज सुसंघटित असून "**आर्यसमाज भवन**" पहाण्यासारखें आहे. कर्नाल शहरांत "**चौडा बाजार**" या नांवाचा जो भाग आहे तो फार रहदारीचा असून त्या भागांत सुखी व धनाढ्य लोक रहातात. कर्नाल येथील बूट, मातीच्या हंडया, कांचेच्या बांगड्या व खजुराचे पंखे इ. वस्तू प्रसिद्ध आहेत. कर्नाल पासून

सहा मैलावर " **कुंजपुरा** " म्हणून जें ठिकाण आहे त्याचें वर्णन दुसऱ्या भागांत देणें इष्ट वाटल्यावरून तें येथें दिलें नाहीं. या प्रमाणें दिल्ली-कुरुक्षेत्र भूमींतील जीं मोठीं शहरें आहेत त्या शहरांचें म्हणजे--सोनिपत, पानिपत कर्नाल-यांचे सविस्तर वर्णन झालें. यापुढें पानिपतच्या आसपासची म्हणजे पानिपत रणक्षेत्राच्या आसपासचीं सर्व खेडीं हिंडून तिकडील लोक ज्या ज्या गोष्टी सांगतात त्या सर्व एकत्र करून, त्या दुसऱ्या भागांत देण्यांत आल्या आहेत. या " **भाऊंच्या वीरकथा** " फारच मनोरंजक व चैतन्य उत्पन्न करणाऱ्या असल्यामुळें, प्रत्येक महाराष्ट्रीयानें त्या जरूर वाचाव्या इतकें सांगून मी दिल्ली-कुरुक्षेत्र भूमीच्या वर्णनाचा हा भाग पुरा करितों.

भाग दुसरा

भाऊंच्या वीरकथा

इतिहास हा एकच विषय असा आहे कीं ज्यानें मनोरंजन होऊन राष्ट्रांत नवचैतन्य उत्पन्न होऊन राष्ट्राचा उत्कर्ष होतो. आपल्या पूर्वजांच्या दुर्गुणांचा कीस काढीत न बसतां, ते दुर्गुण टाळून त्यांच्या सद्गुणांचा आपल्यांत परिपोष कसा होईल इकडे लक्ष दिलें पाहिजे. आपल्या लोकांत इतिहासा विषयीं जशी आवड उत्पन्न होण्यास पाहिजे तशी अद्याप झाली नाहीं. इतिहास हा पूर्वकाळीं घडलेल्या सत्य गोष्टी लोकांना सांगत असतो, आणि म्हणूनच कल्पित कादंबऱ्यांतील गोष्टी वाचण्यापेक्षां, इतिहासांतील घडलेल्या खऱ्या प्रसंगाची माहिती वाचणें लोकांना जास्त आवडते. पानिपतच्या तिसऱ्या लढाईस एकशें सत्तर वर्षे होऊन गेली. या लढाईचें सेनापतित्व सदाशिवरावभाऊ यांच्याकडे होतें. त्यापूर्वीं पानिपतला दोन लढाया झाल्या होत्या. पहिल्या दोन युद्धांत मोंगल विरुद्ध पठाण असा देखावा दिसत होता. परंतु तिसऱ्या युद्धांत समधर्मीयांचा सामना नसून विधर्मीयांचे म्हणजे हिंदू-मुसलमानांचे दोन तट एकमेकांला नामोहरम करण्याकरितां पानिपतच्या आखाड्यांत उतरले होते. हा हिंदुस्थानाच्या बादशाहीचा डाव होता. हिंदुंच्या सुदैवानें मुसलमानांना या युद्धांत इतकी जोराची थप्पड बसली कीं त्यांची बादशाही तर कोसळून पडलीच, परंतु हिंदुस्थानच्या लुटीची चट लागलेले, आर्य स्त्रियांची चवाठ्यावर अब्रू घेण्यास सोकावलेले, उत्तरेकडील लोक, हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे विसरून गेले आणि हाच तिसऱ्या पानिपतच्या युद्धाचा विशेष होय. त्यानंतर उत्तरेकडून हिंदुस्थानावर आक्रमण झालेंच नाहीं. उत्तरेकडील स्वाऱ्यांपासून अखिल हिंदुस्थानाला कायमचे वाचविण्याचें श्रेय महाराष्ट्राला आहे आणि हें कांहीं कमी नव्हे. म्हणून या पानिपतच्या युद्धासंबंधीं प्रत्येक महाराष्ट्रीयाला

आणि हिंदूला अभिमान वाटला पाहिजे. पानिपतच्या अपयशाची जबाबदारी सदाशिवराव भाऊंच्यावर कितपत येते हा प्रश्न ज्याचा त्यानें आपल्या भावनेनुसार सोडवावयाचा आहे. पानिपतावर भाऊ-साहेबांस जयश्रीनें माळ घातली असती तर समग्र हिंदुस्थानाचा भावी इतिहास साफ बदलून गेला असता, तोफखान्याच्या व फौजेच्या जोरावर मराठे कसे अजिंक्य झाले असते इत्यादी कल्पना डोक्यांत येतात. या कल्पना बाजूस ठेवून या युद्धाच्या परिणामाचा विचार केला तरी पानिपत सारखें अरिष्ट महाराष्ट्रानें मोठ्या धैर्यानें सहन केले आणि आपले राष्ट्रीय धोरण पूर्ववत चालविलें, ही कांहीं लहान सहान गोष्ट नव्हे. पानिपतचा हा संग्राम महाराष्ट्रीयांची किर्ती "यावच्चंद्र दिवाकरौ" उज्वल राखील यांत शंका नाहीं.

या एकशें सत्तर वर्षांपूर्वी घडलेल्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धामुळें जशी महाराष्ट्रांत एक मोठीच क्रांती झाली तशी तिकडील लोकांच्या मनोरचनेंत या युद्धामुळें क्रांती घडून आली. आज इतकीं वर्षें होऊन गेलीं तरी तिकडील लोकांच्या जिभेवर सदाशिवरावभाऊ, विश्वासराव, नानाराव, जनकोजी, मल्हारराव इ. नांवें अद्याप पर्यंत खेळत आहेत. तिकडील लोक या संबंधानें गोष्टी बोलावयास लागले किंवा गाणीं गावयास लागले, म्हणजे हें पानिपतचें युद्ध नुकतेंच घडले असावे असा ऐकणारास भास होतो. तिकडील लोक सदाशिव-रावभाऊंच्या संबंधानें ज्या गोष्टी सांगतात त्या फारच मनोरंजक व चैतन्योत्पादक आहेत यांत शंका नाहीं. या गोष्टी पानिपत व आस-पासचीं १५।२० गांवें, कर्नाल, कुंजपुरा व कुरुक्षेत्र इ. ठिकाणींच ऐकावयास मिळतात. या गोष्टी वंशपरंपरागत चालत आल्या आहेत. या गोष्टी किंवा हीं गाणीं, यांची ऐतिहासिक दृष्ट्या सत्यासत्यतेची जर मी छाननी करूं लागलों तर तो एक वादग्रस्त विषय होईल, या साठीं या गोष्टी जशाच्या तशाच महाराष्ट्रीय वाचकांपुढें ठेवण्याचें मी ठरविलें आहे. अलिकडे पानिपत संबंधाचें पुष्कळसे वाङमय प्रसिद्ध

झालेले आहे, परंतु पानिपतच्या आसपासच्या गांवाचे पूर्ण निरीक्षण करून, तिकडील लोक महाराष्ट्रीयांना किती पूज्य मानितात, त्या प्रांतांत मराठ्यांच्या आठवणी हल्लीं काय आहेत, मराठ्यांची स्मृतीचिन्हें कोठें आहेत, पानिपतच्या या युद्धाशीं संबंध असलेले असे कोणतें वाक्प्रचार तिकडील लोकांत अजून अस्तित्वांत आहेत, इ. गोष्टींचे खुलासेवार वर्णन महाराष्ट्रांत अद्याप कोणीही प्रसिद्ध केलेलें नाहीं. या गोष्टींची सत्यासत्यता, युक्तायुक्तता, किंवा योग्यायोग्यता, ही ठरविण्याचें काम इतिहास भक्तांकडे सोंपवून मी आपल्या मुख्य विषयाकडे वळतों.

या सोबत पानिपतच्या रणमैदानाचा एक स्वतंत्र नकाशा जोडला आहे. मी जीं जीं गांवें हिंडलों व ज्या मार्गानें प्रवास केला तीं गांवें व तो मार्ग विवक्षित खुणांनीं दाखविला आहे. सम्हालका, शिवाह, रसाळ, उग्राखेडी, राजाखेडी, बबैला, नगला, जांबा, सनौली, धनसौली, छाजपूर, निमरी, उँझा, डटोला, पसीना, इत्यादि गांवां-वरून पानिपतला आले म्हणजे रणमैदानाची पूर्ण प्रदक्षिणा होते. या प्रत्येक गांवांत जाऊन तेथील लोकांनीं ज्या ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या गांवांच्या अनुक्रमानें दिल्या आहेत. यानंतर पानिपतच्या उत्तरेकडील घरोंदा, कर्नाल, कुंजपुरा, कुरुक्षेत्र या ठिकाणी मराठ्यां-च्या फौजेनें कित्येक पराक्रमाच्या गोष्टी केल्यामुळें तिकडील गोष्टीही देण्यांत आल्या आहेत. या गोष्टी देतांना प्रत्येक गांवचे भौगोलिक वर्णनही देणें इष्ट वाटल्यावरून, तेंही देण्यांत आलें आहे. मी या प्रांतांत पायीं प्रवास केलेला असल्यामुळें, प्रत्यक्ष ज्या गोष्टी मी पाहिल्या आहेत त्यांचेच वर्णन त्या त्या गांवांच्या अनुरोधानें देण्यांत आलें आहे.

प्रवासांतील कार्यक्रमः—पानिपतच्या आसपासच्या प्रदेशांत प्रवास करण्यापूर्वी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून मी पायीं प्रवास केलेला आहे. हिंदी व इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान, राजकीय, सामा-

जिक व ऐतिहासिक विषयांचे विस्तृत वाचन, हिंदुस्थान देशांतील निरनिराळ्या जातींची साधारण माहिती, धैर्य, समयसूचकता, संस्कृत, वेद आणि ज्योतिष या विषयांचे थोडेसें ज्ञान, वेळ पडल्यास एखाद्या सामान्यविषयावर एखाद्या सभेंत कांहीं वेळ पर्यंत व्यवस्थित भाषण करतां येईल इतकी चतुरता, सत्य बोलणें व आपल्या गरजा फार थोड्या ठेवणें, इ. गोष्टी जर एखाद्या मनुष्याच्या आंगीं असतील तर त्यास या प्रदेशांतील प्रवासांत कोणत्याही प्रकारचे विघ्न येण्याचा संभव नाहीं. खिशांत पाव पै जरी नसली तरी सुद्धां या प्रदेशांतील लोक प्रवाश्यास पुष्कळ सहाय्य करितात, असा माझा अनुभव आहे.

एखादा मोठा गांव असल्यास, सन्मान्य वकील, डॉक्टर किंवा अशाच प्रकारचे सुशिक्षित लोक यापैकीं एखाद्याकडे जावयाचे साधारण गांव असेल तर, गांवचा मुख्य जमीनदार, हेडमास्तर किंवा विद्वान पंडित यापैकीं कोणाकडे तरी मुक्काम ठेवावयाचा, व त्यांच्या सल्ल्यानें आपला कार्यभाग उरकून घ्यावयाचा असा माझा या प्रवासांत कार्यक्रम असे. या सृष्टींत सज्जन पुष्कळ आहेत व दुर्जन फार थोडे आहेत, असा माझा अनुभव आहे. पुढील गांवीं सन्मान्य व्यक्ती कोण आहेत याची चौकशी अगोदर पासूनच करून ठेवून मी त्या गांवीं जात असे. दिल्लीहून ग्रँडट्रंक सडकेनें या प्रांतांत पायी प्रवास करण्यास निघाल्यावर "सम्हालका" या नांवाचे पानिपत तालुक्यांतील पहिलेंच गांव लागतें. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचें पानिपत तालुक्यांतील हेंच पहिले स्टेशन आहे.

सम्हालकाः—सुमारें २००० लोकवस्तीचा हा गांव पानिपत तालुक्यांत आहे. हा गांव ग्रँडट्रंक सडकेस अगदीं लागूनच आहे. येथें ए. व्ही. स्कूल, पोस्ट ऑफिस, पोलिसस्टेशन इ. संस्था असून डाक बंगलाही आहे. स्टेशन जवळच एक लहानशी मंडी (बाजार) आहे येथें थोड्या प्रमाणांत धान्य, व गूळ व गुळापासून तयार केलेली साखर (खांड) या दोन्ही जिनसांचा मोठ्या प्रमाणांत व्यापार

चालतो. गांवांत मुसलमान लोकांचा भरणा विशेष दिसून येतो. हिंदूंच्या लोकसंख्येंत गौड ब्राम्हण, अग्रवाल वैश्य, व जाट या तीन जातींच्या लोकांचा भरणा विशेषें करून आहे. " सम्हालका " येथील ए. व्ही. स्कूलचे हेडमास्तर यांच्याकडे माझा मुक्काम होता. या प्रांतांत " जोगी " नांवाची एक जात आहे. हें लोक गाणीं गाऊन व मोलमजुरी करून आपला चरितार्थ चालवितात. या जोग्यांतही दोन प्रकार आहेत हिंदू जोगी व मुसलमान जोगी. मुसलमान जोगी हे आपल्या जातीच्या स्वभावाप्रमाणें, गर्विष्ठ व मूर्ख असे दिसतात. पण हिंदू जोगी हे फारच सरळ व नम्र असलेले दिसतात. **भाऊकी गीत सुनावगे ?** भाऊंची कांहीं गाणीं म्हणून दाखवाल काय ? असा त्यांस प्रश्न केला असता मोठ्या आनंदानें होकारार्थी उत्तर देतात. ही गाणीं म्हणून दाखविण्याविषयीं मी त्यांस सांगितलें असता त्यांनीं गाणीं म्हटलीं तीं खालील प्रमाणें:—

जोग्यांची गाणीं:—

भाऊंची स्त्री भाऊंना उद्देशून म्हणते:—

(जाट लोकांचे गाण्याची चाल)

अजिक्या सन्मुख योगिनी आयी ॥ रहा चंद्रमा पिछा दबाई ॥ चील, गीध, काक रहे सिरमंडलाई ॥ अजिक्या खाली दोघड नारी आयी ॥ तुम लढने मत जावो साई ॥ तुम बेठो मेहेलोमें आकर ॥ बिना ललाटिया आया वेदाचारी॥ अजिक्या तुमको समझावे तेरी नारी ॥ लढने मत जावो मान हमारी ॥ मैं कहती सीस नमायके ॥

राज्य सब करणीसे पाते है ॥ क्या स्वप्नमे राजा रंक हो जाते है ॥ मुझे किसपे छोडे जाते है ॥ मै तो लढूंगी बांध हत्यार ॥ गिलचोंकी फौज बडी भारी ॥ वो तो अहमदशा खास दुराणी ॥ क्या तुम ल्यावता ब्याहाके राणी ॥ अब चल्या तूं मुझे भी छोडके ॥

भाऊ आपल्या स्त्रीस उद्देशून म्हणतोः—

हटराणी क्यों बक बक करती है ॥ तूं किस राजासे डरती है ॥ मराठेराज्य ब्राम्हणोंकी भरती है ॥ लढते है रणके अंदर जाकर ॥

ना नीच अंश खाते है ॥ ना परस्त्रीको हात लाते है ॥ त्रिकालीं संध्यास्नान वर्त जाते है ॥ रणमें लढते संमुख जाकर ॥ हमना गिलचोंसे डरनेके ॥ ना पीछे कदम धरनेके ॥ चाहे होजाय डोल मरणेके ॥

अर्थः—पतीनें पानिपत येथें जाऊं नये म्हणून भाऊंच्या स्त्रीनें परोपरीनें प्रार्थना केली, पुण्याहून निघतांना पुष्कळ अपशकून झाले असें या गाण्यांत म्हटलें आहे. ते अपशकून खालीं लिहिल्या प्रमाणेंः—

समोर योगिनी नक्षत्र, व चंद्र पाठीमागें, गिधाडें व कावळे आकाशांत फिरत आहेत, पाण्याच्या दोन रिकाम्या घागरी हातांत घेऊन स्त्री समोर येणें, गंध कपाळीं नसलेला ब्राम्हण समोर येणें इ.

वरील प्रमाणें अपशकून तुम्हांस झाले आहेत, व ह्यांचा विचार केला असतां आपण पानिपतला जाऊं नये, दक्षिणेंतच रहावे असें मला वाटतें. आणखी असें पहा कीं:—

राजसत्ता प्राप्त होणें, ही गोष्ट मागील कर्मांवर अवलंबून असते. राजाचा रंक होण्यास क्षणभर सुद्धां उशीर लागत नाहीं. राज्य वाढविण्याचा हा लोभ पुरे करा. मी इकडे कसें दिवस कंठू ? आपण पानिपतला गेल्यावर मला आधार कोणाचा ? यासाठीं मी सुद्धां तुमच्या बरोबर हत्यार बांधून लढाईवर येईन.

गिलच्यांची फौज पुष्कळ आहे व तो अहंमदशहा खास दुराणी आहे. माझा त्याग करून, दुराणीच्या मुलखांतील एखादी स्त्री घेऊन येण्याचा तर तुमचा विचार नाहीं ? अशा प्रकारच्या मार्मिक भाषणानें भाऊंना थोडासा राग आला, व त्यांनीं खालील प्रमाणें उत्तर दिलें:—

हे स्त्रिये, तूं ही निष्कारण, काय बडबड चालविली आहेस ? तुला कोणत्या राजाची एवढी भीति वाटते ? त्या अहमद-शहा दुराणीला मी हरविण्यास जाणारच. मराठ्यांचें राज्य असल्यामुळें ब्राह्मणांचा उत्कर्ष आहे. रणांत जाऊन लढणें हें आमचें सध्याचें कर्तव्य आहे.

आम्ही सात्विक आहार सेवन करितो, कोणत्याही परस्त्रीकडे वाईट नजरेनें पहात नाहीं. परस्त्री आम्ही माते समान समजतों. त्रिकालीं संध्याव्रत आचरितों, व वेळ पडल्यास समोरासमोर जाऊन लढाई करितों. आम्हीं गिलच्यांना भिणारे नाहीं. एक पाऊलसुद्धां मागें हटणारे नाहीं. शौर्याची पराकाष्ठा करून बलाढ्य शत्रूला सुद्धां जेरीस आणूं, हें पक्के समज.

सदाशिवराव भाऊंनीं पानिपत येथें लढण्यास जाऊं नये म्हणून मातेनें सांगितलें त्यावर भाऊनें दिलेला जबाबः—

दोहा

भाऊ बोल्या भावसे सुन माता मानी ॥
काबूलसे लादूं मुगलाणी भरवादूं पाणी ॥

अर्थः—भाऊ म्हणाले हे माते नीट ऐक. मी काबुलांतील मोंगल स्त्रियांच्या हातून आपल्या येथें पाणी भरावयास लावीन.

सम्हालका येथील ए. व्ही. स्कूल मधें सभा भरविण्याचें ठरून गांवांतील व मंडींतील कित्येक वृद्ध मंडळींना व एक दोन वृद्ध जोग्यांना सभेस येण्याविषयीं पाचारण केले. मी कोण, कोठला व या प्रांतांत कां हिंडत आहे याची माहिती शाळेच्या हेडमास्तरांनीं गांवांतील कांहीं वृद्ध जाट जमीनदारांनां अगाऊच करून दिली होती. व ठरलेल्या वेळेवर कित्येक जाट, बनिये आपल्या लांब लांब नळीच्या गुडगुड्या (हुक्के) हातांत घेऊन शाळेकडे येत असतांना दिसले. प्रथमारंभी कांहीं औपचारिक सवाल जबाब झाल्यावर हेडमास्तरांनीं

एकदम सूचना करून, ब्राह्मण, जाट, वैश्य, या जातींतील वृद्ध मंडळीना माझ्याजवळ आणून बसविले. त्यांनीं खालील कथा मला सांगितल्याः—

१ सुरजमल जाटानें दिलेला सल्ला भाऊनें ऐकिला नाहीं इतकेंच नव्हे तर सुरजमल जाटानें कांहीं फौज व द्रव्य सहाय भाऊस दिले असूनहि त्यानें त्यास भरदरबारांतून काढून दिले. नंतर आपली फौज घेऊन तो भरतपुरास निघून गेला.

२ मल्हारराव होळकरानें तोफेंतून असली गोळे सोडण्याऐवजीं नकली गोळे सोडले. मल्हारराव शत्रूस मिळाला होता.

३ भुल्लेखाँ नांवाचा एक तुवर सरदार पानिपतहून भाऊंना भेटण्याकरितां सम्हालका येथें आला. त्याचा उद्देश भाऊंची मर्जी संपादन करावी हा होता.

भुल्लेखाँ तुवर मिल्या पानिपत वाला ॥
घोडा दुशाला मिले इनाम मोतीकी माला ॥

अर्थः—भुल्लेखानानें भाऊंची मुलाखत घेऊन त्यांची मर्जी आपणावर व्हावी म्हणून भाऊंना घोडा, दुशाल व एक मोत्यांची माळ इत्यादि वस्तू नजर केल्या.

४ मराठ्यांचा पराभव झाला तेव्हां सुमारें दहा बारा उत्तम घोडी पानीपतहून पळत जात होती. या घोड्यांनां आमच्या गांवांतील लोकांनीं एका घरांत बंद करून ठेविले. ही घोडी इतकी उत्तम होती कीं ती खाश्या स्वारीची बसण्याची असावीत असा गांवांतील लोकांनीं तर्क केला. सुमारें चार दिवसांनीं कांहीं मराठे सरदार या घोड्यांना परत मागण्याकरितां सम्हालका येथें आले. कांहीं ठराविक रक्कम घेऊन ही घोडी परत देण्याचे गांवकऱ्यांनीं ठरविले व त्या मराठे सरदारांना त्यांच्या घोड्याजवळच रात्रीं ठेविले. सकाळी गांवकरी लोक त्या विवक्षित घराचे कुलूप उघडून आंत जाऊन पहातात

तों घोडीही नाहींत व सरदारही नाहींत. या सरदारांनीं आपापल्या घोड्यावर स्वार होऊन भिंतीवरून उड्यामारून दक्षिणेचा मार्ग धरला होता. या धाडसी कृत्यामुळें येथील लोक **"मरेठा लोग बडे सैतान होते है."** असें अजूनही म्हणतात.

सम्हालका येथून पानिपत अकरा मैल दूर आहे येथून पांच मैलावर **'शिवाह'** नांवाचें एक गांव लागते. शिवाह हा गांव ग्रँड्ट्रंक सडकेस अगदीं लागूनच आहे. येथील लोकांनीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या खालील प्रमाणें:—

५ **"भाऊ मरेठा" बडा बाँका लढनेवाला था, किसीकी बात नही मानता था"** भाऊ मरेठा हा चांगला लढणारा होता कोणी कांहीं सांगितलें तरी तो ऐकत नसे. सुरजमल जाटला "पाजी" म्हणून दरबारांतून हाकलून दिलें हें फार वाईट केलें." यासंबंधी दोहा:—

सुरजमल जाट आया भाऊके दरबार ॥
हाथ बांध मुजराकरे जो किया आदाब ॥
नजर दिखा दिया रुपिया एक लाख सत्तर हजार॥
जनकोजीनें दियी सैन कोई सामोविचार ॥

अर्थ:—सुरजमल जाटानें भाऊच्या दरबारांत येऊन हात जोडून मोठ्या आदबीनें मुजरा करून एक लक्ष सत्तर हजार रुपये नजर केले. इतक्यांत जनकोजीनें भाऊना कांहीं कानमंत्र सांगितला. "सुरजमल जाट अबदालीस मिळालेला आहे तेव्हां अशा मनुष्याशीं ज्यास्त संबंध ठेऊं नका. नीट विचार करा." अशा गोष्टी जनकोजीनें भाऊंना सांगितल्यावर भाऊंच्या मनांत सुरजमल विषयीं संशय आला.

६ "विश्वासरावास शहाकडून गोळी लागली नाहीं. मराठ्यांच्या फौजेंतील लोकांना अबदालीनें अगोदरच फितूर करून ठेविले होते. व या लोकांनीं संधी साधून विश्वासरावावर गोळ्या

झाडल्या. विश्वासरावाचें प्रेत पाहून भाऊ हत्तीवरून खालीं उतरला व ज्यानें विश्वासरावास मारले त्याचा प्राण घेण्याच्या इच्छेनें हातांत तलवार घेऊन धावतच सुटला. सैन्याला भाऊ हत्तीवर बसलेला दिसेना तेव्हां, विश्वासराव पडला व भाऊही पडला अशा खोट्या कंड्या सैन्यांत पसरल्या व जो तो आपला जीव बचावण्या करितां पळूं लागला. या लोकांना धैर्य देऊन थोपवून धरणारा कोणीही वीर त्यावेळीं पुढें झाला नाहीं. निशाण धरणाऱ्या लोकांनीं निशाणें खालीं केलीं. फौजेस निशाणें दिसेनात तेव्हां फौजेच्या मनांत निरनिराळे कुतर्क येऊं लागले. निशाण धरणारे लोक अबदालीनें फितूर करून ठेविले होते. हे लोक मधून मधून आपल्या कृतघ्नतेचा परिचय देत. भाऊ व विश्वासरावासारखे लढणारे वीर या दुनयेंत फारच थोडे सांपडतील. "

शिवाह या गांवावरून मधल्या रस्त्यानें **काळाआंब** कडे जावयाचे ठरविलें. येथून चार मैलावर असलेल्या **रसाळू** या गांवीं जाऊन पोंचलो. रसाळू येथें नंदराम नांवाचे वृद्ध जाट जमीनदार रहातात. शिवाय नानकराम नांवाचे वृद्ध गौड ब्राह्मण रहातात. हे दोघेही मोठे सज्जन गृहस्थ दिसले. पं. नानकराम यांचे सभ्यवर्तन त्यांचा तपस्वीपणा, त्यांचे औदार्य व प्रेमळपणा इ. गोष्टी माझ्या निदर्शनास आल्या. रसाळू गांवीं आल्या बरोबर पानिपतच्या रणमैदानाची हवा सुरू झाली. गांवाजवळ असलेली '**पापडथळी**' व '**आंबथळी**' हीं दोन भव्य पटांगणें पाहून मनांत पानिपत विषयक कल्पना येऊं लागल्या. खालीं, वर, चारी दिशांकडे एकसारखे पहात रहावें असेंच वाटे. जमीन पांढरी व कडक असून या मैदानांत मोठें झाड असें नाहींच. गुराख्यांचीं पोरें गाई म्हशी चारतांना मधून मधून दृष्टीस पडतात.

रसाळू गांवाच्या बाहेर आले म्हणजे 'उग्राखेडी' व 'निमरी' हीं गांवें दिसतात. 'पापडळथीं' व 'आंबथळीं' हीं जीं दोन भव्य मैदानें

दिसतात तेथें पूर्वी युद्धाचे वेळीं पेशव्यांनीं टांकसाळ पाडली होती. यामुळें या जमिनींत कधीं कधीं सोन्या चांदीचे शिक्के अजूनही सांपडतात. गुरे चारण्यास जी पोरें जातात त्यांनाही कधीं कधीं शिक्के सांपडतात. सोन्याच्या शिक्यांना (नाण्यांना) "अशरफिया" असें म्हणतात. या जमिनींत पुष्कळ द्रव्य आहे अशी इकडील लोकांची समजूत आहे. रसाळू गांवांतील लोक खालील प्रमाणें घडलेली गोष्ट सांगतात.

" सुमारें वीस वर्षांपूर्वी कांहीं महाराष्ट्रीय गृहस्थ आपल्या बरोबर उंट घेऊन या मैदानांत येऊन उतरले. हे लोक दिवसा झोपा काढीत व रात्री खणीत असत. याप्रमाणें सात दिवस खणल्यानंतर त्याना कांहीं द्रव्य सांपडले ते घेऊन प्रातःकाळच्या आंत हे लोक दूर निघून गेले. सकाळीं गुरें घेऊन चारण्याकरितां जी पोरें गेलीं त्याना पांच सहा फूट खोल खणलेले कांहीं खड्डे दिसले व बाजूस सात आठ चांदीची नाणीं सापडलीं. वरील घडलेल्या प्रकारामुळें आम्हालाही या जमिनींत इकडे तिकडे खोदण्याची इच्छा उत्पन्न झाली. परंतु आम्हांस अद्याप कांहींच सांपडलें नाहीं.

वरील गोष्ट ऐकल्यानंतर गांवांतील कांहीं मंडळीसह पापडथळी मैदानांत संध्याकाळीं फिरावयास जाण्याचें ठरवून, त्याप्रमाणें तेथें गेल्यावर गांवांतील कांहीं मंडळींनीं ज्या गोष्टी सांगितल्या त्या खालीं लिहिल्या प्रमाणें:—

७ भाऊच्या फौजेंत खाण्याचे पदार्थ संपल्यामुळें उपासमार सुरू झाली. आमच्या कडील सर्व विहिरी पाण्यानें भरलेल्या होत्या त्याही शुष्क झाल्या. शेवटीं चांदीचा एक शिक्का देऊन एक पेला पाणी व सोन्याचा एक शिक्का (अशरफिया) देऊन एक रोटी, या प्रमाणें स्थिती झाली. रोहोंतक मार्गानें येणारी शिधा सामुग्री अबदाली लुटीत असे. भाऊ इतक्या संकटांत सांपडला होता तरी तिळमात्र घाबरला नाहीं.

८ भाऊनें दक्षिणेंतून येतांना पुष्कळ पैसा आणिला होता. पराभव झाला तेव्हां जो तो पळत सुटला. कित्येक घोड्यांच्या वर मोहोरांनीं भरलेल्या पिशव्या होत्या. या घोडयांच्यावर स्वार नसल्या-मुळें ही घोडीं सैरावैरा धावूं लागलीं. या संधीचा इकडील कित्येक लोकांनीं फायदा घेतला व या घोडयावरील द्रव्य लुटले. अशा प्रकारें भाऊच्या धनानें श्रीमंत झालेले कित्येक लोक या प्रांतांत आहेत. या लोकांना पूर्वी "**भाऊका बन्या**" "भाऊच्या धनानें श्रीमंत झालेला," किंवा "भाऊचया धनानें बनलेला" असे इकडील लोक संबोधित असत. हल्लीं या लोकांजवळ विशेष संपत्ती नाहीं. '**खुबड्डू**' आणि '**सफीदम**' या दोन गांवांतील कित्येक जाट लोक अशा प्रकारचे आहेत. खुबड्डू हा गांव सोनिपत तहशील मध्यें आहे. सफीदम झिंद संस्थानांत आहे.

९ सदाशिवराव या लढाईंत मारले गेले नाहींत ते जिवंतच होते. कोणी म्हणतात कीं—पानिपत जवळ **ओसर** म्हणून एक गांव आहे तेथें ते कित्येक वर्षे रहात होते. कोणी म्हणतात कीं भाऊ कुरुक्षेत्रीं संन्यासी बनून राहिले होते. भाऊंच्या अंगीं कांहीं अशी-एकदम गुप्त होऊन पुन्हा दृश्य होण्याची एक दैवी ताकद होती असेंही कांहीं लोक म्हणतात.

१० भाऊंची राणी (स्त्री) या लढाईंत भाऊंच्या बरोबर आली होती. भाऊ नाहिसे झाल्यावर तिनें पुरुषाचा वेष घेऊन हातांत शस्त्र (तलवार) ही घेतलें होतें. एका शिपायानें ही गोष्ट अहमद-शहास कळविली तेव्हां त्यानें "स्त्री बरोबर कोणीही लढूं नका" असा हुकूम देऊन या स्त्रीची दक्षिणेंत रवानगी केली.

११ भाऊची राणी व त्यांचा पुतण्या यांनीं पानिपत येथें चाळीस वर्षे राज्य केलें.

१२ भाऊनें दिल्लीच्या जुम्मा मशिदीवर व तेथील लाल किल्ल्यावर तोफांच्या गोळ्यांचा भडिमार केला. इत्यादि कथाभाग खालील पद्यांत आहे. त्यावेळेस सुरजमल जाट हा सदाशिवराव भाऊंच्या बरोबर होता.

सुरजमल भाऊ रायासे फिर करे जबाब ॥
औलिया-याकूब अलीखाँ दोनो सरदार ॥
गाजुद्दीनखां वजीरनें हिकमत बतलायी ॥
जुम्मा मसाजिद को लिया घेर घर तोफ चढाई ॥
गोळा मान्या किलेमे कचेरी ढाई ॥
अवलिया याकूब अलीखाँ दिल दहशत खायी ॥
भरोसे बादशहाके यह जान समाई ॥
महाराज तुम लालकिला अपना करो जान बचाई ॥
सर्त नमक करचुके हम बंदे बादशाही ॥

अर्थः—सुरजमल जाटानें दिल्लीची जुम्मामशीद व लालकिल्ला यांच्यावर तोफांचे गोळे सोडूं नका अशी हिकमत भाऊस सांगितली, पण ती त्यांस रुचली नाहीं. तेव्हां किल्ल्यांत गाजुद्दीनखाँ नांवाचा एक वजीर व याकूब अलीखाँ नांवाचा एक सरदार रहात असे. या दोघांनीं मिळून आपला जीव वांचविण्याबद्दल भाऊस विनंती केली. पुढें दिल्लीचा लालकिल्ला भाऊंनीं हस्तगत केला.

रसाळू या गांवाहून निघून जवळच असलेल्या **'उग्राखेडी'** या गांवीं जाण्याचें ठरविलें. उग्राखेडी पासून "**काळाआंब**" अगदीं जवळ आहे.

उग्राखेडी

सुमारें एक हजार लोकसंख्येचा हा गांव पानिपत पासून पूर्वेस तीन मैलांवर आहे. गांवांत प्रायमरी स्कूल असून जाट लोकांची पुष्कळ वस्ती आहे. या गांवीं साधू गरीबदास पंथाचा एक मठ आहे.

या मठांत एक शंकराचे मंदिर असून शिवाय प्रवासी लोकांस रहाण्यासाठीं विस्तृत जागा आहे. कित्येक प्रवासी येथें रहातात. " **गरीबदास** " नांवाचे पूर्वी एक साधू होऊन गेले व त्यांनीं हा पंथ स्थापन केला. उग्राखेडी गांवांतील बहुतेक जाट ह्या पंथाचे अनुयायी आहेत. या पंथांत तंबाखू पिणें मना असल्यामुळें उग्राखेडी गांवांत कोणीही हुक्का पीत नाहींत. पानिपतहून जी एक सडक सनौलीस जात आहे त्या सडकेपासून थोड्याच अंतरावर हा गांव आहे. हा गांव म्हणजे अगदीं रणक्षेत्राचा मध्यच, असें म्हटले तरी चालेल.

उग्राखेडी गांवांतील बहुतेक जाट मिलिटरी खात्यांतील पेनशनर आहेत. मागील महायुद्धाचें वेळीं कित्येक जाट निरनिराळया रणक्षेत्रांतून जाऊन आलेले आहेत. गांवांत कित्येक सुशिक्षित लोकांचाही भरणा आहे.

गांवापासून चार फर्लांगावर एक मोठा खंदक दिसतो. या खंदकाची लांबी दोनशें यार्ड असून रुंदी पंधरा यार्ड दिसते. या ठिकाणीं पूर्वीं मराठ्यांच्या फौजेचा बाजार भरत असे असें म्हणतात. अलीकडे हा खंदक बुजत चालला आहे. तोफांचे किंवा बंदुकांचे गोळे मनुष्यांस लागू नयेत म्हणून जमीनींत खोल खंदक खणून आंत बाजार भरविण्याची चाल पूर्वीं होती असें म्हणतात.

उग्राखेडी गांवाच्या आसपास ज्या विहिरी आहेत त्या प्रत्येक विहिरी जवळ तोफ ठेवण्याकरितां उंच मातीचे बुरुज बांधिलेले दिसतात. हेतू हा कीं तोफ डागणाऱ्या किंवा तोफेस सरबत्ती देणाऱ्या मनुष्यानें ताबडतोब विहिरींत उडी टाकावयाची, म्हणजे त्यायोगें त्याच्या जिवास कोणत्याही प्रकारचा धक्का बसूं नये. पूर्वींच्या तोफा अलिकडील तोफांच्या सारख्या सुरक्षित नव्हत्या. या विहिरींच्या आजूबाजूचे बांधकाम ढासळून पडलेले दिसते. कित्येक विहिरी ढासळून पडलेल्या अजूनही दिसतात. या विहिरी पूर्वीं पासून अशाच स्थितींत आहेत असें इकडील लोक सांगतात.

उम्राखेडी हा गांव अगदीं रणमैदानांतच आहे असें म्हटले तरी चालेल. गांवाच्या आजुबाजूची बहुतेक सर्व जमीन लागवडीस आलेली आहे. कित्येक विहिरींचे पाणी फार खोल असून मधूर आहे. उम्राखेडीच्या आसपासची जमीन कांहीं कारणानिमित्त कित्येक शेतकरी खणतात तेव्हां जमीनींत, कित्येक युद्ध भूमीची साक्ष पटविणाऱ्या वस्तू सांपडतात. नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वी एका शेतकऱ्यास डोक्यांच्या चार मोठमोठ्या कवच्या सांपडल्या. यापैकीं एका कवचींत दांतही होते असें त्या जाटानें मला सांगितलें. याशिवाय घोड्यांचीं लांब लांब हाडें, तलवारींचें तुकडे, ढालींचे तुकडे, तीर, लोखंडाचे लांब लांब दांडे, शिशाचे भरींव गोळे, तांब्याच्या व पितळेच्या भांड्यांचे तुकडे, तंबू राहुट्यांचें सडलेलें कापड व खांब इत्यादि वस्तू नेहमीं सांपडतात. तोफांचे गोळे तर उम्राखेडी गांवांत घरोघर आहेत. कांहीं वर्षांपूर्वी या गांवांत एका जाटाला एक फारच मोठा तोफेचा गोळा सांपडला. हा गोळा आकारानें फारच मोठा असल्यामुळें, लाहोर येथील म्युझिअम मध्यें ठेवण्याकरितां नेण्यांत आला असें लोक सांगतात. पिंजारी लोक कापूस पिंजण्याकरितां जे लांकडाचे मोठमोठे दांडे (धोटे) वापरतात असे कांहीं दांडे नुकतेच एका जाटास जमीन खणीत असतांना सांपडले. हे दांडे त्यानें मला आणून दाखविले. या गांवांतील कोणासही सोन्याचे किंवा चांदीचे शिक्के अद्याप सांपडले नाहींत. तात्पर्य उम्राखेडीच्या आसपास जमिनींत कित्येक चमत्कारीक वस्तू आहेत व संधी मिळेल तेव्हां निरनिराळ्या ठिकाणीं खोदावयाची लोकांची महत्वाकांक्षा दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. उम्राखेडी पासून "काळाआंब" हे ठिकाण केवळ तीन फर्लांगावर आहे.

उम्राखेडी गांवांत तेजासिंग नांवाचे एक वयोवृद्ध जाट गृहस्थ रहातात. त्यांचे वय हल्लीं नव्वद वर्षांचें असावें असें लोक म्हणतात. आसपासच्या गांवांत त्यांच्या इतका वयोवृद्ध गृहस्थ दुसरा नाहीं.

यांना एक मुलगा असून त्या मुलाला सात मुलगे आहेत. यांना कानांनीं ऐकूं येत नाहीं, डोळयांनीं दिसत नाहीं व चालण्याची ताकद नाहीं. इ. स. १८५७ सालच्या बंडाची हकीगत यांनीं आपल्या डोळयांनीं पाहिली आहे. सदहू तेजासिंग व गांवांतील दुसरे कित्येक जाट गृहस्थ एकत्रित जमविल्यानंतर त्यांनीं पानिपतच्या तिसऱ्या लढाई संबंधानें ज्या गोष्टी सांगितल्या त्या खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१३ भाऊंच्या फौजेंत एक लाख घोडेस्वार असून शिवाय दुसरेही लढणारे लोक पुष्कळ होते. अहमदशहा जवळही इतकीच फौज होती. भाऊंच्या फौजेंत त्रेपन्न बाजार होते. भाऊनें दक्षिणेंतून निघतांना बावीस कोट रुपये खजिना आपल्या बरोबर घेतला होता. दोन हजार सईस (घोड्यांची चाकरी करणारे) भाऊंच्या बरोबर असून सुमारें एक हजार चक्कीपिसणाऱ्या (दळणाऱ्या) स्त्रिया होत्या. या स्त्रिया आमच्याच प्रांतांतील होत्या. दक्षिणेंतून आणलेल्या नव्हत्या.

१४ दक्षिणेंत नानाराव (नानासाहेब) राज्य करीत होता. विश्वासराव आणि जनकोजी हे फारच चांगले लढवय्ये होते. भाऊच्या सारखा वीर मागें कधीं झाला नाहीं व पुढें होणार नाहीं.

१५ भाऊच्या फौजेंत कांहीं काबुली शिपाई होते. हे शिपाई अहमदशहाला मराठ्यांच्या फौजेची खबर पोहोंचवीत. युद्ध ऐन रंगांत असतां याच काबुली शिपायांनीं विश्वासरावास गोळी घालून मारिले. विश्वासरावास गोळी लागलेली पाहून सदाशिवरावभाऊ हत्तीच्या अंबारींतून खालीं उतरला व कांहीं वेळानें दिसेनासा झाला. पुढें कांहीं बेजबाबदार लोकांनीं निरनिराळ्या खोट्या कंडया पिकवून फौजेस रणांगणांतून परावृत्त करण्याचे प्रयत्न केले. भाऊंचा सरदार मल्हारराव यानें या लढाईंत भाऊंचें नुकसान केलें. मल्हारराव शत्रूंस पूर्णपणें मिळाला होता.

उग्राखेडी येथील तेजासिंग व दुसरे कित्येक वयोवृद्ध गृहस्थ यांनीं मला त्यांगावीं दोन दिवस रहाण्याबद्दल आग्रह केला. परंतु यांत गांवकऱ्यांचा काय हेतू आहे हें एकाएकी माझ्या लक्षांत आलें नाहीं माझ्याजवळ कांहीं नकाशे, चोपड्या, कागद, पुस्तकें इत्यादि सामान असलेले, गांवकरी लोकांनीं पाहिले होते, शिवाय मी पुणें प्रांतांतील रहाणारा आहे ही गोष्टही लोकांना ठाऊक होती. तेव्हां भाऊराजाच्या दप्तरांतून कांहीं कागदपत्रें घेऊन पानिपतच्या रण-मैदानांत ठिकठिकाणीं खणून कांहीं धन मिळाल्यास पहावें या उद्देशानें मी हिंडत आहे असा उग्राखेडींतील सामान्य लोकांचा ग्रह झाला. या कल्पनेनें कित्येक लोकांच्या तोंडाला पाणी सुटले. दुसऱ्या दिवशीं गांवकरी लोकांनीं एकत्र जमून खालील कानमंत्र मला सांगितला.

भाऊराजानें आणलेली अगणित संपत्ती आमच्या या भूमींत गडप झाली आहे. शेवटीं हार झाल्यामुळें ही सर्व संपत्ती येथेंच राहिली. परंतु ही संपत्ती कोठें आहे हे निश्चित माहित नसल्यामुळें कोठें खणावें हें आम्हांस समजत नाहीं. आपण दक्षिणेंतील पंडित आहांत व भाऊराजाच्या कचेरींतून कांहीं महत्वाचे कागदपत्र आपणास पहावयास मिळाले असतील. कोणत्या ठिकाणीं धन आहे व कोठें खणावयाचें हें जर आपणांस माहित असेल तर तुम्ही व आम्ही मिळून रात्रीं खोदण्यास सुरुवात करूं. दिवसा खणणें इष्ट नाहीं. कारण सरकारचें भय आहे. यासाठीं आपण सात आठ दिवस उग्राखेडी गांवांत मुक्काम करावा. तुमच्या व आमच्या भाग्यांत असेल तसें होईल. जें काय सांपडेल त्यांतला अर्धा हिस्सा आपण घ्या व अर्धा भाग आम्हास पुरे. आपण ही गोष्ट सर्वांशीं बोलूं नये. गांवकऱ्यांनीं आपला बेत मला सांगितल्यावर मी त्यांना माझा भ्रमण करण्याचा उद्देश सांगितला व धनाच्या बाबतींत मला कांहींसुद्धां माहित नाहीं असें स्पष्टपणें सांगितल्यावर कित्येक गांवकरी निराश होत्साते आपल्या घरोघर निघून गेले व मीही दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं उठून ‘ **काळाआंब** ’ या ठिकाणीं जाऊन पोहोंचलों.

काळाआंबः—पानिपत पासून चार मैलावर पूर्वेस उग्राखेडी व राजाखेडी या दोन गांवांचे दरम्यान काळाआंब नांवाचें ठिकाण आहे. पानिपतहून एक सडक ' नगला ' येथें जाते व दुसरी एक सडक ' सनौली ' येथें जाते. दोन्ही सडका पक्या नसून कच्या आहेत. " काळाआंब " स्मारक पहाण्यास जाणें असेल तर पानिपतहून राजाखेडीस यावें व तेथून काळाआंब फक्त अर्धा मैल पडते. पानिपतहून उग्राखेडीस येऊन नंतर काळा आंब येथें गेले तरी अंतर सारखेंच पडतें.

इतिहासः—काळा आंब या नांवाचे फार जुनें असें आंब्याचें झाड होतें. या झाडाचीं पानेंही काळ्या रंगाची होती व याची फळेंही काळ्या रंगाची असत, हें झाड विस्तारानें फारच मोठें होतें. काळ्या-आंबच्या आसपास दुसरीही कित्येक लहान मोठीं झाडें होतीं, म्हणजे येथें एक सुंदर असा नैसर्गिक बागच होता असें म्हटले तरी चालेल. याठिकाणीं सदाशिवरावभाऊंचा खजीना होता असें इकडील लोक म्हणतात. कित्येक लोक याठिकाणीं ' खाशा स्वाऱ्यांचा डेरा होता ' असेंही म्हणतात. कित्येक लोक याठिकाणीं भाऊचा दरबार भरत असे असेंही म्हणतात. कांहीं असले तरी, वृक्षांची गर्द झाडी असल्यामुळें, व रणांगणाच्या मध्यभागीं असल्यामुळें, याठिकाणास त्याकाळीं पुष्कळ महत्व प्राप्त झालें होतें यांत शंका नाहीं.

हें झाड विस्तारानें इतकें मोठें होतें कीं सुमारें पांच सातशें गुरें दुपारच्यावेळीं या झाडाच्या आश्रयानें बसत असत. या झाडाशेजारीं असलेलीं दुसरीं झाडें नष्ट होत जाऊन शेवटीं हें एकच आंब्याचें झाड राहिलें होतें. हें झाड असतांना आपण तेथें खेळत असल्याचे कित्येक लोक सांगतात. इ. स. १९०३ सालीं या झाडास आग लावण्यांत आली. राजाखेडीच्या एका सुतारानें या झाडास आग लावली असेही कित्येक लोक सांगतात. ह्या ठिकाणीं भाऊंचा डेरा

होता व येथें खजीनाही होता. तेव्हां तेथें कित्येक मौल्यवान वस्तू व पुष्कळसें धन असले पाहिजे या समजुतीनें हे झाड जाळण्यांत आलें. हें झाड जाळून टाकण्यासंबंधी राजाखेडी येथील लोकांचा एक कटच होता असेंही म्हणतात. हें झाड जाळल्यामुळें राजाखेडी येथील कित्येक लोकांवर पोलीस खात्याकडून खटले भरण्यांत आले होते व कांहीं इसमांना याबद्दल थोडासा प्रसादही मिळाला असें मला समजलें. हें झाड जळाल्यानंतर नुसत्या कोळशापासून पासष्ट रुपये या जमिनीच्या मालकास मिळाले असें म्हणतात. शिवाय लाकडांपासून वेगळेंच उत्पन्न झालें. असो.

काळा आंबचे स्मारकः—पुढें इ. स. १९०८ सालीं या ठिकाणीं एक स्मारक पंजाब सरकारकडून बांधण्यांत आलें. हें स्मारक लाल विटांनीं बांधिलें असून चारी बाजूंना संगमरवरी टॅब्लेटस् बसविण्यांत आल्या आहेत. तळ जमीन संगमरवरी पांढऱ्या दगडाची असून बाजूस लोखंडी खांबांचें मजबूत कुंपण आहे. स्मारकाच्या एका बाजूस खालील प्रमाणें शिलालेख आहे.

" This Pillar marks the site of the BLACK MANGO TREE near which was fought the third Battle of Panipat between Ahmed shah Abdali and the Maratta confedaracy in 1761 "

ह्या स्मारकाच्या चारी बाजूंनीं शेती होते. एकास लागून एक अशीं शेतें असून एक वीतभर जागासुद्धां रिकामी नाहीं. हीं शेतें पानिपतच्या मुसलमानांच्या मालकीचीं आहेत. ह्या जमिनी त्यांच्याकडे वंशपरंपरागत असून जमिनींचीं कुळें हिंदू आहेत. हीं कुळें राजाखेडी गांवांतील आहेत. ह्या जमिनींत पीक चांगलें येतें. विहिरींचें पाणी शेतीकरितां उपयोगीं पडते. गहूं, चणा, उडीद, लसूण, कांदे, मसूर, कपास, मिरची, ऊंस इत्यादि पिकें या जमिनींत होतात. जमीन पांढरी वाळुकामिश्रित असून फारच सख्त आहे.

पानिपत पासून उग्राखेडी व राजाखेडी या दोन गांवांच्या मध्यें असणारी जी जमिनीची पट्टी तिला '**सुवाखेडी**' असें म्हणतात. पूर्वी सुवाखेडी या नांवाचें गांव होतें. हें गांव तिसऱ्या लढाईच्यावेळीं मोडलें. पूर्वी पानिपत, सूवाखेडी, बबैल, सनौली अशीं चारच गांवें होतीं. बाकीचीं गांवें म्हणजे उग्राखेडी, राजाखेडी, निमरी, उंझा रसाळू, धनसौली, छाजपूर हीं गांवें लढाईनंतर वसविण्यांत आली.

या सुवाखेडी भागांत एकंदर बासष्ट विहीरी आहेत. कित्येक विहीरी लढाईच्या वेळेस ढासळलेल्या अशा अद्याप दिसतात. प्रत्येक विहीरीं जवळ एक मातीचा बुरुज बांधलेला दिसतो. कांहीं बुरुज शेतकऱ्यांनीं आपल्या सोईकरितां तोडून टाकिले. सारांश हा 'सूवाखेडी' भाग म्हणजेच पानिपतचें रणक्षेत्र असें म्हटलें तरी चालेल. काळाआंब हें ठिकाण या पट्टीच्या अगदीं सीमेवर येतें. काळा आंबच्या पूर्वेस निमरी येथील लोकांच्या जमिनी आहेत.

लोकांची अंधश्रद्धाः—काळया आंबच्या स्मारकाजवळच हजारीलाल नांवाच्या ब्राम्हणाचें शेत आहे. हा हजारीलाल राजाखेडी गांवात राहातो. शेतांत त्यानें एक लहानसे झोपडें बांधिले आहे. हजारीलाल हा आद्यगौड ब्राह्मण आहे. काळा आंब स्मारक, पहाण्याकरितां कित्येक महाराष्ट्रीय गृहस्थ मधून मधून येतात. व अशा लोकांकडून हजारीलाल यास कांहीं प्राप्तीही होत असते असें त्यानें मला सांगितलें. जवळ जी दुसरी शेतें आहेत ते लोकही राजाखेडी येथीलच राहाणारे आहेत. हजारीलाल अगदी वयोवृद्ध गृहस्थ आहेत त्यामुळें आजूबाजूच्या शेतकरी लोकांचा बसण्याचा अड्डा या झोपडींत असतो. या ठिकाणीं संध्याकाळ झाल्यामुळें, या झोपडींतच मुक्काम करण्याचें मी ठरविलें. या झोपडींत जमलेल्या कित्येक गृहस्थांनीं माझे स्वागत करून मोठ्या प्रेमानें लांब नळीचा हुक्का पिण्यास दिला. व धूम्रपान चालू असतां कित्येक निरनिराळ्या गप्पाही सुरुं झाल्या.

कर्नाल जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार अगदीं थोड्या प्रमाणांत दिसून येतो. मला वाटतें सर्व पंजाबभरही हीच स्थिती आहे. एखाद्या गांवांत लिहितां वाचतां येणारी अशी थोडीं माणसें सांपडतात.

नंतर पानिपत संबंधी गोष्टी सुरूं झाल्या तेव्हां हजारीलाल व दुसरे जमलेले लोक यांनीं खालील कथा सांगितल्या.

१७ भाऊनें कुंजपुऱ्याच्या नबाबाचीं धान्याचीं कोठारें जाळलीं व हा शाप त्यास लागला, व म्हणून हार झाली. या कोठारांतील धान्य भाऊनें आपल्या फौजेंत जर उपयोगांत आणले असते तर फारच चांगले झाले असते. भाऊंच्या आंगीं अद्वितीय शौर्य होतें.

१८ भाऊ मेला नव्हता कुरुक्षेत्रीं संन्यासी होऊन राहिला होता. दक्षिणेंत परत जाण्याची त्याची इच्छा नव्हती.

१९ भाऊच्या घराण्यांतील पुरुषांनीं पानिपतवर पुन्हां चालून येऊन अब्दालीस अगदीं जेरीस आणून सोडिले व पानिपतवर चाळीस वर्षें राज्य केलें.

या काळाआंबच्या आसपास पुष्कळ धन आहे. काळाआंब येथें तर भाऊचा खजीना होता. तुमच्याजवळ जर कांहीं भाऊराजाच्या वेळचीं खतपत्रें असतील तर आपण खणण्यास सुरुवात करूं असें हजारीलाल म्हणाला. माझ्याजवळ तशा प्रकारचें कांहीं नाहीं असें मी साफ सांगितलें तेव्हां या मंडळींनीं निराळाच बेत ठरविला.

"तुम्ही भाऊच्या जातीचे ब्राम्हण आहांत व त्या प्रांतांतील रहाणारे आहांत तेव्हां आज रात्रीं तुम्ही " काळा आंब " स्मारकापाशीं झोपावें. रात्रीं स्वप्नांत सदाशिवरावभाऊ किंवा विश्वासराव येऊन धन कोठें आहे तें तुम्हास खात्रीनें सांगतील व नंतर उद्यांपासून आपण खणण्यास सुरुवात करूं. तुमच्या व आमच्या नशिबांत जसें असेल तसें होईल. ही गोष्ट कोणाही परक्या मनुष्याशीं बोलूं नका." असें श्री. हजारीलाल यांनीं आपले मनोगत मला कळविलें.

ठरल्या प्रमाणें अगदीं काळा आंब स्मारकाच्या खांबांना लागून माझी खाट टाकण्यांत आली व मीही तेथें जाऊन कांहीं मंडळींशीं गप्पा सांगत झोपीं गेलों. थकलेला असल्यामुळें लवकर झोंप लागली. रात्रीं स्वप्न वगैरे कांहीं पडलें नाहीं. विश्वासराव किंवा भाऊ यांपैकीं कोणींही स्वप्नांत येऊन धन कोठें आहे तें सांगितलें नाहीं. प्रातःकाळीं हजारीलाल व इतर मंडळी मोठ्या उत्सुकतेनें मला स्वप्ना संबंधीं विचारण्यास आली व माझें निराशाजनक उत्तर ऐकून दुःखी होऊन आपापल्या कामास लागली व मीही राजाखेडी येथें निघून गेलों.

राजाखेडीः—सुमारें सातशें लोकसंख्येचें हें गांव पानिपत पासून तीन मैलांवर आहे. गांवांत प्रायमरी स्कूल असून जैन लोकांची वस्ती बरीच आहे. राजाखेडी व काळाआंब यांच्यामध्यें एक लहानसा नाला वहात आहे. यांस इकडील लोक '**डाबड**' असें म्हणतात. राजाखेडी गांवास '**खेडी**' असेंही म्हणतात. पाऊस पडला म्हणजे जमीनींतून हाडांचे तुकडे सर्वत्र वर आलेले दिसतात असें लोक सांगतात.

राजाखेडी येथून निघून बबैल, नगला, सनौली, धनसोली, छाजपूर हीं गांवें हिंडल्यानंतर पानिपतच्या रणमैदानाची पूर्ण प्रदक्षिणा होते. या गांवांतील लोक बहुतेक एकाच प्रकारच्या गोष्टी सांगतात. या गोष्टींत नाविन्य असें कांहींच दिसत नाही सबब त्याच गोष्टी पुन्हां पुन्हां देणें इष्ट वाटत नाहीं.

धनसोलीस सांपडलेली ढालः—धनसोली येथें सुमारें वीस वर्षांपूर्वी एका जाटास जमीन खोदतांना एक मोठी ढाल सांपडली. या ढालीचा बहुतेक भाग नष्ट झालेला होता. ढालीच्या आंतील एका कप्प्यांत एक चिठी सांपडली सदहू जाटानें भित्रेपणानें ती चिट्ठी पानिपतच्या तहशील कचेरींत नेऊन दिली. पानिपतच्या तहशिलदारानें ती चिट्ठी कर्नाल जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडे पाठवून पुढें तेथून त्या

चिठ्ठीची रवानगी लाहोर येथें झाली. सदर्हू चिठ्ठी मराठी भाषेंत असल्यामुळें पंजाब सरकारानें ती मुंबई सरकाराकडे भाषांतराकरितां पाठविली. या चिठ्ठीचें भाषांतर होऊन पुन्हां ती पानिपत तहशीलदाराकडे परत आली. चिठ्ठीवरील मजकूर खालील प्रमाणें आहे.

" मोहरांनीं भरलेल्या कांहीं थैल्या एका विहिरींत टाकून आम्ही दक्षिणेंत निघून जात आहोंत. "

त्यानंतर धनसौलीच्या आसपासच्या कित्येक विहिरी तपासण्यांत आल्या परंतु कांहीं सांपडलें नाहीं.

पानिपत येथील कित्येक सुशिक्षित गृहस्थांना मागें लिहिलेल्या " **भाऊंच्या वीर कथा** " वाचून दाखविल्या. या संबंधानें मी जसजसी जास्त चौकशी करीत गेलों तसतसी मला जास्त माहिती मिळत गेली. या प्रांतांतील लोकांच्या भाषणांत, भाऊंच्या संबंधाचे कित्येक वाक्प्रचार अजूनही अस्तित्वांत आहेत असें कित्येक सुशिक्षित मंडळींनीं मला सांगितलें. हे वाक्प्रचार खालील प्रमाणें.:—

भाऊकी लूटः—जर एखादा मनुष्य दुसऱ्या एखाद्या मनुष्यापाशीं कांहीं उपयोगी वस्तू किंवा पदार्थ, फुकट मागू लागला तर तो दुसरा मनुष्य पहिल्या मनुष्यास '**क्या भाऊकी लूट है**' असा प्रश्न विचारितो.

वरील वाक्प्रचाराचे दोन अर्थ संभवतात. एक भाऊनें केलेली लूट, दुसरा—भाऊची झालेली लूट. पैकीं कोणता अर्थ कितपत योग्य दिसतो याचा विचार करूं:—

ता. १५ आगष्ट १७६०च्या सुमारास सदाशिवरावभाऊ दिल्लीस फौजेसह येऊन पोहोंचले. तेथें दोन महिने पावसाळ्या निमित्त त्यांनीं मुक्काम करून ता. १० आक्टोबरच्या सुमारास 'कुंजपुरा' हें ठिकाण घेतलें. कुंजपुरा येथें समदखान व कुतुबजंग या नांवाचे दोन सरदार होते. कुंजपुऱ्यास असलेल्या मुसलमानी फौजेचा पूर्ण पाडाव करून, तेथें कांहीं लूट मराठ्यांना मिळाली.

परंतु मराठ्यांच्या अफाट फौजेच्या गरजा भागवून तद्देशीय लोकांस या लुटी पैकीं अगदीं अल्प सुद्धां भाग मिळाला असेल असें संभवत नाहीं. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां भाऊनें केलेली लूट असा अर्थ सयुक्तिक दिसत नाहीं. मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर जी पळापळ झाली त्यांत मराठी सैन्याची लूट झाली त्यावरून "भाऊची झालेली लूट" असाच या वाक्प्रचाराचा अर्थ युक्त दिसतो.

दुसरा वाक्प्रचार सदाशिवरावभाऊंच्या घोड्या संबंधाचा आहे. भाऊंच्याजवळ एक फारच उत्तम असा घोडा होता. हा घोडा उड्या मारण्यांत फार प्रवीण असे. कांहीं खास प्रसंगाचे वेळीं सदाशिवराव भाऊ या घोड्याचा उपयोग करून घेत. कुंजपुऱ्याच्या तटावरून उड्या मारण्याचे प्रसंगी या घोड्यानें चांगले चापल्य दाखविलें होतें असें इकडील लोक म्हणतात. जर एखादा शेतकरी दुसऱ्या एखाद्या शेतकऱ्याकडे बैल खरेदी करण्याकरितां गेला व त्यानें वाजवीपेक्षां ज्यास्त किंमत सांगितली तर तो बैल विकत घेणारा, बैल विकणाऱ्याला " **क्या भाऊका घोडा लगा है !** " तुझा बैल म्हणजे भाऊंचा घोडा आहे कीं काय ? म्हणून तूं त्याची इतकी ज्यास्त किंमत मागतोस, असा जबाब देतो.

पानिपतच्या आसपासच्या या रणमैदानांत म्हणजे "सुवाखेडी" भागांत जर कोणी बाहेरचा पेहेलवान लढण्यास आला तर त्याचा जय होत नाहीं. इकडील पेहेलवानाचाच जय होतो व या गोष्टीस या प्रांतांतील लोक " **भाऊका प्रताप है** " असें म्हणतात. या भूमीचा असाच महिमा आहे असें इकडील लोक मोठ्या अभिमानानें सांगत असतात.

पानिपतचे जोगीः—खुद्द पानिपत शहरांत मुसलमान जोग्यांचीच वस्ती ज्यास्त आहे. हे लोक अगदीं अशिक्षित आहेत. " आम्ही अमुक रकम घेऊं जरूर असल्यास बोलवा " असे पहिल्यानेंच कळवितात. कांहीं ठिकाणीं मध्येच विषयांतर असलेले दोहे

म्हणतात. या जोग्यांत हीं दोन किंवा चारच व्यक्ती **"भाऊकी गीत"** म्हणणारे आहेत. अलिकडे हीं पद्यें फारशीं म्हटलीं जात नाहींत. पुष्कळ वर्षें झाल्यामुळें या गोष्टींचा लोकांना विसर पडत चालला आहे. पानिपत येथें पूर्वी फकीरा जोगी या नांवाचा मनुष्य होऊन गेला व त्याच्या चवथ्या पिढींतील एक जोगी हल्लीं पानिपत येथें राहात असून त्यास वरील गीते येत असल्याचे मला समजले. ज्या महाराष्ट्रीयास " भाऊंची गीतें " ऐकावयाची असतील त्यांनीं एखाद्या खेड्यांत जाऊन हिंदू जोग्यास ती गीतें म्हणण्यास सांगावें म्हणजे हे लोक विनयशील व अल्पसंतोषी असल्यानें त्यास ती म्हणून दाखवितील. पानिपतहून पुढें उत्तरेस जाण्याकरितां निघालों व थोड्याच अंतरावर असलेल्या **कोहोंड** नांवाच्या खेडेगांवीं येऊन पोहोंचलों.

कोहोंडः—सुमारें पांचशें लोकसंख्येचे हे खेडेगांव पानिपत पासून सात मैलावर, ग्रँडट्रंक सडकेस लागूनच आहे. **कोहोंड** गांवांत कित्येक हिंदू जोगी रहातात अशी मला खबर मिळाली होती. या सर्व जोग्यांना एका ठिकाणीं बोलावून त्यांच्या कडून कांहीं दोहे मी म्हणवून घेतले. यांतील कित्येक शद्बांचा अर्थ त्यांना समजत नाहीं. " आम्ही पूर्वापार असेंच म्हणत आलों आहोत, व पुष्कळ वर्षें झाल्यामुळें आतां आम्ही हीं पद्यें विसरत चाललो आहोंत " असें ते सांगतात.

सदाशिवरावभाऊंनीं पानिपत येथें जाण्याचा बेत केला तेव्हां ते आपल्या मातेजवळ ही गोष्ट सांगण्याकारितां आले असतां भाऊंना उद्देशून त्यांची माता म्हणतेः—

—दोहा—

भाऊ ऊठदरबारसे माताके पास आया ॥
माता बोली प्यारसे भाऊ पास बिठाया ॥
तें करी तयारी हिंदकी क्या भूल्या तहकाया ॥

तूं क्या शहासे लढेगा मनमे गर्वाया ॥
बडे राव पटेल का शिर तोड भगाया ॥
शुक्रताल पे भुरटिया ढूंढा न पाया ॥
बेटा, दखिन बैठ करो राज्य मेरी बहुतही माया ॥

अर्थः—भाऊ दरबारांतून उठून मातेच्या जवळ आला व मातेनें त्यास मोठ्या प्रेमानें आपल्या जवळ बसविले. व नंतर माता म्हणते—तूं हिंदुस्थानांत जाण्याची तयारी केली आहेस, " अहमदशहा-बरोबर लढून त्याचा पराभव करीन " अशी तुला भूल आहे, हा तुझा गर्व तूं सोडून द्यावा हें बरें. तो अहमदशहा केवढा पराक्रमी आहे तें पहा. त्यानें शुक्रताल येथें दत्ताजीचा पराभव करून त्याचे शीर धडापासून वेगळे केले.

खुलासाः—दत्ताजीला " भुरटिया " असें त्या प्रांतांतील लोक म्हणत असत. ता. १० जानेवारी १७६० रोजीं दत्ताजी व अबदाली यांचे शुक्रताल येथें तुंबळ युद्ध होऊन त्यांत दत्ताजी पडला.

सदाशिव भाऊ आपल्या मातेस खालील प्रमाणें जबाब देतो.

भाऊ मातासे कहे एक अर्ज सुनावे ॥
कहे कहाणी बावरी क्यों हमे डरावे ॥
मेरा नवलख नेज्या दखनी कोण सामने आवे ॥
सूर्येके सुनके मसकले जस सावर गावे
अटक नदी मेरी पाएगा घोडोंको जलप्यावे ॥
तोफ कडकके खुणे देश गणियर गर्जावे ॥
दखन तो सोई आवेंगे जिन्होंनें हरलावे ॥

अर्थः—हे माते, अशा प्रकारच्या भीतियुक्त कहाण्या सांगून तूं मला घाबरून कां सोडतेस ? मी माझ्या घोड्यांना अटक नदीचे पाणी दाखवीन. माझ्या तोफांच्या कडकडाटानें देशांतील सर्व राजे मऊ पडतील. दक्षिणेंत तर परत येऊंच पण शत्रूला हरवून परत येणे बरें.

खुलासाः-ओळ तीन व चार याचा अर्थ नीटपणें समजत नाहीं व जोग्याला ही त्यांत कांहींच कळत नाहीं.

सदाशिवराव भाऊ आपल्या स्त्रीस भेटण्याकरितां महालांत गेले तेव्हां त्यांची स्त्री त्यांना म्हणतेः—

महेलोंके अंदर बोलती भाऊकी राणी ॥
ऋतुवंती जोबन भरी ना समा पछाणी ॥
जैसा स्वप्न रण का ऐसीही जिनगानी ॥
बुरके पैरों लढे नार मैं सुन्या पठाणी ॥
हुकूम हो तो चलूंसाथ सुखसे रहेंगे प्राणी ॥
अहमदशहाके दलोंमे चल घेरलूं घाणी ॥
होनहार सो होंगी जो करेंगे कृष्ण मुरारी ॥

अर्थः—तारुण्याचें भरांत असलेली भाऊची राणी महालांतून म्हणते मनुष्याचें जीवन म्हणजे एक स्वप्नच आहे. पठाणांच्या स्त्रिया पायांत कांहीं न घालितांना लढतात असें मी ऐकिलें आहें. आणि हें जर खरें असेल तर आपण मला आपल्याबरोबर येण्याचा हुकूम द्यावा. अहमदशहाच्या दलांत घुसून माझ्याकडून होईल तितकें त्याचे नुकसान मी करीन, या उपर जसें परमेश्वराचें मनांत असेल तसें होईल.

चंबळ नदी पार केल्यावर जनकोजी शिंदे सदाशिवराव भाऊना मथुरेजवळ भेटले. त्यावेळेस जें दोघांचे संभाषण झालें तें खालील दोह्यांत दिले आहे.

फौजा चंबळ उतरके आयी पार दिलसैन ॥
भाऊसे जनका मिल्या ब्रिज के हेर ॥
जनका रोया हायजार कैसे निसगूं गेर ॥
कहता भाऊ पेशवा दिल रखो समशेर ॥
तेरे कारण शहासे पकडी समशेर ॥
मारूं खान नजीबने दिल्लीने घेर ॥

अर्थः—चंबळ नदी पार केल्यावर मथुरेस फौजा आल्या. त्या वेळीं जनकोजी, हा भाऊंना भेटण्याकरितां आला. त्या सुमारास जनकोजीचे वय फार नसावे. जनकोजीचे भाऊंच्या वर विशेष प्रेम होते. त्या वेळीं जनकोजीच्या डोळ्यांतून पाणी आलें तेव्हां भाऊ म्हणाले, घाबरू नको, तुझ्या करितांच ही तलवार हातांत धरली आहे. दिल्लीच्या जवळ जेथें नजीबखान भेटेल तेथें त्यास गाठून ठार करूं भिऊं नको धैर्य धर.

सदाशिवराव भाऊंनीं हत्ती तयार करावयास सांगितले. तेव्हां उत्तम उत्तम हत्ती शृंगारण्यांत आले व हे हत्ती फौजे बरोबर पुण्याहून पानिपत पर्यंत होते इ. वर्णन खालील पद्यांतून आहे.

कहता भाऊ पेशवा ल्या ओ मे मनमे ॥
नागनदीके नीरमे मर्दन के रत्ते ॥
दांतों चूडे सोणे और उंचे मथे ॥
ऊपर पारवर दर्यादार जवाहिर जडेथे ॥
ऊपर बैठे पेहेलवान अंकुश के न थे ॥
एकनाम नाम दोनो विके नारी और कंभे ॥

या पद्यांतील शब्दशः अर्थ जोगी लोकांनां समजत नाहीं भावार्थ वर दिला आहे.

भाऊवाला जोडः—जोहोंड किंवा जोड या शब्दाचा अर्थ तळें असा आहे. गांवांपासून थोड्याच अंतरावर व ग्रँडट्रंक सडक आणि रेलवेलाईन यांच्या मध्यें हें तळें आहे. पूर्वी सदाशिव भाऊंचा फौजेसुद्धां येथें कित्येक दिवस मुक्काम होता. मनुष्यांनां व घोड्यांनां पुष्कळ पाणी मिळावें म्हणून हा तलाव खोदण्यांत आला होता. या वरून या तळयास “ भाऊवाला जोड ” असें म्हणतात. हल्लीं हें तळें अगदीं पडक्या स्थितीत आहे.

“ घोड्यांची अवलाद ” या प्रांतांत हल्लीं जी घोड्यांची अवलाद आहे ती सर्व मराठ्यांच्या फौजेतील घोड्यांची आहे असें

इकडील लोक म्हणतात. दाक्षिणेंतून पानिपत येथें जी घोडी आली त्यांतील बहुतेक घोंडीं दाक्षिणेत परत न जातां इकडेच राहिली असें लोक सांगतात.

रणशिंगें व डफ:—रणशिंगे व डफ हीं वाद्यें मराठ्यांच्या फौजे बरोबरच आमच्या या प्रातांत आली असे इकडील लोक सांगतात. त्या पूर्वीं हीं रणवाद्यें लोकांस माहित नव्हती. शिवाय हीं रणवाद्यें पानिपत व कर्नाल या प्रांतापलिकडे वाजविलीं जात नाहींत. पंजाबांतील इतर जिल्ह्यांत हीं वाद्यें लोकास ठाऊक सुद्धां नाहींत.

घरोंदा:—कोहोंडा या गांवांहून निघून तेथून थोड्याच अंतरावर असलेल्या ' घरोंदा ' या गांवीं जाऊन पोहोंचलो. सुमारें तीन हजार लोकसंख्येचा हा गांव कर्नाल तालुक्यांत आहे. हा गांव सडकेस अगदीं लागूनच आहे. घरोंदा हे नार्थ वेस्टर्न रेलवेचे स्टेशन आहे. येथें ए. व्ही स्कूल, पोष्ट ऑफीस, पोलिसस्टेशन, हॉस्पिटल् इत्यादि संस्था असून डाक बंगलाही आहे. सडकेस लागूनच एक ब्राह्मण धर्मशाळा असून तेथेंच एक संस्कृत पाठशाळा आहे. गांवाबाहेर सडकेजवळ दोन मोठमोठ्या वेशी (दरवाजे) दिसतात. ह्या वेशी शहाजहान बादशहानें बांधिल्या असे लोक म्हणतात. हे मोठमोठे दरवाजे पाहिले म्हणजे या ठिकाणीं पूर्वी महाल असावा असा तर्क चालतो. घरोंदा येथें धान्याचा व तुपाचा व्यापार मोठ्या प्रमाणांत चालतो. येथें तूप फारच स्वस्त मिळते. गांवांत गुजर लोकांची वस्ती पुष्कळ आहे. हे लोक आपणास ' **बडगुजर** ' असें म्हणवितात. घरोंद्याजवळ ' जांडेवाला ' नांवाचे एक शेत आहे. या शेतांत एक कबर होती. सुमारें वीस वर्षांपूर्वीं कांहीं गृहस्थ उंट घेऊन तेथें आले होते व त्यांचा मुक्काम येथें कांहीं दिवस होता. त्यांनीं या कबरेच्या खालीं खणून जमिनींतून पुष्कळ धन काढून नेले. सकाळीं कांहीं चांदीचे व सोन्याचे शिक्के

शेतकऱ्यांना मिळाले. ह्या गृहस्थांनीं उंटावर बसून केंव्हांच पोबारा केला होता. हे गृहस्थ महाराष्ट्रीयच असावे असा इकडील लोकांचा तर्क आहे.

घरोंद्याच्या लोकांनीं खालील कथा सांगितल्या:—

२० सदाशिवरावभाऊनें कुंजपुऱ्याच्या नबाबाची धान्याची कोठारें जाळली व हा शाप त्यांना लागला आणि म्हणून त्यांची हार झाली. भाऊ हा असामान्य वीर होता.

२१ घरोंदा येथें 'सहजराम' नांवाचा रजपूत रहात असे. याची मुलगी कुंजपुऱ्याच्या नबाबानें मागितली होती. सहजराम यांस याबद्दल राग येऊन तो भाऊंना भेटण्याकरितां चंबळ पर्यंत गेला. मराठ्यांच्या फौजेचा मुक्काम त्यावेळीं 'चंबळ' किंवा 'चमेली' या नदीवर होता. सहजराम याचें म्हणणें भाऊनें ऐकून घेतलें व "मी कुंजपुऱ्यास आसपास असतांना मला या गोष्टींचे स्मरण द्या, मी नबाबास पाहून घेतो," असें सांगून सहजरामाची रवानगी केली. यावरून कुंजपुऱ्याच्या नबाबाबद्दल भाऊंना पहिल्यापासूनच राग आला होता असें दिसतें.

घरोंद्याहून कर्नाल फक्त दहा मैल आहे. कर्नाल शहराचें वर्णन पहिल्या भागांत दिले आहे. कर्नाल पासून पूर्वेस कुंजपुरा सहा मैल आहे. कुंजपुरा हें ठिकाण त्यावेळीं फार प्रसिद्ध होते. कुंजपुरा येथें जी लढाई झाली त्यांत मराठ्यांचा जय झाला. पानिपत प्रकरणांत प्रसिद्धीस आलेले असे जे कुंजपुरा नांवाचे ठिकाण त्याचे वर्णन खालील प्रमाणें.

कुंजपुरा वर्णन:—हें ठिकाण कर्नाल तहसील मध्यें आहे कर्नालहून चार मैल पक्की सडक असून दोन मैल वाळूंतून जावें लागतें. कर्नालहून कुंजपुऱ्यास जाऊं लागलें म्हणजे वाटेंत एक न्यावल नांवाचें गांव लागते.

पूर्वीं गांवांजवळ यमुना नदी वाहात होती. हल्लीं सहा मैलावर यमुना आहे. यमुनेचा प्रवाह नेहमीं जागा बदलतो. गांवाजवळ यमुना असतांना येथें पुष्कळ पांखरें बसत असत. या पांखरांना ‘ कुंज ’ असें म्हणतात व म्हणून या गांवाचे नांव ‘ कुंजपुरा ’ असें पडलें. कुंजपुऱ्याची लोकसंख्या सुमारें चार हजार असून जितके मुसलमान आहेत तितकेंच हिंदु आहेत. यमुनेच्या पलीकडे संयुक्त प्रांतांतील मुजफरनगर जिल्ह्यांतील किराणा तहशीलची हद्द लागते. कुंजपुऱ्याजवळ आले असतां तेथील तटाची मोठी भिंत नजरेस पडली म्हणजे, आपण एखाद्या मोठ्या प्राचीन नगरींत जात आहोंत असें प्रवाशांस वाटते.

बाहेरच्या तटास तीन दरवाजे आहेत. १ कर्नाळी, २ महमंदी, ३ न्यावली. मराठ्यांच्या फौजा न्यावली दरवाज्यानें आल्या असें इकडील लोक सांगतात गांवाच्या आंत नबाब रहातात. यांच्या वाड्याभोंवतीं एक लहानसा तट असलेला दिसतो. मोठ्या तटाच्या प्रत्येक दरवाज्या समोर एक मातीची उंच भींत बांधलेली दिसते. तोफेच्या गोळ्यापासून दरवाज्याचा बचाव व्हावा या साठीं ही भिंत बांधिली असें लोक सांगतात.

गांवाच्या बाहेर प्रायमरी स्कूल आहे. गांवचे मध्यभागीं नबाबांच्या रहाण्याचा प्रशस्त वाडा आहे. हे नबाब कुंजपुऱ्यांत किंवा बाहेर बांधिलेल्या बंगल्यांत कोठें तरी रहातात. यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांचें आहे. यांना थर्डक्लास मॅजिस्ट्रेटची पावर देण्यांत आली आहे. गांवाबाहेर थोड्याच अंतरावर आंबराईत नबाबांच्या घराण्यांतील स्त्रीपुरुषांच्या कबरा आहेत. यांतील कांहीं थडगी फार प्राचीन आहेत असें सांगतात. गांवांत मुसलमानांच्या कित्येक मशिदी असून हिंदूंची कित्येक देवळें असलेली दिसतात. कुंजपुरा येथील संत्रीं व बोरें प्रसिद्ध आहेत. कुंजपुरा गांवच्या बाहेरील मोठा तट आतां पडत चालला आहे. पावसाळ्यांत प्रत्येक वर्षीं थोडथोडाभाग ढांसळून

पडत असतो. हा तट कोसळून पडूं लागला म्हणजे त्यांतून कित्येक लहान मोठे शिशाचे भरीव गोळेही खालीं पडतात. हे गोळे तोफांचे आहेत. कुंजपुऱ्यांतील कित्येक घरीं अशा प्रकारचे गोळे पहावयास मिळतात. नुकतेंच सांपडलेले शिशाचे गोळे येथील स्कूलमध्येंही ठेवण्यांत आलें आहेत. कुंजपुरा येथें फारच मोठे रणकंदन झालें होतें. पहिल्यानें लढाईचें क्षेत्र कुंजपुरा हेंच होते. येथें मराठ्यांचा जय झाला. कुंजपुरा हें अहमदशहा अबदालीचें महत्त्वाचें ठाणें होतें.

या गांवांतील लोक ज्या कथा सांगतात त्या खालीं लिहिल्या प्रमाणें:—

२२ सदाशिवराव भाऊनें कुंजपुऱ्याच्या नबाबास एक चिठ्ठी लिहिली. कुंजपुऱ्याच्या नबाबा जवळ धन व धान्य पुष्कळ आहे अशी भाऊना अगोदरच खबर मिळाली होती. " तुमच्या जवळ असलेलें धन व धान्य मला देऊन तुम्ही मला मिळावें नाहींतर मी तुमच्यावर स्वारी करीन व तुम्हांस प्राणास मुकावे लागेल " हें लक्षांत ठेवा असा या चिठींत मजकूर होता. त्या वेळीं कुतुबजंग व समदखा नांवाचे अबदालीचे सरदार कुंजपुरा येथें रहात असत. भाऊनें लिहिलेली चिठ्ठी कुतुबजंग यानें पाहिल्या बरोबर त्यानें भाऊस खालील जबाब दिला:—

क्या भाऊ घूर दिखावत है क्या ताके किरसाण ॥
घडीमें आता सो पलमें आजा, मेरी जात पठाण ॥

अर्थ:—भाऊ, तूं मला अशी भिती कां दाखवतोस ? तूं मला शेतकरी समजतोस कीं काय ? तुला घटकेनें यावयाचे असेल तर आतांच ये, मी जातीचा पठाण आहे हें लक्षांत ठेव.

हा जबाब पाहून सदाशिवराव भाऊंना क्रोध आला व त्यांनीं सकाळच्या आंत कुंजपुरा घेरला. त्यावेळीं तटाची सर्व दारें बंद करून नबाब आंत बसला होता. त्या तटाच्या भिंती तोफांच्या सहाय्यानें पाडण्यांत आल्या व वरून घोडा उडवून भाऊ आंत

शिरला व किल्यांत असलेल्या मुसलमान शिपायांची कत्तल करण्यांत आली. तेव्हां कुतुबजंगास उद्देशून भाऊ म्हणाले:—

सागरसे दर्या न सोके मटका ॥
बकरी होके शेरका सहारे झटका ॥
बडा मर्द था कुतुबजंग घडी एक न टीक्या ॥

अर्थः—समुद्राचें पाणी एका लहानश्या मडक्यानें किती जरी काढिलें तरी समुद्र शुष्क होणें शक्य नाहीं, किंवा बकरीनें कांहीं केलें तरी वाघाला ती ठार मारूं शकत नाहीं. त्या प्रमाणें हे कुतुबजंग तूं तरी मोठाच मर्द होतास पण माझ्या बरोबर एक घटकाभर सुद्धां टिकला नाहींस.

२३ भाऊनें नबाबाचीं धान्याचीं कोठारें जाळलीं हा शाप त्यास लागला.

२४ भाऊ कुंजपुऱ्याच्या तटा जवळ येऊन उभा राहिला तेव्हां तटाची एक भिंत अपोआपच झुकली व या झुकलेल्या भिंती वरून भाऊ आपल्या उड्या मारण्यांत पटाईत असलेल्या घोड्यावर बसून जोरानें घोडा उडवून आंत घुसला.

२५ या ठिकाणीं रहात असलेल्या सर्व मुसलमानांची कत्तल करण्यांत आली. कुंजपुऱ्या जवळ. " झील प्राण " नांवाचे जें तळें आहे तें रक्तानें भरून लाल झालें होतें असें म्हणतात.

कुंजपुऱ्याच्या या लढाई संबंधानें खालील हकीकत इतिहासांत प्रसिद्ध आहे.

भाऊ दिल्लीहून निघाले ते १५ आक्टोबरच्या सुमारास कुंज-पुऱ्यास आले. हें स्थल फार मजबूत असून नाके बंदीचे होतें. आंत समदखाँ म्हणून अबदालीचा सरदार पांच सांत हजार फौजे सुद्धां होता. कुंजपुऱ्याची गढी सोडून उलटे फिरून मराठ्यांच्या सैन्याला दमवावयाचा समदखानाचा विचार होता. मराठ्यांच्या सैन्याला

बागावर घेऊन आपण पळत सुटावें व अबदालीनें पाठी मागून येऊन मराठ्यांना कचाटींत धरावें अशी समदखानाची योजना होती. परंतु बळवंतराव मेहेंदळे व जनकोजी शिंदे यांनीं त्वरा करून गढी भोवतीं वेढा घातल्यामुळें, समदखानाची दोन हजार फौज बाहेर पळून जात होती ती वाटेतच लुटली गेली, त्यामुळें ही योजना जागच्या जागीच जिरली. पुढें सदाशिवराव भाऊ आल्यावर मराठ्यांनी कुंज-पूरा ता. १७ आक्टोबर १७६० रोजीं घेतला व पांच सहा हजार प्यादा लुटला. दिल्लीपासून कुंजपुऱ्यापर्यंतचे यमुनेचे सर्व घाट मराठ्यांच्या ताब्यांत होते. कुंजपुरा घेतल्यावर तेथें खणत्या लावल्या या प्रमाणें समदखानाला तेथें जमीनदोस्त करून दसऱ्याचा सण त्या ठिकाणी आनंदानें साजरा केला. कुंजपूरच्या विजयानें मराठ्यांना फारच वीरश्री चढली."

(राजवाडे म. इ. साधनें प्रस्तावना, खंड १)

वरील विवेचनांत कुंजपुऱ्याच्या नबाबाचीं धान्याचीं कोठारें भाऊनें जाळलीं असा उल्लेख कोठेंच नाहीं.

भाऊका घड्याळः—कुंजपुऱ्यास नबाबाच्या वाड्यांत तासाचे ठोके मारण्याची एक घण्टा आहे. ही घण्टा आकारानें फारच मोठी आहे. ह्या घण्टेचा आवाज दोन मैल लांब ऐकूं येतो. या तासाचे ठोके मारण्याच्या घण्टेला इकडील लोक 'घड्याळ' असें म्हणतात. हें घड्याळ मराठ्यांच्या फौजेबरोबरचें आहे व परत जातांना तें येथेंच राहून गेलें अशी कथा इकडील लोक सांगतात. या घंटेस 'भाऊका घड्याळ' असें अजूनही लहानथोर सर्व मनुष्यें म्हणतात.

कुंजपुऱ्याच्या लढाईत जनकोजीनें फार बहादुरी केली असे इकडील लोक सांगतात. कुंजपुरा येथील अबदालीचे सरदार सम्मदखान व कुतुबजंग या दोघांना मराठ्यांनीं ठार मारलें असा उल्लेख कांहीं ठिकाणीं आहे. इकडील लोकांत या संबधानें निरनिराळ्या कथा अस्तित्वांत आहेत. कोणी म्हणतात कीं कुंजपुऱ्याचे नबाब

भीतीनें यमुनापार पळून गेले. कोणी म्हणतात कीं याना भाऊनें जीवदान दिलें.कोणी म्हणतात कीं एका मराठा सरदारानें, कुतुबजंगाच्या सर्व अंगास कापड बांधून वर तेल ओतून नंतर त्यास आग लावून देऊन, अशा क्रूरपणानें त्यास मारावें अशी भाऊंना सल्ला दिली होती. मराठे आपणांस इतके कडक शासन करणार आहेत ही गोष्ट कुतुबजंग याला कळली तेव्हां तो झुरणीस लागला. कुतुबजंगानें यापूर्वी कित्येक अमानुष कृत्यें केलीं होतीं, विशेषतः हिंदू स्त्रियांची विटंबना केली होती, ही गोष्ट तेथील लोकांनीं मराठे सरदारांना सांगितली.

कुंजपुऱ्यास पानिपतच्या वेळेपासून चालत आलेली वाईट चाल आहे. कुतुबजंगासारख्या दुष्ट मनुष्यास कठोर रितीनें मारावयाचें असा सर्व मराठ्यांचा निश्चय झाला होता. नबाबानें जेव्हां या सर्व गोष्टी ऐकिल्या तेव्हां त्यानें पिराला नवस केला. हें पिराचें स्थान कर्नालहून कुंजपुऱ्यास येऊं लागले म्हणजे वाटेंत लागतें. नबाबानें पिरास खालील नवस केलाः—

" जर या प्रसंगांतून मला तूं वाचविलेस, किंवा अशा भयंकर रितीनें जर माझा वध मराठ्यांनीं केला नाहीं, तर वर्षांतून एक दिवस मी चरबीचे दिवे कुंजपुऱ्यांत लावीन. "

पुढें कांहीं कारणामुळें या नबाबाचा वध झाला नाहीं व नंतर तो मराठ्यांचा कैदी म्हणून त्यांचेबरोबर असे. पुढें पानिपतच्या शेवटच्या हल्ल्यांत हा अबदाली कडून बंधमुक्त झाला व कुंजपुऱ्यास येऊन राहूं लागला. तेव्हां पासून वर्षांतून एका ठराविक दिवशीं गाईच्या चरबीचे दिवे कुंजपुऱ्यांत लागत असत. नबाबाचे सर्व पिढींतील कर्ते पुरुष हा नवस पाळीत आले आहेत. या दिवे लागण्याच्या दिवशीं संध्याकाळीं हिंदू लोकांना कुंजपुरा सोडून बाहेर जावे लागे. कारण गाईच्या चरबीचा दिवा विझला म्हणजे त्यापासून

एक प्रकारचा दुर्गंध उत्पन्न होतो. यासाठीं संध्याकाळ पासून तो रात्रौ दहा वाजेपर्यंत हिंदूंना आपलीं पोरे बाळें घेऊन गांवाबाहेर मैदानांत जाऊन बसावें लागे.

हिंदूंनीं चाल तोडून टाकिली:—सुमारें पांच वर्षांपूर्वीं या गोष्टीकडे लक्ष देण्याचे हिंदूंनीं ठरविले व नबाबास शिष्टाचारानें या गोष्टी बंद करण्याबद्दल सांगितलें. परंतु असल्या सामोपचारानें सांगून ऐकण्या जोगे मुसलमान, सूज्ञ व दूरदर्शी असते तर कित्येक ठिकणीं झालेले दंगे टळले असते. अर्थात हिंदूंनीं सज्ज होऊन सामना देण्याचे ठरविलें व त्यासंबधानें कर्नालच्या जिल्हाधिकाऱ्यासही कळविण्यांत आले. शेवटीं सरकारी अधिकाऱ्यांनीं नबाबांस चार युक्तीच्या गोष्टी सांगून "या वर्षापासून मेणबत्या लावाव्या" असी तडजोड काढिली. तेव्हां पासून चरबीच्या बत्या बंद होऊन त्या ऐवजीं मेणबत्या लावण्यांत येऊं लागल्या.

गांवाच्या भोंवतालीं मुख्य तटाच्या बाजूनें एक मोठा खंदक खणलेला आहे. यावरून हा गांव पूर्वीं फारच मजबूत तटबंदीचा असावा यांत शंका नाहीं. यमुने पलिकडे मुजफरनगर जिल्ह्यांतील किराणा तहशील कडून मनुष्यांची जाण्यायेण्याची रहदारी मोठ्या प्रमाणांवर असलेली दिसते.

कुंजपुऱ्याचे लोक मराठ्यांना किंवा भाऊंना केव्हांही विसरणार नाहींत. येथें मी कित्येक दिवस मुक्काम केला होता. गांवांतील सर्व हिंदू शिष्टमंडळी मला वारंवार भेटण्याकरितां येत. कुंजपुऱ्यास जो विजय झाला त्यायोगें मराठ्यांची जबरदस्त दहशत या प्रांतांतील लोकांना बसली. 'मरेठा' म्हटला म्हणजे इकडील लोकांना अजूनही भिती वाटते. मला पहाण्याकरितां कित्येक वृद्ध लोक नेहमीं येत असत. पुन्हां पानिपतावर किंवा कुंजपुऱ्यावर केव्हां चालून याल? असे विनोदी प्रश्न प्रेमानें करीत. इकडील लोक सरळ स्वभावाचे

असून भोळे दिसतात. स्त्रियांना कडक पडदा आहे. कुंजपुऱ्याच्या आसपासची जमीन सुपीक असून हवापाणी चांगले आहे.

कुंजपुऱ्याच्या वेढ्यासंबंधानें दुसरी एक कथा इकडील लोक सांगतात ती अशी:—मराठ्यांच्या फौजेनें कुंजपुरा घेरलें तेव्हां नबाबानें दरवाजे बंद केले. जनकोजी शिंदे दातांत तलवार धरून किल्याच्या भिंतीवर चढला व नबाब नजाबतखान यांस म्हणाला "किल्याचे सर्व दरवाजे मुकाट्यानें उघड नाहींतर मराठ्यांशीं गांठ आहे हें लक्षांत ठेव. हा किल्ला तुझ्याहातून गेला असेच समज" इत्यादि गोष्टी सांगू लागला त्यावेळीं नबाब नजाबतखान म्हणतो:—

दोहा

नबाब नजाबत खानने मुख हँसके फेऱ्या ॥
मर्दा हीन लढनमे मैदान भतेरा ॥
जो मै किलेने खोल दूं तो गडतुटे मेरा ॥

अर्थ:—नजाबतखानानें हंसून जनकोजीकडे पाहिलें व म्हणाला हे मर्दा, आम्ही थोडेसे लोक किल्यांत असतां आमच्याशीं लढण्यांत पुरुषार्थ तो काय ? मैदानांत लढणें बरें जर मी किल्याचे दरवाजे उघडले तर माझ्या हातचा किल्ला जाईल.

खुलासा:—कुंजपुऱ्यांत नजाबतखान नांवाचा नबाब होता असा उल्लेख इतिहासांत सांपडत नाहीं. रोहिलखंडाचा नबाब नजीबखान म्हणून होता व तो अबदालीस मिळाला होता, पण कुंजपुऱ्याचे वेढ्याचें वेळीं वरील पद्यांत उल्लेख केलेला हा नजाबतखान म्हणजे रोहिलखंडाचा नबाब नजीब खानच होता कीं दुसरा कोणी होता, अशी एक शंका उत्पन्न होते.

पानिपतकडे सदाशिवराव भाऊंच्या संबंधानें आणखी एक आख्यायिका पुष्कळ लोक सांगतात. या गोष्टीवर कितपत विश्वास ठेवावा हा ज्याच्या त्याच्या मनाचा प्रश्न आहे. ती गोष्ट अशी:—

एकदां एक गवतविक्या पानिपतच्या आसपास गवत कापीत होता. या वेळीं पानिपत येथें मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला होता. हा मोळीवाला मराठ्यांच्या फौजेंत जाऊन तेथें आपलें गवत विकीत असे. एके दिवशीं पुष्कळसे गवत कापून भारा बांधून, तो डोक्यावर चढविण्याकरितां दुसऱ्या मनुष्याची वाट पहात तो बसला. बाजूस हमरस्ता असल्यामुळें येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची रहदारी असे. इतक्यांत एक संन्यासी त्या वाटेनें जात असलेला त्या मोळी विक्यानें पाहिला, व आपला गवताचा भारा डोकीवर चढविण्याविषयीं त्यानें त्या संन्याशास विनंती केली. संन्याशानें आनंदानें त्यास साह्य केलें व विचारलें "हा गवताचा भारा घेऊन कोठें जातोस" ? "भाउच्या फौजेंत विकण्याकरितां जात आहे." असा त्यानें जबाब दिला. आपण कोठें जात आहांत ? असा उलट प्रश्न मोळी विक्यानें संन्याशास केला तेव्हां संन्यासी म्हणाला, " मी भाऊचे युद्ध पहाण्याकरितां फार लांबून आलो आहे. " इतके सांगून तो संन्यासी गुप्त झाला. मोळीविक्यानें ही गोष्ट गांवांतील सर्व लोकांस सांगितली तेव्हांपासून " भाऊंचे युद्ध पहाण्याकरितां साक्षात् परमात्मा प्रकट झाले होते " अशी सर्व लोकांची समजूत झाली, व ही कथा अजूनही सांगण्यांत येते.

पानिपतच्या आसपासची सर्व खेडीं पायानें हिंडून ज्या गोष्टी तिकडील लोकांकडून मला मिळाल्या त्या सर्व एकत्रित करून महाराष्ट्रीय वाचकांसमोर ठेविल्या आहेत. खेडेगांवांतील लोक प्रायः अशिक्षित असतात. इतकेच नव्हे तर या प्रांतांत प्राथमिक शिक्षणाची प्रगती जशी व्हावयास पाहिजे तशी अद्याप झाली नाहीं. प्रत्येक खेड्यांत गेल्यावर येथील लोक कांहीं ठराबीक व चमत्कारिक प्रश्न करीत व इतक्या लांब मी आलों याबद्दल आभार मानून मोठ्या प्रेमानें स्वागत करीत. पानिपत कडील खेड्यापाड्यांतील अशिक्षित लोक काय प्रश्न करीत त्याची थोडीशी कल्पना वाचकांना

व्हावी म्हणून ते प्रश्न जसेच्या तसेच मी महाराष्ट्रीय वाचकांपुढें ठेवितो:—

१ भाऊका राज्य दखन चाले ? भाऊकें खानदान के कौन कौन आदमी है ? उनके नाम क्या है ? भाऊ मरेठा था. परंतु कोई कहते है कीं भाऊ, पूना सितारेका पंडत था. आप बताईये की सचबात क्या है ? विश्वासराव, और नानाराव, भाऊके कौन थे ? इस समय दखन में मरहटों की, और पंडितोंकी कौनसी रियासते है ? सुनते है कीं भगवान तिलक भी दखनकें पण्डीत थे. पूना सितारेके रहनेवाले थे, इससमय भगवान तिलक के लडके क्या करते है ? महाराष्ट्रमें किसानोकीं अवस्था कैसी हैं ?

वरील प्रश्नांचीं उत्तरें देताना ठिकठिकाणीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील घडलेल्या मुख्य गोष्टींचा उल्लेख करावा लागे. कित्येक प्रश्नांचीं उत्तरें नीट विचार करून द्यावीं लागत कारण कांहीं ठिकाणीं सुशिक्षित लोक सभेस हजर असलेले दिसून येत.

पानिपत कडील लोकांना हल्लीं द्रव्याची फारच तहान लागलेली दिसते. एखादा महाराष्ट्रीय प्रवासी तिकडे गेला म्हणजे " हा आपल्या पूर्वजांचे धन नेण्याकारतां आला आहे " असा लोकांचा ग्रह होऊन जो तो आपापल्या परीनें निरनिराळे प्रश्न विचारावयास लागतो. या पूर्वीं कित्येक महाराष्ट्रीयांनीं इकडे येऊन जमीन खोदून कांहीं धन नेलें आहे ही गोष्ट खोटी नव्हे या साठीं " पुराणवस्तूसंशोधन खात्यानें पानिपतची रणभूमी उकरून काढल्यास बऱ्याच प्रदर्शनीय वस्तू भूगर्भांतून बाहेर निघतील यांत शंका नाहीं. राजाखेडी, उग्राखेडी, रसाळू, निमरी, उंझा, पसीना, इ. गांवांच्या सभोवतालची जमीन म्हणजेच पानिपतची रणभूमी होय व हल्लीं या भागांतील बहुतेक जमीन लावगडीस आलेली आहे.

भुतांचे चमत्कारः—उम्राखेडी व राजाखेडी येथील लोकांचीं शेतें ' काळा आंब ' च्या आसपास आहेत. शेतीच्या हंगामाच्या वेळीं या लोकांनां रात्रीचा दिवस करून काम करावें लागतें. "घोड्यावर बसून, हातांत तलवार व ढाल घेतलेले मराठी शाहीची पागोटीं बांधिलेले, कित्येक घोडेस्वार एखाद्या लहानशा मशालीच्या उजेडांत घोडे उडवीत चालले आहेत " असे देखावे या लोकांना कधीं कधीं दिसतात. एका शेतकऱ्यास एका घोडेस्वारानें रस्त्यांतच आडविले होतें व पुढें तो शेतकरी आजारी पडून मेला अशी व दुसऱ्या कित्येक प्रकारच्या गोष्टी इकडील शेतकरी सांगतात. या गोष्टींवर कितपत विश्वास ठेवावयाचा हा प्रत्येकाच्या भावनेचा प्रश्न आहे.

या घनघोर युद्धांत भाऊसाहेबांनीं अनेक चुका अनेकांच्या मताप्रमाणें केल्या पण त्यांत त्यांनीं लोकोत्तर शौर्य गाजविलें, व शेवट पर्यंत स्वतः शिपाईगिरीची कमाल केली याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं. भाऊ उत्तम सेनानायक होता यांत संशय नाहीं पण अबदाली त्यांच्यापेक्षांहि कांकणभर ज्यास्त होता म्हणून भाउसाहेबांस हार खावी लागली. युरोपियन पद्धतीच्या तोफांनीं गिलच्यांचा धूवा उडवून देऊन त्यांस रेटीत यमुनेमध्यें बुडवीन ही भाऊसाहेबांची हिंमत शेवट पर्यंत होती. जनकोजी शिंद्यासारख्या शूरवीराची जोड मिळाल्यामुळें शेवटची मारामारी तर अद्वितीयच झाली. भाऊसाहेबास जय मिळाला असता तर त्यांच्या सर्व चुकांवर सर्वांनीं मोठ्या आनंदानें पांघरूण घातलें असतें.

भाऊंच्या संबंधानें पहिला मुख्य प्रकार असा नजरेस येतो कीं, या स्वारींत निदान दोन लाख माणसें भाऊंच्या बरोबर असून शिवाय हत्ती, घोडे, बैल उंट वगैरे पांच पन्नास हजार जनावरें व उत्कृष्ट सामान आणि दोनशें तोफांचा प्रचंड तांडा म्हणजे पुण्यासारखीं दोन तीन शहरें बरोबर घेऊन हा बहादूर ता. १७ मार्च

सन १७६० रोजीं, पटदुराहून वाट चालूं लागतो. ता. १ आगष्ट रोजीं दिल्ली हस्तगत करितो आणि ता. १७ आक्टोबरास कुंजपुरा घेऊन कुरुक्षेत्रावर दसऱ्याचा समारंभ मोठ्या थाटानें साजरा करितो. पुण्याहून दिल्ली. जी. आय्. पी. रेलवेच्या मार्गानें एक हजार मैल असून. त्यापुढें १०० मैल कुरुक्षेत्र आहे. पुण्या सारखी दोन शहरें बरोबर सांभाळून, तीस वर्षांचा हा तरुण सेनापती साडे चार महिन्यांत एक हजार मैलांचा प्रवास करितो. नुसती काशीयात्रा करीत नसून, देशजिंकीत व अंमल कायम करीत जातो चंगीजखान किंवा तयमूरलंगा सारखी तुफानी भरारी न मारितां प्रत्येक हालचाल हिशेबानें व रेखीव कार्यक्रमानें पार पाडितो. तेव्हां त्याच्या उपमेस काय अलेक्झांडर द्यावा, लार्ड रॉबर्टस द्यावा किंवा नेपोलियन द्यावा, याचा विचार ज्याचा त्यानें आपल्या मनाशीं करावा. दोन लाख फौजेचे खाण्याचे, स्वच्छतेचे, आजारांचे व युद्धकृत्यांचे वगैरे व्यवहार उत्तरेच्या जंगली मार्गावर कसे चालले असतील, याची नुसती कल्पना मनांत आणिली म्हणजे भाऊसाहेबांबद्दल विशेष आदर वाटल्याशिवाय राहणार नाहीं. शेवटच्या पंधरवाड्यांत फौजेची उपासमार होऊं लागली पण अशा वेळींसुद्धां भाऊंच्या तोंडून निराशेचे उद्गार मुळींच निघाले नाहींत.

पाश्चात्य युद्ध शास्त्रवेत्तेसुद्धां संग्रामाच्या जयापयाच्या विचारांत दैव अथवा 'चान्स' हा एक भाग मानितात. कारण परंपरेच्या दोऱ्यांत दैवाचाही एक धागा चालला आहे. यांत बिलकूल संदेह नाहीं. पानिपतच्या युद्धांत मराठ्यांस हा दैवाचा धागा अनुकूल नव्हता असे म्हणावे लागते. जगप्रसिद्ध युद्ध शास्त्रविशारद नेपोलियन बोनापार्ट, ज्यानें सर्व यूरोपखंड पादाक्रांत केलें होते, त्याचा विनाशकाल आला त्यावेळीं त्याच्याकडून वाटर्लूच्या लढाईत पुष्कळ चुका झाल्या, व शेवटीं त्यास बंदिवासांत मरावें लागले.

त्याच्या दशांशही चुका भाऊ साहेबांनीं केल्या नव्हत्या. दैवाच्या आचानक फेऱ्यामुळेंच कैसरला आपली महत्त्वाकांक्षा अपुरी ठेवून हॉलंड मध्यें सध्यां सडत पडावें लागले आहे.

(" हितचिंतक मासिकाचा खास पानिपत अंक—ले. रियासतकार श्री. गो. स. सरदेसाई व जनरल नाना साहेब शिंदे बडोदे)

गिलच्यांच्या धिप्पाड आणि अर्बुज शरीरापुढें मराठ्यांच्या लहान व वामनमूर्तीचा टिकाव लागला नाहीं म्हणून एक आक्षेप आहे. गिलच्यांच्या लांबी रुंदी पेक्षां मराठ्यांच्या शरिराचे क्षेत्रफळ कदाचित लहान असेल परंतु लढाईंत या क्षेत्रफळावर मोठी भिस्त असते असे नाहीं. कर्नाटकांतील राठ आणि धिप्पाड शेतकरी, मथुरावृंदावनांतील गलेलठ्ठ बैरागी, पंजाबांतिल उंच धिप्पाड व ठिसूळ शीख, रजपुतान्यांतील रुंद छाताडाचे व भरगच्च मासाचे राठोड, ह्या सर्वांना लहान्या परंतु काटक मराठ्यांनीं वेळोवेळीं चीत केलें होतें. त्या मराठ्यांनां अर्बुज गिलचांचे किंवा पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही मनुष्याचे भय मागें कधीं वाटले नाहीं व पुढें कधीं वाटणार नाहीं.

(राजवाडे म. इ. साधनें प्रस्तावना, खंड १ पान ९१)

पानिपतचा हा संग्राम मराठ्यांची कीर्ति यावचंद्र दिवाकरौ उज्वल राखील; कितीही राज्यक्रांत्या किंवा घडामोडी झाल्या तरी या पानिपच्या आठवणींनें मराठ्यांच्या बाहूंस स्फुरण चढेल, आणि कोणत्याही देशाचे राज्य करण्यास मराठे सर्वथैव लायक आहेत याची खात्री हा एकच प्रसंग निरंतर पटवीत राहील यांत तिळमात्र शंका नाहीं.

भाग तिसरा.

कुरुक्षेत्र

इतिहासः— धर्मक्षेत्र–कुरुक्षेत्राचा महिमा, व त्याचें महत्व, पुराण ग्रंथांतून विस्तार पूर्वक करण्यांत आले आहे. या तीर्थास '**तीर्थराज**' असेंही म्हणतात. कुरुक्षेत्र हा एक हिंदुस्थानांतील प्राचीन देश असून हा ब्रम्हावर्ताच्या पश्चिमेस आहे असा उल्लेख आहे. श्रीकृष्ण आवर्त देशास जात असतां प्रथम कुरुदेशांतून निघाल्यानंतर त्यांस ब्रम्हावर्ताच्या पुढें व मत्सदेशाच्या अलीकडे कुरुक्षेत्र लागले असा भागवतांत उल्लेख आहे. येथें कौरवांचा मूळ पुरुष कुरू या राजानें तप केले, व इंद्र त्याला प्रसन्न झाला, आणि त्याच्या प्रसादानें हें स्थळ पवित्र झालें, अशी कथा आहे. याच्या चतुःसीमा एके ठिकाणीं खालील प्रमाणें दिल्या आहेत. तरंतुक व अरंतुक यांच्यामधील आणि रामऱ्हद व मचकुंक यांच्यामधील जो प्रदेश तो. येथें दिशा सांगितलेल्या नाहींत. उत्तरवेदी, धर्मक्षेत्र, विनरानतीर्थ, अशीही यास दुसरी नांवें आहेत.

सरस्वती आणि दृषद्वती या दोन नद्यांच्या मधील प्रदेश तो कुरुक्षेत्र असाही कांहीं ठिकाणीं उल्लेख सांपडतो. वायू पुराणांत खालील प्रमाणें उल्लेख आहे. सृष्टीच्या आरंभी सत्ययुगांत ब्रह्मदेवानें या भूमींत यज्ञ केला त्यावरून ह्या भूमीला त्यावेळीं "ब्रह्मसर" असें म्हणत असत. पुढें त्रेतायुगामध्यें परशुरामानें क्षत्रियांच्या रक्तानें पांच तलाव भरलें, त्या काळीं या भूमीस रामऱ्हद असें म्हणत असत. पुढें कुरुराजानें येथें यज्ञ, दान, तप इत्यादि गोष्टीं करून मोक्षाची प्राप्ती करून घेतली व तेंव्हां पासून "कुरुक्षेत्र" या नांवानें ही भूमी प्रसिद्ध आहे. भागवत दशमस्कंधांत खालील प्रमाणें उल्लेख आहे. महाभारतांतील युद्धानंतर एकदां सूर्यग्रहणाचे वेळीं श्रीकृष्ण भगवान रुक्मिणी सहित येथें प्रकट झाले होते. वासुदेवानें

येथें एक मोठा यज्ञ केला, त्यावेळीं व्यास ऋषी येथें प्रकट झाले होते; धृतराष्ट्र, गांधारी सहित या ठिकाणीं आले व अर्जुनही येथें पूर्वी पासूनच रहात असे. कृष्ण भगवान वैकुंठवासी झाल्याची खबर अर्जुनापासून समजल्यावर रुक्मिणी, सत्यभामा, हेमवती, गांधारी, जांबवंती. इ. पांचराण्या या कुरुक्षेत्राच्या ठिकाणीं सती गेल्या. धृतराष्ट्र ही याच ठिकाणीं अग्नींत प्रवेश करून परलोक वासी झाला.

कुरुक्षेत्र भूमीला "नर्दक भूमी" असे प्राचीन काळीं म्हणत असत, कारण येथील लोक कठोर अंतःकरणाचे होते, व याचसाठीं महाभारतांतील लढाई करितां हें ठिकाण पसंत करण्यांत आलें होतें.

चिनी इतिहासकार 'हुएनत्स्यांग' लिहितो कीं, कुरुक्षेत्र हा एक शुभ आणि आनंददायक असा पृथ्वीचा भाग आहे. तो नर्दक शद्बाचा अर्थ दुःखविरहित असा करतो. त्यानें ह्या भूमीला सुखक्षेत्र असें नांव दिले आहे.

महाभारतांत यासाठीं सबंध एक अध्याय खर्ची पडला आहे. (म. भा. वनपर्व अ. ८३ पहा.) महाभारत काळीं हें व पुष्कर अशी दोन तीर्थे फार प्रख्यात होती.

["कुरुक्षेत्र दर्पण" ले. श्री. लाला दयालीराम बी.ए.]

कुरुक्षेत्र माहात्म्यः—कुरुक्षेत्रावर युद्धांत मरण पावणारा स्वर्गास जातो अशी त्यावेळीं समजूत होती म्हणून येथें भारतीय युद्ध झाले. हें महायुद्ध कौरव आणि पांडव यांच्यामध्यें झाले. पांडवांचे राज्य त्यांनीं प्रतिज्ञा पुरी केल्यानंतरही त्यांच्या हवाली करण्यास कौरव तयार होईनात म्हणून हें युद्ध उपस्थित झाले. तत्पूर्वी शिष्टा-चारा प्रमाणें श्रीकृष्ण हे शिष्टाई करण्यास कौरवांकडे गेले होते पण ती निष्फळ झाली व त्यामुळें युद्धाशिवाय दुसरा उपाय पांडवांना

उरला नाहीं. महाभारताचा मुख्य विषय हें युद्धच आहे. या युद्धाला कुरुयुद्ध, भारतीय युद्ध अशा संज्ञा आहेत. " कुरुक्षेत्रांत राहीन " असे नुसते म्हणणारासुद्धां निष्पाप होतो असे म्हणतात. कुरुक्षेत्र भूमीचा विस्तार सुमारें साठ मैल पर्यंत आहे.

या साठ मैलांच्या भूमींत अशी कित्येक स्थलें आहेत कीं ज्या ठिकाणीं आपल्या प्राचीन ऋषींनी यज्ञ किंवा तप केलेले आहे. सर्व हिंदुस्थानांत विस्तारानें एवढें मोठें असलेले दुसरें क्षेत्र नाहीं. ऐतिहासिक दृष्ट्या ही भूमी म्हणजे सृष्टीच्या उत्पत्तिचे केंद्र समजतात. याच भूमींत वेदांची रचना करण्यांत आली व ऋग्वेदांतील कांहीं सूक्तें तर याच (ब्रह्मावर्त) भूमींत एकत्रित झाली असेंही कित्येक इतिहासकारांचे मत आहे.

जाबाली ऋषी म्हणतात ते हेंच कुरुक्षेत्र कीं जेथें ब्रम्हदेव इंद्र आदि देवतांनीं यज्ञ केले, आणि ज्याच्या जल सेवनानें ब्रह्मपदाची प्राप्ती होते. तसेंच सरस्वती, व दृषद्वती या दोन नद्या मधील जी भूमी, व जिला ब्रह्मावर्त असें म्हणतात, तेथें रहाणाऱ्या ऋषी ब्राह्मणांजवळ दुसऱ्या वर्गाच्या लोकांनीं येऊन स्वधर्माचे शिक्षण घ्यावे असें मनु सांगतो. कुरुक्षेत्र तीर्थांत स्नान करून जो जितेंद्रिय आणि ब्रह्मचारी रहातो त्याला अश्वमेध यज्ञाचें फल मिळतें व तो सर्व पापांपासून मुक्त होतो. वामनपुराण, वायूपुराण, इंद्रगीता मनुष्यपुराण, देवीपुराण, इ. ग्रंथांमध्यें या पवित्र भूमीस अनुलक्षून किती तरी श्लोक लिहिले आहेत. कुरुक्षेत्रीं एका सूर्य ग्रहण प्रसंगीं कौरव, पांडव, यादव, गोपाल, हें एकत्र जमा झाल्याचे वर्णन भागवतांत आहे. कुरुक्षेत्रीं सूर्य ग्रहणाचे वेळीं स्नान केल्यानें शंभर अश्वमेधांचे पुण्य लागतें अशी समजूत आहे. या साठीं सूर्य ग्रहणाचें वेळीं येथें फार मोठी यात्रा एकत्र होते.

कुरुक्षेत्रांत श्राद्ध केले असतां पितरांना स्वर्गप्राप्ती होते. या तीर्थ माहात्म्याबद्दल खालील उक्ति प्रसिद्धच आहे.

कुरुक्षेत्रं गयां गंगां प्रभासं पुष्कराणिच ॥
एतानि मनसाध्यात्वा श्राद्ध काले सदा पठेत ॥

या कुरुक्षेत्राच्या साठ मैल भूमींत एकंदर दोनशें साठ तीर्थे आहेत पैकीं कुरुक्षेत्र, सन्निहित, पृथोदक, स्थानेश्वर, रुद्रकूप इत्यादि प्रसिद्ध आहेत.

महाभारताच्या वेळीं लढण्यास एकत्र झालेल्या फौजा एकाच ठिकाणीं राहिल्या असतील हे संभवत नाहीं. कुरुक्षेत्राला मध्य धरून दोन्ही फौजा फार विस्तीर्ण प्रदेशांत पसरल्या होत्या असें महाभारतांत म्हटले आहे.

मुसलमान बादशहांच्या चढत्या काळांत हिंदुस्थानांतील, काशी, प्रयाग, गया, मथुरा, कुरुक्षेत्र, इ. तीर्थ स्थानें मुसलमानांच्या ताब्यांत होती, व यात्रेकरूं पासून मोठाले जबरदस्त कर वसूल करण्यांत येत. इतकेंच नव्हे तर कित्येक देवस्थानें मुसलमानांनीं भ्रष्ट केली अशीं वर्णनें आपण इतिहासांतून वाचतो. पुढें जसजसा मराठी साम्राज्याचा विस्तार होत गेला तसतसें कर्त्यापुरुषांचे लक्ष्य या गोष्टीकडे वळलें, मुसलमानांच्या ताब्यांतून हीं तीर्थस्थानें घेण्याकरितां तलवार हातांत घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हते. कुरुक्षेत्रासंबंधानें खालील कथा प्रसिद्ध आहे.

कुरुक्षेत्र सरोवरा जवळ मुसलमानांनीं एक गढी बांधली होती. जे कोणी यात्रेकरू येत त्यांच्याकडून **एक रुपिया लोटा, पांच रुपिया गोता** एक लोटा पाणी नेण्याबद्दल एक रुपाया व एका बुडी बद्दल पांच रुपये या प्रमाणें कर घेण्यांत येई. कुरुक्षेत्राजवळ बांधलेल्या गढीला "**मुगल गढी**" असें म्हणत असत. या जुलमाने इकडील लोक अगदीं त्रासून गेले होते. इ. सन १७६१ या वर्षी सदाशिवरावभाऊ व विश्वासराव, हे दोघे कुरुक्षेत्रीं स्नानाकरितां गेले असतां त्यांचा अपमान झाला. तेव्हां कुरुक्षेत्रांतील

ब्राह्मणांनीं सदाशिवरावभाऊस याबद्दल पूर्वींच विनंती केली होती व त्याप्रमाणें येथें असलेल्या मुसलमान सेनेचा पराभव करून ती गढी उध्वस्त करण्यांत आली. तेंव्हांपासून कुरुक्षेत्र खुलें झालें.

[" कुरुक्षेत्र दर्पण " ले. श्री. लाला दयालीराम बी. ए.]

हिंदूंची पवित्र क्षेत्रें आपल्या अमलांत आणण्याच्या बाबतींत महाराष्ट्रीय राजकारणी पुढाऱ्यांनीं अखेर पर्यंत किती दक्षता, व कळकळ चाळगिली होती हें इतिहासावरून स्पष्ट होत आहे. मराठ्यांचा राज्य विस्तार थेट अटके पावेतों झाल्यानंतर या तीर्थक्षेत्रांची उपेक्षा करणें त्यांच्या ध्येयास शोभण्या सारखें नव्हतें. उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंदे यांचे वर्चस्व स्थापित होऊन दिल्लीचा बादशहा त्यांच्या अंकित झाल्यानंतर, उत्तर हिंदुस्थानांतील तीर्थें मुसलमानी अमलांतून सोडवून स्वराज्याच्या अमलाखालीं आणण्याबद्दल नानांचा शिंद्यामागें तगादा सुरू होता.

या संबंधानें " बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या रोजनिशीं-तील उतारें " या रा. ब. वाडांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाच्या १५३ पानावर इ. सन १७५४-५५ सालची खालील नोंद आहे.:—

" श्री क्षेत्र गया व श्री कुरुक्षेत्र हीं दोन्ही क्षेत्रें मुसलमान पातशहा पासून सरकारांत घेतली आहेत त्याची कमाविस तुम्हास सांगितली आहे. तरी या ठिकाणीं आपले तर्फेनें कमाविसदार पाठवून इमानें इतबारें अंमल करणें. ऐवज सरकारांत पावता करून कबज करणें. दोन्ही क्षेत्रीं कर न घेणें. तीर्थें मोकळी करणें म्हणून दामोदर महादेव याचे नांवची सनद. "

या नोंदीवरून वरील दोन्ही क्षेत्रें मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेऊन भरतखंडांतील अखिल हिंदू मात्रास तेथें जाण्याची मोकळीक करून दिली होती. इतकेंच नाहीं परंतु यात्रे करूं लोकांकडून कोणत्याही प्रकारचा कर घेण्यांत येऊं नये अशी व्यवस्था मराठ्यांनीं तेथें अंमलांत आणिली होती असें सिद्ध होत आहे. मुसलमानी

अंमलाखालीं वरील क्षेत्रें असतां यात्रेकरी लोकांकडून कर घेण्याचा अस्तित्वांत असलेला प्रकार मराठ्यांनीं बंद केला हें त्यांच्या धर्मस्थापनेच्या ध्येयास अनुरूपच होतें हें उघड आहे. सारांश इ. सन १७५४ मध्यें पेशव्यांनीं क्षेत्र गया व कुरुक्षेत्र हीं दोन्ही क्षेत्रें दिल्लीच्या बादशहापासून आपल्या ताब्यांत घेतलीं असें सिद्ध होते.

[राजवाडे म. इ. साधनें खंड ६, ले. ३२८]

कुरुक्षेत्राच्या चतुःसीमा व वर्णनः—कुरुक्षेत्र भूमीचा विस्तार साठ मैलांचा आहे. या साठ मैलांत कित्येक तीर्थस्थानें आहेत. भाविक लोक या सर्व भूमीची प्रदक्षिणा करितात. स्वर्गीय राजा वजीरसिंग फरिदकोट नरेश यांनीं या साठ मैल भूमीची प्रदक्षिणा सं. १९३३ या वर्षी केली होती व पुढें त्यांचा या भूमींतच अंत झाला. कमीर तीर्थाजवळ यांची समाधी आहे. उत्तरेस अंबाला जिल्हा व पतियाला संस्थानचा कांहीं भाग, पश्चिमेस तहशील कैथल व सरस्वती नदी, दक्षिणेस पानिपत तहशील व पूर्वेस यमुना नदी व पलीकडे सहारणपूर जिल्हा आहे. नॉर्थ वेस्टर्न रेलवेची जी शाखा दिल्लीहून अंबाल्यास जात आहे, त्या शाखेवर कुरुक्षेत्र या नांवाचें जंक्शन स्टेशन आहे. येथून एक शाखा कैथल येथें जात आहे व या शाखेवरील पहिलेंच स्टेशन ठाणेश्वर हें आहे. कुरुक्षेत्र व ठाणेश्वर यांच्या मध्यें एक मैलाचें अंतर आहे. दुसरा मोठा दळणवळणाचा मार्ग म्हटला म्हणजे ग्रँड ट्रंक सडक हा होय. पिपली गांवा पासून या मोठ्या सडकेचा एक फाटा कुरुक्षेत्रा पर्यंत जातो. दोन्ही रस्त्यानें दिल्लीहून कुरुक्षेत्र शहाण्णव मैल पडते. दिल्लीहून कुरुक्षेत्रापर्यंत स्पेशल मोटारी रात्रंदिवस धावत असतात.

'ठाणेश्वर' किंवा 'स्थानेश्वर' हें कर्नाल जिल्ह्यांत तालुक्याचें ठिकाण आहे. कुरुक्षेत्र जंक्शन स्टेशनापासून हा गांव एक मैल आहे. ठाणेश्वर स्टेशन पासून गांव अगदीं जवळ येतो. तालुक्याचे सर्व अधिकारी येथें रहात असून त्यांच्या कचेऱ्याही येथेंच आहेत.

ठाणेश्वर हा गांव अगदीं लहान असून लोकसंख्या सुमारें चार हजार असावी. गांवांत म्युनिसिपालिटी, ए. व्ही. स्कूल, पोस्ट व तार ऑफिस, गर्लस्कूल, दवाखाना, इ. संस्था आहेत. येथें कोणत्याही प्रकारचा व्यापार चालत नाहीं. गांवांत अग्रवाल वैश्य लोकांची वस्ती पुष्कळ आहे. हिंदूंचे तीर्थस्थान असल्यामुळें येथें बाराही महिने यात्रा जात येत असते. यात्रेकरूंना ज्या ज्या वस्तूंची आवश्यकता असते त्याच वस्तू या ठाणेश्वरच्या बाजारांत मांडलेल्या दृष्टीस पडतात. कुरुक्षेत्र स्टेशनाजवळच तालुका कचेरी असून पोलीसस्टेशन आहे. स्टेशन जवळही कांहीं दुकानें असलेलीं दिसतात.

" ठाणेश्वर " हें प्राचीन काळीं फार प्रसिद्ध शहर होतें. भारतीय कलाकौशल्य व संकृती इ. गोष्टींचे हें एक केंद्र होतें. हें प्राचीनकाळीं विशाल नगर होतें. हें शहर इ. सन १८५० सालीं शीख राजांकडून इंग्रजांनीं घेतलें. इ. सन १८६२ पर्यंत हें एका प्रांताचें ठिकाण होतें. हल्लीं या शहरांकडे पाहिले म्हणजे मनास दु:ख वाटतें. जुनी विशाल घरें पडलेली असून त्यांचे अवशेष कायम आहेत. चार महिने मलेरियाचा फार जोर असतो. जन्मसंख्येपेक्षा मृत्यूचें प्रमाण ज्यास्ती पडतें. दहा घरांपैकीं एकाच घरांत मनुष्यें राहात असलेलीं दिसतात. बाकीचीं घरें ओसाड व पडलेलीं आहेत. कित्येक कोस पर्यंत जुन्या घरांचे मोडके तोडके भाग दृष्टीस पडतात व यावरून पूर्वीं हें शहर फार मोठे व प्रसिद्ध असावें असें वाटतें. येथें कुरुक्षेत्रांतील पंडे लोकांचीच गांवांत वस्ती आहे. ब्राह्मण विधवांची संख्या ज्यास्त असलेली दिसून येते. जर कुरुक्षेत्र जवळ नसतें तर हें गांव अजीबात ओसाड पडलें असतें. ठाणेश्वर गांवांत हिंडू लागले म्हणजे जें दृश्य डोळयासमोर दिसतें तें मनावर कायमचा परिणाम करिते. पण्डेलोक, यात्रेकरूंना ठाणेश्वरच्या गतवैभवाच्या कित्येक लांब लांब गोष्टी सांगतात.

धर्मशाळा:—कुरुक्षेत्र जंक्शन स्टेशनाजवळ तीन धर्मशाळा आहेत. एक लाला मखनलालजी यांची, दुसरी बंगाली कलकत्ते-वालेकीं, तिसरी—काश्मिरी पंडितांनीं बांधलेली. याशिवाय स्टेशनजवळ एक डाक बंगलाहि आहे. वरील धर्मशाळेशिवाय यात्रेकरूंना राहण्यासाठीं दुसरींहि कित्येक ठिकाणें आहेत. ठाणेश्वर गांवांत कित्येक मंदिरें असून धर्मशाळाहि आहेत व साधूलोकांचे डेरे, आश्रम, इ. पुष्कळ ठिकाणें प्रवाशांना राहाण्यास सोईस्कर आहेत. शिवाय कालीकमलीवालेका डेरा, श्रवणनाथका डेरा सांनिहित तीर्थाच्या बाजूनें असणारीं प्रशस्त देवळें, धर्मशाळा, इ. ठिकाणें प्रवाशांना सोईस्कर आहेत. कित्येक यात्रेकरू गांवांत पंडे लोकांकडेही मुक्काम ठेवितात. सूर्यग्रहणाचे वेळीं मात्र इतकी गर्दी असते कीं यात्रेकरूंना उभें राहाण्याससुद्धां मोठ्या मुष्कीलीनें जागा मिळते.

इतर मुख्य तीर्थें:—कुरुक्षेत्र जंक्शन स्टेशनपासून थोड्याच अंतरावर हीं तीर्थें आहेत. अगदीं पहिल्यानें "**संनिहित**" तीर्थ लागतें. येथें यात्रेकरू श्राद्ध करितात. हें एक मोठें तळें आहे. तळयाच्या चारी बाजूंनीं सुंदर घाट बांधिले आहेत. व एथें आजूबाजूला पुष्कळ देवळें दिसतात. भारतीय युद्धाचें वेळीं दोन्ही पक्षांतील मोठमोठे सेनापति आपसांतील द्वेष भाव विसरून संध्याकाळचे वेळीं परस्परांच्या सुखदु:खाची चर्चा येथें एकत्र बसून करीत असत. म्हणून यास "**संन्याहत**" असेंही म्हणतात. जवळच एक लक्ष्मीनारायणाचें मोठें मंदीर नुकतेंच बांधण्यांत आलें असून त्याशेजारीं नाभ्याचें महाराजांनीं बांधलेली एक हवेली आहे. त्यासमोर पतियाळाचे महाराजांनीं बांधलेली एक हवेली आहे. ही इमारत विस्तारानें मोठी असून सुंदर आहे. उत्तरेच्या बाजूस कलसीयाचे महाराजांनीं बांधलेली हवेली आहे. जवळच "काली-कंबळीवाले" यांची हवेली असून तेथें मारवाडी यात्रेकरू रहातात. थोड्याच अंतरावर "श्रवणनाथची" हवेली असून तेथेंही कित्येक

यात्रेकरू राहूं शकतात. जवळच "बाबागीदडका डेरा" या नांवाची आणखी एक हवेली दिसून येते.

कुरुक्षेत्र तळ्याच्या कांठीं " श्रीव्यास गौडिया मठ " या नांवाची बंगाली वैष्णव लोकांची एक धार्मिक संस्था आहे. बहुतेक बंगाली यात्रेकरू येथेंच उतरतात. सूर्यग्रहणाचे वेळीं कलकत्याहून येथें कित्येक प्रचारक येत असतात. या ठिकाणीं महाराष्ट्रीयांची अशी एकही संस्था नाहीं, त्यामुळें महाराष्ट्रीय यात्रेकरूंची गैरसोय होते.

ज्योतीसरः—जंक्शन स्टेशन पासून पांच मैल व गणेश्वर पासून तीन मैल हें ठिकाण आहे. श्रीकृष्णानें अर्जुनास या ठिकाणीं गीता सांगितली असें म्हणतात. येथें श्रीकृष्णाच्या पादुका आहेत. येथें एक भव्य तलाव असून सभोंवार सुंदर घाट बांधिले आहेत. येथें यात्रेकरू श्राद्ध करितात. येथें श्रीकृष्ण भगवान रथांत बसलेले दिसतात. जवळच अर्जुनही बसलेले दिसतात.

कुरुक्षेत्र सरोवरः—हें सर्वांत मुख्य सरोवर आहे. विस्तारानें फारच मोठें आहे. तिन्ही बाजूंनी घाट बांधिले आहेत. येथेंही यात्रेकरू श्राद्ध करितात. या तळ्याच्यामध्यें एक पूल बांधण्यांत आला आहे. या तळ्यांत कमळाचीं पुष्पें असंख्य दिसतात. तळ्याच्या कांठीं कित्येक मोठमोठीं मंदिरें आहेत.

उपगयाः—येथें एक तलाव असून घाट बांधिलेले आहेत. युधिष्ठिरानें येथें पिंडदान केलें होतें असें म्हणतात व म्हणून यात्रेकरू लोकही येथें पिंडदान करितात.

बाणगंगाः—हें ठिकाण ठाणेश्वर पासून तीन मैल दूर आहे. पक्की सडक नाहीं. येथें एक तलाव असून त्या भोंवतीं सुंदर घाट बांधिले आहेत. येथें भीष्म पितामह यांचा अंत झाला. अर्जुनानें बाण मारून या ठिकाणीं गंगा उत्पन्न केली अशी दंतकथा आहे.

राजा कर्णकी डेरीः—हें ठिकाण ठाणेश्वर गांवापासून एक मैल दूर आहे. येथें राजा कर्ण राहात असे असें म्हणतात.

प्राचीन व अर्वाचीन मंदिरें—या सर्वांत भद्रकालीचें मंदिर हें फार प्राचीन आहे. हें मंदिर ठाणेश्वर गांवाजवळ असून येथें धर्मराजांनीं अश्वमेध यज्ञ केला होता असें म्हणतात. येथें यात्रेकरू मातीचे घोडे वहातात. हे मातीचे घोडे अल्प किंमतींत विकत मिळतात. दुसरें प्राचीन मंदिर म्हटलें म्हणजे, " **ठाणेश्वर महादेवाचें** " मंदिर हें होय. येथेंही एक मोठे तळें असून सभोंवार सुंदर घाट बांधिले आहेत. याशिवाय कुरुक्षेत्राच्या आजूबाजूस असंख्य मंदिरें आहेत. त्या सर्वांचें वर्णन करण्याची येथें आवश्यकता वाटत नाहीं.

कुरुक्षेत्र जीर्णोद्धार समितीः—सदर्हू संस्था इ. स १९२२ सालीं स्थापन झाली. धार्मिक व ऐतिहासिक अशा निरनिराळ्या ठिकाणांची दुरुस्ती करणें, तळीं उकरून काढून त्यांच्या भोवतीं जरूर त्या ठिकाणीं घाट बांधणें, पडलेल्या व तुटलेल्या घाटांची दुरुस्ती करणें, शक्य तितके करून कुरुक्षेत्र व त्याच्या आसपासची मुख्य मुख्य तीर्थें यांची पवित्रता, धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व कायम ठेवणें, असा या संस्थेचा हेतू आहे. ही संस्था कंपनीच्या कायद्याप्रमाणें रजिष्टर झाली असून " श्री भारत धर्म महामंडळ बनारस " या संस्थेकडून व कित्येक राजे महाराजे यांचेकडून संस्थेस योग्य ते द्रव्यसाहाय्य मिळत आहे. संस्थेची " कार्यकारी मंडळी " स्वतंत्र असून बांधकामांत तज्ज्ञ असलेल्या कांहीं एंजिनीअर लोकांस संस्थेनें आपल्या हाताखालीं घेतले आहे. हिज हायनेस **राजा ऑफ सैलाना** हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

कुरुक्षेत्र-गीता भवनः—हें विशाल भवन कुरुक्षेत्र सरोवराच्या कांठीं आहे. कुरुक्षेत्र तळ्याची लांबी सहा फर्लांग असून रुंदी पांच फर्लांग आहे. हें गीताभवन कुरुक्षेत्र रिस्टोरेशन सोसायटी कडून बांधण्यांत आलें. या भवनाची स्थापना ले. क. महाराज श्री. व्यंकट रमणसिंग बहादूर, जी. सी. एस्. आय्. महाराजा ऑफ रिवा यांनीं

केली. ही दोन मजली इमारत आहे. गीताभवनाच्या चारी बाजूंनीं सुंदर बाग आहे. मध्य भागाची तळजमीन सुंदर संगमरवरी दगडांनीं बांधिलेली असून भिंतीवरील नकशी काम अर्वाचीन पद्धतीचे व फारच चित्ताकर्षक आहे. मध्यभागीं रेव्याचे महाराज यांचा संगमरवरी दगडाचा पुतळा हातांत तलवार घेतलेला असा ठेवण्यांत आला असून जवळच श्रीकृष्णाची मूर्ती हातांत सुदर्शन चक्र घेतलेली अशी उभी आहे. येथें एक विस्तृत असें पुस्तकालय असून त्यांत व्याकरण, कोश, तंत्र, संकीर्ण, काव्य, नीति, हस्तलिखित प्राचीन पुस्तकें, हस्तलिखित पुराणें, ज्योतिष, धर्मशास्त्र, कर्मकाण्ड, गीतावेदांत, योग, वेद, उपनिषदें, इत्यादि निरनिराळया विषयांवर लिहिलेले ग्रंथ, कांचेच्या सुंदर अलमारींतून सुव्यवस्थित रितीनें ठेवण्यांत आले आहेत. हीं पुस्तकें कोणाही मनुष्यास पहावयास व वाचावयास मिळतात. गीताभवनाच्या दुसऱ्या मजल्यावर गेले म्हणजे तेथून खाली कुरुक्षेत्राकडे नजर टाकिली असतां सृष्टीसौंदर्य फारच बहारीचें दिसतें, व येथून हालू नये असे नवीन मनुष्यास वाटतें. एकंदरींत हे " **गीताभवन** " प्रत्येक हिंदूमात्रानें अवश्य पहावें असें माझें मत आहे.

"**कुरुक्षेत्र जीर्णोद्धार कमेटीनें केलेली कित्येक महत्त्वाची कार्यें**:—ही सोसायटी स्थापन होण्यापूर्वीं तळ्यांची स्थिती अत्यंत शोचनीय होती. कित्येक तळीं शुष्क होत जाऊन त्यांच्यांत मातीचे ढीगच्याढीग सांचलेले होते. सूर्यग्रहणाचे वेळीं एकत्र जमणारे यात्रेकरू अशा पाण्यांतच स्नान करीत असत. " कुरुक्षेत्र " व "संन्याहत" हीं दोन तळी उकरून बाजूस वहाणाऱ्या चंद्रभागा नांवाच्या नाल्याचें पाणी या दोन्ही तळ्यांत सोडण्यांत आलें. यामुळें ही दोन्ही तळी सदोदित पाण्यानें भरलेली दिसतात.

" **रामगंगा** ":—याठिकाणीं अर्जुनानें बाण मारून जमिनींतून पाण्याचा प्रवाह सुरू केला. तें ठिकाण सुमारें पस्तीस फूट

खोल खणल्यानंतर येथें एक पाण्याचा जिवंत झरा सांपडला. त्या-योगे हें ठिकाण नेहमीं पाण्यानें भरलेले असतें.

" **भीष्मकुंड** ":—याठिकाणीं भीष्मपितामह बाणांच्या शय्येवर उत्तरायणाची प्रतिक्षा करीत कांहीं काळ निद्रिस्थ होते—या कुंडाची दुरुस्ती करण्यांत आली.

" **ज्योतिसर** " (Pool of light):—हें चिरस्मरणीय, व पवित्र असे ठिकाण आहे. याच ठिकाणीं श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीता सांगितली. या ठिकाणीं सुंदर संगमरवरी दगडांचा एक चबुतरा महाराजाधिराज दरभंगा यांच्या मदतीनें बांधण्यांत आला. यास " **दरभंगा ज्योतिसर पॅव्हेलियन** " असें म्हणतात.

ठाणेश्वर पासून सतरा मैलावर पेहेवा (पृथोदक) या नांवाचें एक तीर्थ आहे. हें ठिकाण सरस्वती नदीच्या काठीं आहे. येथें कित्येक प्राचीन मंदिरें आहेत. ह्या देवळांची दुरुस्ती मराठ्यांनीं केली होती असें म्हणतात.

(लाला दयालीराम—कुरुक्षेत्र दर्पण.)

सूर्य ग्रहणाचे वेळीं जी यात्रा येते त्यांतील प्रत्येक मनुष्यावर कांहीं विवक्षित कर बसविण्यांत येतो. हा कर कुरुक्षेत्र, व ठाणेश्वर या दोन्ही स्टेशनावर वसूल करण्यांत येतो. हा कर पंजाब गव्हर्नमेंट कडून मंजूर झालेला आहे. या कराचा (Permanent Railway Surcharge) पैसा सरकार वसूल करिते व तो कुरुक्षेत्र कमेटीकडे पाठविला जातो. सूर्य ग्रहणाचे वेळीं येणाऱ्या लाखों यात्रेकरूंना आवश्यक असलेल्या सुखसोयी करण्याकडे जीर्णोद्धार कमेटी मार्फत या पैशाचा विनियोग होतो.

गुरुकुल कुरुक्षेत्रः— ही संस्था ठाणेश्वर पासून तीन मैल लांब आहे. ही संस्था वीस वर्षांपूर्वी स्व. स्वामी श्रद्धानंदजी यांच्या हस्तें सुरू करण्यांत आली. गुरुकुल विश्वविद्यालय कांगडी या संस्थेची ही शाखा

आहे. आर्य समाजिस्टांनीं चालविलेल्या ज्या कित्येक मोठमोठ्या शिक्षण संस्था पंजाबांत आहेत त्यापैकींच ही एक संस्था आहे. येथील प्रत्येक विद्यार्थ्याला "ब्रह्मचारी" म्हणून संबोधण्यांत येते, ब्रह्मचाऱ्यांचे सर्व कपडे पिवळया रंगाचे असतात. संस्थेंत सुमारें शंभर ब्रह्मचारी शिक्षण घेत असलेले दिसून येतात. ही संस्था अगदीं जंगलांत व एकीकडे असल्यामुळें येथील हवापाणी शरीरप्रकृतीला फारच हितावह असलेले दिसून येते. लहान लहान ब्रह्मचाऱ्यांचे लाल चेहरे व त्यांची भरलेली व पिळदार शरिरें पाहून मनास आनंद होतो. महाराष्ट्रांत अशी एकही शिक्षण संस्था नाहीं. महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांची शरीरयष्टी पाहिली म्हणजे मनाला धक्काच बसतो. बालवयांत केस पिकलेले, डोळ्यांवर उपनेत्र चढविलेले व छातीच्या हाडांचा उद्विग्न देखावा दाखविणारी, अशी नवीन पिढी जर कोणत्या प्रांतांत पहावयाची असेल तर ती आमच्या महाराष्ट्राशिवाय दुसऱ्या कोणत्याही प्रांतांत पहावयास मिळावयाची नाहीं.

संस्थेच्या मालकीची ऐंशीं बिघे जमीन असून तेथें सुंदर बाग लावण्यांत आला आहे. या बागेंत निरनिराळया प्रकारच्या शाखभाज्या, व मधुर फळें तयार होतात. शिवाय संस्थेच्या मालकीची एक गोशाळा असून तींत गाई व म्हशी मिळून सुमारें शंभर दुभतीं जनावरें आहेत. प्रत्येक दिवशीं दोन मण दूध संस्थेंत येते व हें सर्व दूध ब्रह्मचाऱ्यांना वाटण्यांत येत. संस्थेतील शिक्षणक्रम सुव्यवस्थित व अर्वाचीन पद्धतीचा दिसून येतो. मोठमोठे विद्वान लोक अल्प वेतनवार काम करीत असलेले दिसतात. महाराष्ट्रांतील शिक्षणसंस्थांच्या चालकांनीं पंजाबांतील ही गुरुकुलें अवश्य पहावींत अशी मी त्यांस सूचना करितों.

कुरुक्षेत्रांतील पण्डेः—कुरुक्षेत्रांतील पण्डे हे गौड ब्राह्मण आहेत. गौड ब्राह्मणांतही दोन भेद आहेत. आद्यगौड व गुजरगौड. आपण कुरुक्षेत्रांतील पण्डे आहोंत याबद्दल त्यांना मोठा अभिमान

वाटतो. तीन चार फूट लांबीच्या मोठमोठ्या चोपड्या खांद्यावर टाकून, हे लोक स्टेशनापासून गांवापर्यंत रात्रंदिवस धांवपळ करीत असतात. नवीन व्यक्तीला नेमकेंच हुडकून काढितात व त्यास श्राद्ध विधी व इतर पुण्य कर्मे करण्याबद्दल दांताच्या कण्या करून सांगतात. त्यांची जीभ रात्रंदिवस सुरूच असते व ते मुळींच थकत नाहींत.

कुरुक्षेत्रांत सूर्य ग्रहणाचे वेळीं यात्रा येते. ही यात्रा सुमारें तीन लक्षांपर्यंत असते इतर वेळीं कुरुक्षेत्रांत शुकशुकाटच असतो असे म्हटले तरी चालेल. सूर्य ग्रहणें वारंवार येत नसल्यामुळें कुरुक्षेत्रांतील पंडे देवावर नेहमीं रुष्ट असतात. सरासरी चार पांच वर्षांनीं एक सूर्यग्रहण येते. चंद्रग्रहणें वारंवार येतात पण त्यांचा या पंड्यांना काय उपयोग ? जर सूर्यग्रहणें वारंवार येतील तर ती त्यांना फायदेशीर असनात. एक सूर्यग्रहण आले म्हणजे जी कमाई होते, त्या कमाईतुन गृहकृत्यांकडे लागणारा आवश्यक खर्च करून दुसरें सूर्यग्रहण येईपावेतों ती पुरवितात. प्रयाग, मथुरा, काशी, गया, हरिद्वार इत्यादि ठिकाणच्या पुरोहितांपेक्षां कुरुक्षेत्रांतील पंडे कांहींसे सौम्य व प्रेमळ दिसतात. या आद्यगौड ब्राह्मणांत विद्वान असे फारच थोडे सांपडतील.

क्षेत्राच्या ठिकाणीं दिसणारे इतर प्राणीः—ज्याप्रमाणें, काशी, हरिद्वार, प्रयाग, मथुरा, इ. क्षेत्राच्या ठिकाणीं साधू संतांची पुष्कळ गर्दी असते तशी ती कुरुक्षेत्रांतही आहे. येथें सुमारें दहा बारा अन्नछत्रें असून वीस पंचवीस सदावर्ते आहेत. येथील अन्नछत्रांतून दोन्ही वेळां जेवण्यास मिळते हे विशेष आहे. निरुद्योगी राहून छत्रांत जेवावयाचे, यात्रेकरू लोकांकडून जे मिळेल ते पदरांत पाडावयाचे व बाकीच्या वेळांत, भांग, गांजा चरस यांचें मनसोक्त सेवन करून, संधी मिळाल्यास व्यभिचारासही प्रवृत्त व्हावयाचे, अशा लोकांचा भरणा पुष्कळ आहे. " आपल्या देशांत अशा निरुद्योगी व फुकट

खाऊ लोकांची संख्या सुमारें अठरा लक्ष आहे " असें एक तज्ज्ञ मला कुरुक्षेत्रांत म्हणाले. अठरा लक्ष निरुद्योगी साधूसंतांना पोसणारा असा हिंदुस्तानाशिवाय दुसरा कोणताही देश पृथ्वीतलावर सांपडणार नाहीं.

कुरुक्षेत्र भूमींतील इतर तीर्थें:—कुरुक्षेत्राच्या आसपासच्या साठ मैल भूमींत जीं दुसरीं कित्येक तीर्थें आहेत त्यांचीं नांवें सांगून हें कुरुक्षेत्र वर्णन येथेंच समाप्त करितों:—

ठाणेश्वर, सन्याहत, रुद्रहृदय, विदूरकूप, वायूसर, कोटीतीर्थ, गंगारोह, अभयचक्र, विमलसर, पाराशर, कौशिकी संगम, धृतीघर, वामसर, वालखिल्य, परमह्मदेव, सूर्यकुंड, पुष्पकवास, दशरथतीर्थ, हंसतीर्थ, दशाश्वमेधतीर्थ, ब्रह्मतीर्थ, रत्नकुंडतीर्थ, समीयज्ञतीर्थ, पंचनिधोतीर्थ, रूपवतीतीर्थ, जमदग्नितीर्थ, वाराहतीर्थ, पींडतारकतीर्थ, भूतेश्वरतीर्थ, पुष्करतीर्थ, रामह्रदतीर्थ, कायाशोधतीर्थ, लोकोद्धारतीर्थ, मुकुटेश्वरतीर्थ, श्रीतीर्थ, कपिल ह्रदयतीर्थ, सूर्यतीर्थ, शंखीतीर्थ, गंधर्वतीर्थ ब्रह्मावर्ततीर्थ, पित्रीतीर्थ, कामेश्वरतीर्थ, मातृतीर्थ, वरुणतीर्थ पानवर्णतीर्थ, उमातीर्थ, सरस्वतीतीर्थ, उपगयातीर्थ, ऱ्हदयकेदारतीर्थ विष्णूतीर्थ, सर्वदेवतीर्थ, नवग्रहतीर्थ, नागऱ्हदयतीर्थ, त्रिविष्टकतीर्थ वैतरणीतीर्थ, शुक्रतीर्थ, फल्गूतीर्थ, ऋणमोचनतीर्थ, सिद्धवटीतीर्थ कौशिकीतीर्थ, श्रवणतीर्थ, मंदाकिनीतीर्थ, वामनतीर्थ, विष्णूतीर्थ कुलतारणतीर्थ, पवनऱ्हदयतीर्थ, व्यासऱ्हदयतीर्थ, कुंजतीर्थ, विद्यावती तीर्थ, शोणतीर्थ, मार्जनतीर्थ, सिंधुद्वीपतीर्थ, सप्तकुलोद्धारतीर्थ, सोमतीर्थ रेणुकातीर्थ, पंचतपतीर्थ, सर्वदेवतीर्थ, लक्ष्मीतीर्थ, लक्षतीर्थ, कौशिकी तीर्थ, ब्रह्मकन्यातीर्थ, सर्पतीर्थ, इत्यादि इत्यादि.

सहाय्यक वर्ग तिसरा:—राजवाड्यांचा हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर तो विकत घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांना तो प्रसिद्ध होतांच प्रत्येक खंडाबद्दल रुपये दहा याप्रमाणें तीन खंडांचे रुपये तीस घेऊन देण्यांत येईल; मात्र अशा लोकांनीं प्रत्येक खंडाबद्दल रुपया एक प्रमाणें रुपये तीन आगाऊ पाठवून आपलीं नांवें नोंदविण्याची तजवीज करावी.

वरील तिन्ही सहाय्यक वर्गांकडून प्रत्यक्ष हातीं येणारी रकम व सहाय्यक वर्ग तीन यांचेकडून मिळणारीं आश्वासनें यांचे आधारावर हें कार्य मंडळानें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. राजवाड्यांची विद्वत्ता, मराठी भाषा व मराठी इतिहास इत्यादि कार्यांचे प्रगतीस्तव त्यांनीं केलेला स्वार्थत्याग लक्षांत घेऊन सर्व सुविद्य व उदार अंतःकरणाचे गृहस्थांनीं या कार्यास्तव राजवाडे मंडळास मदत करावी अशी मंडळाची विनंति आहे.

धुळें
१३।१।१९३४

भास्कर वामन भट
गणेश शंकर देव
चिटणीस, राजवाडे संशोधन मंडळ, धुळें.

ग्रन्थाच्या प्रकाशनार्थ मिळालेल्या देणग्या

वरीलप्रमाणें योजना श्रीमंत बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधि यांनीं तारीख १३।१।३४ रोजीं राजवाडे संशोधन मंदिरांत झालेल्या समारंभप्रसगीं जाहीर केल्यानंतर खालीलप्रमाणें देणग्या राजवाड्यांच्या मराठी धातुकोशाच्या प्रसिद्धीकरितां जाहीर करण्यांत आल्या.

३०० रु. श्रीमंत बाळासाहेब पंडित पंतप्रतिनिधि संस्थान औंध.
१००८ रु. श्रीमंत सौ. महाराणी इंदिराबाई मासाहेब होळकर, संस्थान इंदूर
१००० रु. श्रीमंत पांडुरंग केशव उर्फ पांडुअण्णा शिराळकर, कऱ्हाड.
१०० रु. श्री. भवानीशंकर नियोगी, हायकोर्ट जज्ज, नागपूर व व्हाईस चॅन्सेलर नागपूर यूनिव्हर्सिटी.
२५ रु. श्री. सिताराम गोपाळ टाकळकर, नडियाद.
२५ रु. श्री. बाळकृष्ण गणेश केळकर, पे. पो. स. इन्स्पेक्टर, धुळें.
२५ रु. श्री. नारायण बाळकृष्ण उर्फ भय्यासाहेब केळकर, धुळें.
२५ रु. श्री. पार्वतीबाई भ्र. महादेव रघुनाथ भिडे.
२५ रु. श्री. गंगाबाई केळकर.
२५ रु. श्री. एस. जी. सोमवंशी, ओव्हरसीअर, सेटफळ.
१०० रु. श्री. नरसिंह चिंतामण केळकर, ट्रस्टी केसरी मराठा संस्था.
२५ रु. श्री. जैराम विष्णु वैद्य, देवरूख.
१०० रु. श्री. कोल्हटकर म्यानेजर धी न्यू प्रताप मिल, धुळें.

विश्वनाथो विजयते

राजवाडे-संशोधन-मंडळ, धुळें.

संशोधक

हें त्रैमासिक राजवाडे-संशोधन-मंडळ धुळें, यांचेकडून प्रसिद्ध करण्यांत येतें. यांत ज्ञानेश्वराची नवव्या अध्यायाच्या राजवाडयांनीं केलेलें संस्कृत रूपांतर, राजवाडयांचे अप्रकाशित लेख, विलास मणी मंजरी, (बुद्धीबळाच्या खेळाचे डाव), मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें इत्यादि प्रसिद्ध करण्यांत येतात.

वार्षिक वर्गणी मनिऑर्डरीनें ३ रुपये. व्ही.पी.नें रु.३-६-०

नमुना अंक मागवा.

शके १८५६ च्या चैत्र शुद्ध १ च्या तिसऱ्या वर्षाच्या नवीन अंकांत मराठाधर्म, स्वराज्यांतील पोवाडे वगैरे वाचनीय लेख लेख आले आहेत. मराठी भाषा व मराठ्यांच्या इतिहासाभिमान्यानी त्रैमासिकाचे ग्राहक होऊन राजवाडे संशोधन मंडळास अगत्य आश्रय द्यावा.

चिटणीस

राजवाडे-संशोधन-मंडळ, धुळें.

हें पुस्तक **कालिदास सिताराम पंडित** यांनीं आपल्या समर्थ इलेक्ट्रिक प्रिंटिंग प्रेस धुळें प. खा. ग. नं. १२६३ मध्यें छापिलें व **भास्कर वामन भट** चिटणीस राजवाडे-संशोधन-मंडळ धुळें यांनीं तेथेंच प्रसिद्ध केलें.